Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४८ ] आकोला-- सोमवार तारीख ५ माहे जानेवारी सन १९१४ इ० अंक १

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस मुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

## मुंबइ बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६३/१ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. Phillips. एजंट
नो० नं० २

## अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेग्रनाईट नोट पेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकी किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हींमिळून किंमत रु. १ व्हीपीनें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेसिटी

नो० नं० ३

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १०८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनटी खरूज यांचा विकार एका दिवसां नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ४

## 'विकावयाचा आहे.'

वाशीम येथील, पूर्वी[illegible] नजवळ असलेला कै॥ [illegible] पुरुषोत्तमराव नारायणभट [illegible] विकावयाचा आहे.

खंडवा ते इंगोली व्हाया वाशीम लैकरच रेल्वे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ५ वऱ्हाड

## रामबाण उपाय.

### रक्त पिती व कोड

दहाहजार पुड्याफुकट. आह्मीं आमच्या औषधाची खात्री पटावी ह्मणून १०००० नमुन्याच्या पुड्या करण्याचें योजिलें आहे या पुड्या वरील महारोग दुरस्त होण्यासारख्या आहेत. हे त्या निःसंषय सिद्ध करितील. या पुड्या वापरून अनुभव पहावा ह्मणजे खात्री होईल. नमुन्याच्या पुडीची किंमत फक्त ०= ठेविली आहे. ही किंमत फक्त टपाल हशील वगैरे खर्चापुरतीच आहे.

२ आह्मीं रक्तपिती; कोड, हे कसे उद्भवतात त्याची शश्रुषा कशी करावी? वगैरे माहितीचें इंग्रजी व बंगाली मार्फत पुस्तक तयार केलें आहे तेंही पण गरजूंनीं अवश्य वाचण्या लायक आहे. ह्मणजे त्या पापासून त्वचे संबंधी रोगांची पूर्ण माहिती होईल किंमत फक्त ट. पा. सह ॥= सर्व पत्र व्यवहार इंग्रजींत करावा.

पण्डित कृपाराम
८ नंदीबागानलेन पो. सालकिया जि. हावरा.
नं. ६

## "भानगड नको."

१ खरूज, गजकर्ण, खवडा, फोड, खाज, आगपैग, दाद, अजुत, भद, नख धावने, मुकी खाज, आग व पाणी सुटणे व साधारण कोणत्याही त्वचा विकारांवर १ च मलम १-२ वेळ लावल्यानें गुण देऊन ३ दिवसात कायमचा फायदा होतो. किं ४ आणे.

२ कापूर, शेप, पुदीना, पेपरमिंट, ओवा, हिंग, दालचिनी, दोडे, यांचे अस्सल अर्क उपयोग सोबत असतो किं ४ आणे.

३ केंस आण्याची बरीच औषधें निघालीं त्यांत बरेंच विकार ग्राहकांचे नजरेस येतात पण आमचें औषधानें जागा काळी न पडतां व इजा नहोतां फारच लवकर केंस जाऊन, लवकर येत नाहींत किं. फक्त २ आणे.

पत्ता—व्हि. आर. मुळे. नांदुरा. जी. आय. पी.

नो. नं. ७

## नोटीस

सदरहु कंपनीच्या कित्येक भागिदारांकडून हल्लीं मुंबईस चाललेल्या ब्यांकांच्या धामधुमींत कंपनीस कांहीं धक्का वगैरे बसला किंवा काय यासंबंधी व कंपनीच्या कामासंबधीं वारंवार चौकशी होत असल्यामुळें कंपनीच्या सर्व भागिदारांस जाहीर रितीनें कळविण्यांत येते कीं हल्लींच्या चळवळींत ह्या कंपनीस कांहीं धोका नवसतां सर्व काम सुरळीत रितीनें चाललें आहे रेल्वेचें १२ मैलाचे व स्टेशनें वगैरेचेंही बांधकाम संपलें असून येत्या जानेवारी महिन्यांत रूळ टाकण्यास सुरवात होऊन एप्रील अखेर बहुतेक १२ मैल लाइनवर गाडी चालू होईल. तसेंच पुढील बांधकाम जारीनें सुरू असून तेंही होतांहोईल तों लवकर पुरें करण्याबद्दल योग्य तिनकी व्यवस्था करण्यांत येत आहे. सबब भागिदारांनीं कंपनीच्या अस्तित्वाबद्दल कोणत्याही प्रकारचा संशय न बाळगतां वेळोवेळीं मागितलेले कॉलचे पैसे कंपनीच्या ऑफिसांत भरावे कळावें.

भालचंद्र आणि नगिनदास
एजन्टस्

नो० नं० ८

## जाहीर नोटीस

नोटीस बेशमी सखाराम विक्रम माळी २ तुकाराम विक्रम माळी ३ कृष्णा गोविंदा माळी ४ सोनाजी विक्रम माळी सर्व रा. पातूर ता. बाळापूर व सर्वत्र लोकांस—

मी खालीं सही करणार नोटीस देते कीं ता. २८-१२-१३ रोजीं दशक्रियेचे वेळीं मजला अडवून जबरीनें तुह्मी माझ्या हातून दस्तऐवज व कांहीं पावत्या लिहून घेतल्या तुह्मी माझें कार्य अडविल्यानें मला निरुपायास्तव तुमचे ह्मणणें त्या वेळीं मान्य करावें लागलें. परंतु या नोटीसीनें तें तुह्मी सर्व लिहून घेतलेले काग[illegible] या कागद पत्रान्वयें तु[illegible] टींत हात घालण्याचा [illegible] आणि या बद्दल अ[illegible] खबर दिली आहे. तसेच सर्वत्रांस ही कळविण्यांत येतें कीं वरील कागदपत्रान्वयें माझेनवऱ्यानीं मजला वरील बक्षीस दिलेली जीनगी कोणी गहाण खरीदी पट्यानें वगैरे घेऊं नये. घेतल्यास त्याचा बोजा या जिनगीवर नाहीं कळावें. ता१-१२-१३ ई.

सहीची निशानी आंगठा.
कमळजा मर्द विष्णाजी माळी रा. पातूर हिचा
साक्ष.
सीवगीर गुरुगीर दस्तूर खुद.
नो. नं. ९

## जाहिर नोटीस

मी खालीं सही करणार जाहिरनोटीस देतों, कीं कसबे आकोट ता० मजकूर जि० आकोला येथें शंकरलाल नरसिंगदास या नावानें दुकान आहे व श्रीकिसनदास बालकिसनदास या नांवाचें दुकान मौजे पळसोद ता० आकोट येथें आहे. या दोन्हीं दुकानांत रकम आमची लागत असून नफ्यानुकसानांत ( शिवनारायण रामसुखदास रा० आकोट याचा हिस्सा होता. ) तो हिस्सा त्यानें ता० १८-१०-१९१२ ई० रोजीं निकाल करून काढून टाकला आहे. आणि त्याबदल आपसात पावत्या-फारकत्याही झाल्या आहेत. सदरहू तारखेपासून सदरहू दुकानाची पूर्ण मालकी आमचेकडेस आली आहे. करितां असें कळविण्यांत येतें कीं, ह्या दुकानासंबंधानें ज्या ज्या लोकांकडेस कर्जाऊ पैसे व शेताचे स्वामित्वाचे पैसे या दुकानास घेणें आहे, आणि ज्यांच्यावर या दुकानचे हुकूमनामे झालेले आहेत त्या सर्व लोकांनीं आकोट येथें आमचेकडे येऊन पैसे देऊन जाणें व आपआपले दस्तऐवज किंवा आमचे हातची पावती घेऊन जाणें. सदरहु शीवनारायण याजला कांहीं ही रकम वसूल देऊं नये, व सदरहु दुकानासंबंधानें कोणत्याही प्रकारचा व्यवहार त्यांच्याशी करूं नये तसें केल्यास आह्मी जबाबदार राहणार नाहीं जर कोणी असामीनें शीवनारायण यांस वसूल दिल्यास आह्मी तो वसूल मुजरा न देतां दावा करून पूर्ण रकम वसूल करून घेऊं. ही जाहीर नोटीस दिली ता० ३१।१२।१९१३

सही मारवाडींत

शंकरलाल नरसिंगदास मालक

प्रेमसुखदास भिकमचंद तर्फे

देवीदास छोटमल द. खु.

नो. नं. १९

---

## पत्र व्यवहार

### गणपती

(मागील अंकावरून पुढें चालूं)

'एकाकीन रमते सद्विय मइ इच्छत' अशी श्रुति आहे. प्रथम एकच परब्रह्म असतें झालें. तें एक व अद्वितीय होतें व आहे असा श्रुति सिद्धांत आहे. त्यासच त्वंदेहत्रयातीतः, त्वं कालत्रयातीतः त्वंमूलाधारे स्थितोसि नित्यम्-त्वं ब्रह्म, त्वंम आनंद इत्यादी शब्दानें आळविले आहे. मनुस्मृति मध्यें त्या सच्चिदानंद ब्रह्माचे स्वरूप वर्णन केले आहे. "आसी दिदं तमो भुतम् प्रज्ञात लक्षमण । अप्रतर्क्यम विज्ञेयं प्रसुप्त मिव सर्वतः ॥ अशा स्थितिमध्यें असतां अनेक होण्या विषयीं त्याची इच्छा झाली. हा जो त्याचा संकल्प तोच हा सदसतरूप जगताचा विस्तार होय. या वरून मनुस्मृतींत वर्णन केलेले तमोभूतापासून या जगतरूप प्रकाश' पुत्राचा जन्म झाला परमेश्वर एकाचा अनेक कशाकरितां झाला, त्यानें ही सृष्टी कशाकरिता उत्पन्न केली, हे प्रश्न अनेक तत्ववेत्यांनीं अनेक तऱ्हेनें सोडविले आहेत. परंतु माझेंमतें आमचे वेद ज्याचें वर्णन करितांकरितां थकून गेले, जगांतील सर्व शास्त्रें ज्या परमात्म सत्तेचें ह्मणजे जें या सर्व जगाचें पाहिलें कारण आहे तें अमूक तऱ्हेचें असें वर्णन करूं शकत नाहींत. तें हे अनंत रूपानें जगांत आपलें अद्वितीयरूप दृश व्हावें ह्मणून प्रकट झालें आहे. असो अंधकाररूप आदिकारणांत प्रकाशाचें बीज परमात्मसकल्परूपानें प्रकट होतें. अंधकार व प्रकाश ही नांवें एकाच वस्तूची प्रकाशदर्शक आहेत. त्यापरमात्म्याचे श्वास आणि निश्वास हेंच जगाचें प्रकट व लय पावणें होय. जगत्काल वाच्छिन्न आहे. परमात्मा कालत्रयातीत आहे. दृश्य जगांतील विषय संक्षेप तेनें कालाचें अनुमान होतें. अदृश्याचेठायीं कालकल्पना करिता येत नाहीं. अंतःकरणांत एकामागूनएक उठणारा वृत्तिभेद हेंच कालाचें स्वरूप आहे. हेंच अंतःकरण परमात्म्याशीं समरस झाल्यानंतर सर्व एकच अखंड असा वर्तमानकाल राहतो.

जगताचें आदिकारण असें जें अनिर्वाच्य परब्रह्म त्याच ठिकाणीं स्फूर्ति उठतांच तोच अनंतब्रह्मांडनायक अनंत ऐश्वर्यानींमंडित असा परमेश्वर होय. अशा अनंत ब्रह्मांडापैकीं आपण एका ब्रह्मांडापैकीं आहोत. अर्थात अनेकाचा संकल्प करितांच द्वितिय प्रकृती प्रकट झाली इलाच महामाया ह्मणतात. इचे दोन प्रकारचें स्वरूप आहे. दैवी आणि असुरी. प्रथम या दैवी प्रकृतीचेचठाई महाविष्णूचे नाभिकमलापासून ब्रह्मा निर्माण झाला. शेषशाई भगवान महाविष्णूचें नाभिकमलापासून ब्रह्मदेव उत्पन्न झाल्याबद्दल पुराणांतून जी कथा दिलेली आहे ती सांकेतीक अध्यात्मिक अर्थाची आहे. समुद्र, शेष, नाभि, कमल इत्यादिक शब्द स्थूल अर्थानें घ्यावयाचे नाहींत. त्याचे गूढ अर्थ आहेत. कमल पुष्पाची साद्रशता सूक्ष्म अवलोकनानें समजून येईल कीं ती ब्रह्मांडाप्रमाणें आहे. प्रथम ब्रह्मदेवानें तप सामर्थ्यानें जड सृष्टी उत्पन्न केली, व त्यानें ठिकाणां प्राण धारणा व्हावी ह्मणून महा विष्णुचा धावा केला, वस्तुमात्राचें ठिकाणीं असणारी चित्‌शक्ति विष्णु प्रेरित आहे. व नंतर शंकराचा धावा केला तेव्हां शंकरानीं परमाणूचेठिकाणीं असणारे विशिष्ट नित्यत्व दिलें. अशाप्रमाणें चित् जडग्रंथी पूर्ण झाली. हे सर्व मी दोन ओळींत सांगितलें परंतु ही सृष्टि दृश्यरूपास येण्यास आपले मानुष वर्षाचे मानानें लाखो वर्षें लोटली असावी परब्रह्मापासून जगाची उत्पत्ति व फिरून त्या जगाचा परत त्याचे ठिकाणी अंतर्भाव हें होण्यास किति काल लागतो हें सांगणें मानवी कल्पनें बाहेर आहे. आपण सूर्यमाला व त्याचे भोंवतालची ग्रहमाला याचे गती संबंधानें विचार त्यावेळेस आपलें मन गोंधळून जाते, त्यापेक्षां शतपट काल सृष्टीची उत्पत्तित्यांतील खनीज, उद्भीज, अंडज आणि जरायुजप्राणी सृष्टिस्वभाव नियमाप्रमाणें उत्क्रांत होण्यास किति काल लोटतो हें सांगणें कठीण आहे. तेथीले काल प्रमाण येवढें घ्यावें लागतें कीं तेथें लाख, दहालाख वर्षाची चूक ह्मणजे सेकंदाची चूक आहे. जडसृष्टी उत्पन्न केल्यानंतर ब्रह्मदेवानें महाविष्णूची बारावर्षें तपश्चर्या केली असें शिव पुराणांत सांगितलें आहे. ब्रह्मदेवाचा एक दिवस ह्मणजे आपला मनुष्याची त्रेचाळीस कोटि वीस लक्ष वर्षें होतात. या प्रमाणानें आपण ब्रह्मदेवाच्या बारा वर्षाचा हिशोब करा. आपले पैकीं प्रत्येकजण या ब्रह्मदेवाच्या सृष्टींत परमाणू रूपानें अनंत कालापूर्वी परब्रह्माचे अगर आपल्या प्रिय विनायकाचे सत्य संकल्परूप चैतन्य शक्तीनें प्रेरित असे निघालों होतो. व अनंत कालापासून प्रथम आकाशरूप, नंतर वायू, नंतर अग्नि, नंतर उदक, नंतर खनीज, नंतर उद्भिज, अंडज, व जरायुजस्थितीचे अनुभव घेत घेत आज या अवस्थेंप्रत येऊन परम मंगलकारी, विघ्नविनाशक गजाननाचे द्वारी मोठ्या आनंदानें उत्साह करीत बसलों आहों ! श्रोतेहों,—आपल्या या भवरूप वारीचें विस्तीर्ण स्वरूप लक्षांत आणा, आपली जबाबदारी ध्यानांत धरा, मागें आपण रस्ता किति आक्रमण केला याचें सिंहावलोकन करा, ह्मणजे तुह्मांस पुढचा मार्ग क्रमण्यास उमेद येईल. आपला आपल्या कुटुंबाशीं, समाजाशी, राष्ट्राशी व राष्ट्रातीशी आलेला संबंध हा अकस्मीत आहे अथवा ईश्वराचे सत्य संकल्प प्रेरित आहे हें समजून येईल या संबंधाचें महत्व समजल्यानें परस्पराबद्दल आपलें कर्तव्य समजेल व सहजच तुमचे ठिकाणीं आपण सर्वजण भवसागरांतील नावेंत बसलेलो बंधु भागिनी आहों हा भाव उत्पन्न होईल.

या सूर्यमालेची तपशिली माहिती अत्यंत मनोरंजक आहे. कारण ती माहिती ह्मणजे आपलेंच प्रवास वर्णन होय. आज आरणास त्यासंबंधानें विचार करण्यास अवकाश नाहीं. मी आतां पावेतों परब्रह्माचे मोठ्या वर्तुळापैकीं खालीं येण्याचा क्रम अत्यंत स्थूल मानानें सांगितला आतां परत जेथून निघालो त्याच ठिकाणीं परत जात असता जीवाचे अनुभवाबद्दल थोडेसें विवेचन करतो.

मनुष्यास राहण्यास योग्य अशा तऱ्हेची ही मानवी शरीरें तयार झाल्यानंतर आपले पृथ्वीचे अगोदरचे चंद्रलोकावर ज्यांची वाढ झालेली होती अशा मानस पुत्रानीं तीं शरीरें धारण केलीं व तेव्हापासून आमचे या पृथ्वीवरील मानवी चरित्रास आरंभ झाला. आमचे ह्मणजे आमचे अगोदर चार मानवी वंश उदयास येऊन अस्तंगतास गेले. आपण पाचव्या मानव वंशांतील आहोत. आपणास धर्म स्फूर्ति देणारा वैवस्वत मनु आहे. आपले पेक्षां लहान आपले चार बंधू आहत. आपणास स्थूल दृष्टीनें एक प्रकारचे वार्धक्य आले आहे. तथापि आत्मज्ञान रूप रत्न भांडार अद्याप आमचेच ताब्यांत आहे. आमचे जवळ गुप्त ज्ञानरूप भांडार असल्यामुळें आह्मी आमचे इतर भावंडाप्रमाणें नाशेष झालो नाहीं. आमचे बंधूकीं सर्वांत लहान जे पाश्चमात्य लोक यांचा हल्लीं उदय काळ आहे. आह्मी त्याची व त्यानीं आमची उपेक्षा करणें हें परस्पराच्या नाशास कारण होणार आहे प्रत्येक मानवी वंशांत कोण्यातरी विशिष्ट तत्वाची वाढ होत असते. हल्लीं मनाची किंवा जोस इंग्रजींत In—telligence किंवा व्यवहारी बुद्धि ह्मणतात तिचे राज्य आहे. व जिकडे तिकडे तिचाच वाहवा दृष्टीस पडते. वर जे मोठे वर्तूळ सांगितलें त्या वर्तुळाचे दोन भाग करता येतील. एका भागाचे नांव प्रवृत्ति व दुसऱ्याचे निवृत्ति. आमच्या पूर्व ऋषींनीं हे दोन्ही मार्ग आक्रमिण्यास सुकर व्हावेत ह्मणून जो सोपान तयार केला आहे तो सर्व जगांतील मानवास समजून घेऊन आक्रमण केल्यास सुखकरच होणार आहे. त्याचा कोणाशी विरोध नाहीं एकंदर सृष्टींतील जिवाची त्रिगुणात्मक अवस्था लक्षात आणून त्यानीं त्रिगुणात्मक अशा तऱ्हेचा मार्ग निश्चित करून ठेविला आहे. एकाच ध्येयाकडे नेणारे तीन मार्ग दाखविले आहेत. तिहीचा योग्यता सारखीच आहे. मनुष्य हा तीन तत्वांचा बनलेला आहे. जसे-स्थूल अथवा जड शरिर, मनोविकार व बुद्धि असें ह्मणतात. या तीन तत्वांचे मनुष्यांत ज्याचें प्राबान्य असतें तशा तऱ्हेची त्याची प्रवृती, कर्माकडे, उपासनेकडे अथवा ज्ञानाकडे असतें मनुष्याचे जीवन यात्रेस या तिहिचीही अवश्यकता असते, परंतु त्याचे प्रकृतिप्रमाणें जिकडे जास्त प्रवृत्ति तो त्याचा मुख्य मार्ग होय. कर्म, उपासना आणि ज्ञान- एकाच ब्रह्मस्वरूपाकडे नेणारे तीन मार्ग आहेत.

अपूर्ण

# वऱ्हाडसमाचार

पौष शुद्ध ९ शके १८३९ प्रमादी

## वार्षिक राष्ट्रीय महोत्सव.

दिसेंबर महिन्याचा शेवटला आठवडा हा हिंदुस्थानचा राष्ट्रीय महोत्सवाचा आठवडा ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण हिंदुस्थानची बुद्धि, शहाणपण, सामाजिक सुधारणेची कळकळ, धर्मजिज्ञासा, उद्योग तत्परता, कर्तव्यनिष्ठा, सर्व कांहीं या दिवसांत एका केंद्रांत मूर्तिमंत दिसूं लागतात. यंदा हिंदुस्थानच्या या सगळ्या गुणाचें अधिष्ठान कराचीनें आपलेकडे घेतले होतें. तेथें कोणी काग्रेस करितां ह्मणून कोणी औद्योगिक परिषदेसाठीं, कोणी एकेश्वरी परिषदेसाटीं, कोणी समाजसुधारणेच्या चर्चा श्रवणार्थ अशा नानाविध कारणांसाठीं यावत् भरतखंडातले गेल्या आठवड्यांत जमा झाले होतें. हिंदु, पारशी, मुसलमान, ख्रिस्ती, जैन, ब्राह्म सगळे आले होतें. सर्वांनीं भारत मातेला आपली जननी समजून तिच्यावरलें प्रेम व्यक्त केलें. सर्वांनीं आपले व्यक्तिविषयक भेद बाजूला टेवून आपलें तनमनधन केवळ आपल्या बांधवांच्या हितासाठीं निदान एक आठवडाभर तरी लावण्यास आपण इंग्रजासारख्या सद्गुरूंपासून शिकलों आहों हें दाखविलें. हिंदी राष्ट्रांत राष्ट्रीयत्वाची भावना जागृत नाहीं हें आह्मास कबूल आहे. पण त्या भावनेची जागृतिसुद्धां नाहीं असें ह्मणणारास डोळेच नाहींत असें ह्मटलें पाहिजे. ही भावना अंकुराच्या रूपानें

का होईना, नसती तर कोण नवाब सय्यद महमद आणि कोण हरचंद राय, बंगालप्रांतांची धुळधाण करून दरारा बसविणाऱ्या मराठ्यांपैकीं मुधोळकर हें कोण आणि नीलरत्न सरकार व भुपेंद्रनाथ बसु हे कोण? यांच्यांत अहिनकुलभाव असावयाचा त्या जागीं आतां बंधुप्रेम कां दिसावें? हिंदु व मुसलमान यांच्या क्षुद्र वर्गांतले अशिक्षित लोक बकरीदच्या दिवशीं भांडून परस्पराची डोकीं फोडीत असले तरी दोन्ही जातींतल्या उच्च व सुशिक्षित वर्गांतले सय्यद नवाब सुलतान महमद किंवा वझीर हसन आणि लल्लुभाई किंवा शेषगिरि अय्यर हे जोंपर्यंत परस्परांना मिठ्या मारून खऱ्या बंधुभावानें वागत आहेत, आणि सर्वांच्या कल्याणाचा विचार एके जागीं एका मतानें करण्यास जमत आहेत तोंपर्यंत हिंदुस्थानच्या तारणाबद्दल निराश व्हावयास नको. शिक्षणाचें जीवन सारखें, वाढत्या प्रमाणावर मिळत गेलें पाहिजे कीं ज्या भावनेनें सर्व जातींचे पुढारी बंधुप्रेम करूं लागले आहेत तीच उच्च राष्ट्रीयत्वाची भावना यच्चयावत् सबंध राष्ट्रपुरुषाच्या देहात— त्याच्या प्रत्येक नसेंत व रोमरोमीं—संचार करूं लागेल. ही आशा डिसेंबर महिन्यात सालोसाल भरणाऱ्या नानाविध कांग्रेस व कान्फरन्सें यांनीं पल्लवित होते, आणि ह्मणूनच या प्रसंगाना राष्ट्रीय महोत्सव हे नांव अन्वर्थक आहे असें आह्मी ह्मणतों.

## कराचीची कांग्रेस.

गेल्या आठवड्यांतल्या कराचीच्या राष्ट्रीय महोत्सवाचें साग्र वर्णन देणें आमच्या शक्तिबाहेरचें आहे. तथापि त्यांतल्या महत्त्वाच्या ठळक गोष्टींचा येथें उल्लेख करतो. या महोत्सवाचें मोठें महत्त्वाचें अंग ह्मणजे कांग्रेस. याचें धुरीणत्व यंदा मद्रासचे नवाब सय्यद महमद बहादुर या मुसलमान गृहस्थाकडे होतें व स्वागत करण्याचें काम ना. हरचंदराय यांनीं केलें नवाब साहेबाच्या भाषणाची लांबीरुंदी फार मोठी होती ते भाषणाच्या लांबीरुंदींत तरी अध्यक्षांनीं सरविल्यम वेडरबर्नसारख्याचें अनुकरण करावयाचें होतें अशी कुत्सितपणाची टीका स्टेटसमन पत्रानें केली आहे. ज्या आंग्लोइंडियन पत्रकर्त्यांना एखाद्या क्लबच्या भोजनाचे वेळचीं 'अहोरूपमहोध्वनिः'ची आठवण करून देणारी व मद्याच्या पेल्यानेंच काय तीं आर्द्र होणारीं पण एरव्हीं शुष्क भाषणें मैल मैल लांब कॉलमांत देतांना दिक्कत वाटत नाहीं त्यांना हिंदुस्थानच्या एकतीस कोटी लोकांच्या एकंदर जीवनांतल्या सुखदुःखांचा आक्रोश घटका दोन घटका ऐकून कंटाळा येतो तेव्हां एकतर त्यांच्या अंतःकरणांत मानवी दयेचा दुष्काळ पडला असला पाहिजे किंवा त्यांचीं मनें स्वार्थलंपटतेनें कठोर झालीं असलीं पाहिजेत. नवाब साहेबांच्या भाषणांत हिंदुस्थानच्या एकंदर राजकीय स्थितीचें सिंहावलोकन व त्यांतल्यात्यांत दक्षिण आफ्रिकेंतले हिंदी लोक इंडिया कौंसिल, हिंदुमुसलमानांची एकी वगैरे अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांचें विस्तृत विवेचन होतें. पण कांग्रेसच्या अध्यक्षांनीं वर्षांतून एकदा मिळणाऱ्या अमोलिक प्रसंगीं या गोष्टींचा खल करावयाचा नाहीं तर तो करायचा कोणीं व केव्हां? नवाब साहेबांच्या भाषणावरून या सर्व बाबतींत हिंदु पुढारी व मुसलमान पुढारी यांच्यांत कसें पूर्ण मतैक्य आहे तें मात्र स्पष्ट दिसून येते, आणि स्टेटस्मन कर्त्यांसारख्याच्या डोळ्यांत हीच गोष्ट खुपल्यामुळें त्यांना अध्यक्षांचें भाषण अप्रिय झालें असावें. अध्यक्षांच्या भाषणांत एका महत्त्वाच्या गोष्टीचा चांगला व्यापक विचार जसा केलेला आहे तसा अन्यत्र कोठेंही आह्मांस अद्याप आढळला नाहीं. ही गोष्ट ह्मणजे इंडिया कौंसिलाची सुधारणा ही होय. कांहीं वर्षांमागें हे कौंसिलच नको. असें कांग्रेस ह्मणत होती, आणि यंदा तर अध्यक्षांनीं त्या कौंसिलाचें अस्तित्व गृहीत धरून त्याची रचना कशी असावयास पाहिजे त्याचें विस्तृत विवेचन केलें. सकृद्दर्शनीं हा विरोध दिसतो. पण अध्यक्षांनीं फार मुद्देसूद रितीनें हे सिद्ध केलें आहे कीं दोन वर्षांपूर्वीं ह्मणजे मॉर्ले साहेबांच्या वेळेपर्यंत हें कौंसिल खरोखरच नको अशा पद्धतीनें काम करणारें होतें. पण मॉर्ले साहेबांनीं त्यात हिंदी मेंबर नेमून मध्यांत प्राण घातला. पुढें लार्ड क्रू यांनीं ही पुनरुज्जीवित झालेल्या संस्थेला महामृत्युंजय मंत्रेचा वळसा देऊन चांगली चालती बोलती करण्याचा निश्चय बोलून दाखविला. त्यामुळें उमेद वाटूं लागली, पण ही संस्था स्थापण्याचे वेळचा उद्देश ती निवळ सल्लागार असावी असा होता तो जाऊन ही संस्था अंगांत शक्तीचा संचार होतांच राज्यकारभारांत खोड्या करणारी निघेल अशीं लक्षणें दिसूं लागलीं आहेत, तेव्हां तिच्या पासून मिळणारा फायदा तेवढ्या राज्यकारभाराला व्हावा, पण तिच्या खोड्या मात्र चालु नयेत अशा रीतीनें तिला कसें नियमबद्ध करतां येईल, अशाविषयींची योजना नवाब सय्यद महंमद यांनीं तयार केली आहे ती खरोखर विचार करण्यासारखी आहे. आजच ती पूर्णत्वाला येऊन अंमलांतही येईल अशी अपेक्षा करणें वेडेपणाचें आहे. पण हळूं हळूं तिकडे धोरण असणें अत्यंत अवश्य आहे आमच्या मतें कांग्रेसच्या अध्यक्षाचा येवढा भाग अगदीं नवा, व अत्यंत महत्त्वाचा आहे. या संबंधानें लिहितांना कित्येक आंग्लोइंडियन पत्रांनीं लॉर्ड कारमायकेल साहेबांनीं बंगालच्या कायदे कौंसिलांत बिन-कामदार सभासदांच्या बहुमताच्या अधिकाराची मर्यादा स्पष्ट करून दाखविली होती या विषयाचें स्मरण करून दिलें आहे. पण या पत्रकर्त्यांनीं अध्यक्षाच्या भाषणाचा भलताच अर्थ घेतल्यामुळें हा त्यांना भ्रम झाला आहे. इंडिया कौंसिल एकदम निवडणुकीच्या तत्त्वावर उभारावें, आणि त्यांतल्या निदान निमे सुर्व्हिलियन साहेब लोकांना उठवून त्या हिंदी मेंबरांच्या स्वाधीन करावा असें त्यांचे ह्मणणें नाहीं, तर इंडियाकौंसिलचें ध्येय व धोरण काय असावयास पाहिजे व त्याच्या अधिकाराच्या मर्यादा कोणत्या असाव्या तेवढें त्यांनीं सांगितलें आहे. तेवढ्यावरून त्याची कल्पना ह्मणजे केवळ स्वप्नसृष्टि होतें असें नाहीं. त्याची कल्पना वास्तविक सृष्टींतली नसली तरी ती शक्य सृष्टींतली आणि इंग्रजांच्या उदार राजनीतीशीं अधिक सुसंगत आहे ही गोष्ट निर्विवाद आहे.

## भारतीय मुसलमान शिक्षण परिषद

✓ या संस्थेची वार्षिक बैठक ता० २६ रोजीं आग्रा येथें न्या. मू. शहादिन यांच्या अध्यक्षत्वाखालीं भरली होती. स्वागत कमिटीचे चेअरमन मि. अलीनबी यांचें भाषण उत्साहपूर्ण, प्रगतिपर, पण बेमस्तपणाचें झालें. कल्पनेच्या अंबांत तरंगणाऱ्या व स्वप्नसृष्टीच्या अवलोकनानें हर्षित होऊन त्या हर्षाच्या भरात वास्तविक सृष्टीला तुच्छ मानणाऱ्या वेड्या व उच्छृंखळ लोकांच्या विचाराशीं आमची कोणत्याही प्रकारची सहानुभूति किंवा एकवाक्यता नाहीं. तशी मि. नबीअली यांचीही नाहीं, व ते हिंदु आणि मुसलमान यांच्या सलोख्याविषयीं पूर्ण उत्सुक आहेत हे पाहून आह्मास संतोष वाटतो. मुसलमानांना आपल्या प्रगतीचा एकच साधनोपाय शिक्षण हा आहे ही गोष्ट पूर्णपणें पटली आहे व हिंदु आणि मुसलमान एकाच नौकेंत बसणार यात्रेकरूं सारखे आहेत हे ते आतां मोकळे मनानें कबूल करूं लागले आहेत ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. चिखल जरी वाईट असला तरी त्यांतून कमळासारखीं नयन मनोहर पुष्पें निर्माण होतात, त्याप्रमाणें हिंदुमुसलमानांचीं आजपर्यंतचीं भांडणें व तुर्कस्थानावरील संकट यामुळें हिंदुलोकांच्या सुशिक्षित लोकांच्या पुढाऱ्यांच्या खऱ्या दिलाची ही प्रचीती आली व कांग्रेसविषयीं त्या लोकांचे गैरसमज दूर होऊन तिच्या हेतूची शुद्धता, तिचे उद्देश, तिच्या कर्तव्याची दिशा वगैरे गोष्टी संबंधानें त्यांचे संशय दूर होऊन कांग्रेसशीं त्यांचेठायीं सहानुभूति उत्पन्न झाली आहे हेंही भावी उन्नतीचें पूर्वचिन्हच आहे. सारांश मुसलमानांच्या शिक्षणपरिषदेचा उद्देश निवळ शिक्षणापुरता जरी असला तरी त्याचे अप्रत्यक्ष परिणाम एकंदर मुसलमानांच्या देहात शिक्षणाबरोबर राष्ट्रीय जीवनाची जागृति करण्याचा आहे हें आजपर्यंतच्या त्या संस्थेच्या इतिहासावरून कोणालाही कळणार आहे. यादृष्टीनें यंदाची मुसलमानांची शिक्षणपरिषद मोठ्या उत्साहानें पार पडल्या बद्दल सर्वांना आनंदच वाटेल यांत शंका नाहीं.

## कौटुंबिक स्थितींतून व्यक्ति स्वातंत्र्या पर्यंत.

प्रमाण ४ थें

मागील अंकावरून पुढें चालूं

### आधुनिक गुरु

आपल्या समाजाची किती शोचनीय अवस्था होत चालली आहे हें नव्यानें सांगावयास नको. प्रत्येकापुढें हल्लीं हाच प्रश्न आहे कीं 'आमचे दिवस कसे तरी गेले पण आमच्या मुलांबाळांची पुढें काय अवस्था होईल' अशा निराशेंत आणि या उद्वेगांत मन कोठेंतरी समाधान व्हावें या बुद्धीनें बहकत जातें. हा यत्न स्तुत्य आहे पण भलत्याच मार्गानें लागलें असतां दिशाभूल होऊन इष्ट मुक्कामास आपण कधींच पोहोंचणार नाहीं इतकेंच नव्हे तर ज्या दुर्मिळ नरदेहाची इतकी प्रशंसा केली आहे त्याचा या कालक्षयानें नाश केला असें होईल. अधिक वेडगळ धर्म भोळेपणाचें समाजांत न येणाऱ्या आणि सर्वतोमुखीं झालेल्या सिद्धांताचे भिन्नभिन्न शास्त्रांतील परस्पर विसंगत आधाराच्या योगानें समाजाचें पूर्ण अहित झालेलें आहे. आपली अंतःस्थिती सुधारल्याशिवाय आपली सामाजिक स्थिती सुधारणें शक्य नाहीं गुरुशिष्यसंबंध अलीकडील १०-२० वर्षांत एक खूळ होऊं पहात आहे. या सार्वत्रिक वेडाचा कांहींतरी प्रतिकार केल्याशिवाय व त्याचा कांहींतरी निकाल लावल्याशिवाय आतां बरीगति दिसत नाहीं.

चांगल्याबरोबर कांहीं वाईटही संमिश्र असतें. या गुरुशिष्यसंबंधाबद्दल आमचे काय विचार आहेत याचें आह्मीं गेल्या पांचचार अंकात विवेचन केलेंच आहे. पूर्वीं हा संबंध प्राथमिक स्थितींतून कसा निघाला व त्याचें स्वरूप कसें होतें आणि तें समाजास किती हितकर होतें हे मागें सांगितलेंच आहे.

आता आमचें काम फार थोडें आहे सर्व लोकास सावध करून या विपयास योग्य तें वळण लावावें हाच आमचा उद्देश आहे. कोणाचा अपमान करावा, कोण्या विशिष्ट व्यक्तीचे दोष काढावे कोणाचीं मनें दुखवावींत असे क्षुद्र हेतु या लेखाच्या मुळाशीं नाहीत. परंतु लोकास योग्य वळण लागावें. लोकांतील वेडगळ समजुती, नष्ट व्हाव्या. गृहव्यवस्थेचा मुख्यपाया स्त्रीजाति आणि संतति यांना जोमदार कार्यक्षम विवेकी असें शिक्षण मिळावें ही सन्मार्गशील व्हावी व ज्यानेंत्यानें आपल्या गृहव्यवस्थेंत काय चुका होऊन राहिल्या आहेत हे पाहावें व आपला मार्ग सुकर करावा हीच आमची इच्छा आहे. प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य हें आहे कीं त्यानें आजन्म शिक्षण आणि शील संपादन करीत रहावें व शेवटीं शांतपणानें जीवयात्रा संपवावी. खरें धर्मरहस्य यांतच आहे. ज्यास मोक्षमोक्ष ह्मणून ह्मणतात त्यांचे गोडवे हिंदुधर्माशिवाय इतर कोठेंही गाइलेले नाहींत. हिंदुधर्मांत देखील जितके द्वैतवादी आहेत त्यांना मोक्ष, उपासना द्वारें व देवतेच्या तीव्र भक्तीनें साधणारें आहे. सर्व साधुसंतानीं उपासनाद्वारेंच ज्ञान मिळवावें असें सांगितलें आहे. भक्तीनें ज्ञान व ज्ञानपूर्वक भक्तीनें मोक्ष. हे तत्व रामदास, तुकाराम नामदेव, इत्यादि सर्व माहात्म्यांनीं आजन्म दैहिक, अध्यात्मिक आणि दैविकश्रम करून आपल्या ग्रंथातून प्रतिपादिलेंले आहे. ज्याला देवताभक्ति करितां येत नाहीं त्याला मानवभक्ति करितां येणें दुष्कर आहे. परंतु देवाबद्दल तसेंच मूर्तीबद्दल कल्पना भावना इत्यादि मानसिक अवस्थांबद्दल आपले विचार इतके चुकलेले आहेत कीं आता त्याचें पूर्वीचें सरळ वळण कधीं लागेल किंवा नाहीं हा देखील संशय वाटूं लागला आहे.

कर्म आणि भक्ति यांचाच विकास ह्मणजे साक्षात्कार--साक्षात्कार ह्मणजेच ज्ञान हे तत्व आपण विसरून गेलो आहों.

आत्मानात्म विचार मोक्ष विचार इत्यादि प्रकरण कृतीवर कांहींच परिणाम घडवीत नाहींत पण मनुष्यास नुकता वाचाळपंत मात्र बनवितात. ही गोष्ट आजचीच नाहीं तुकाराम महाराज इतके कंटाळले कीं शेवटीं त्यांनीं सांगितलेः--

॥ ऐका ऐका भाविक जन ॥
॥ कोण कोण व्हाल ते ॥१॥
॥ तार्किकाचा टांका संग ॥
॥ पांडुरंग स्मरा हो ॥२॥
॥ नका शोधूं मतांतरें ॥
॥ नुमगे खरें बुडाल ॥३॥
॥ कलीमध्यें दास तुका ॥
॥ जातो लोका सांगत ॥४॥

तुकाराम बुवांनां ही जी अडचण पडली तीच इतर महात्म्यांनाही पडली. त्यांच्या सारख्यांना देखील भिन्न मार्गी, भिन्न व्यवसाई मनें एकवटतां आली नाहींत. या वरून हें उघड आहे कीं सर्व विषयांत अध्यात्म विषय—अति कठीण व वादग्रस्त आहे कोणत्या एकाच रीतीनें सर्वांची समजूत होईल हें अशक्य आहे. परमेश्वर अनंतरूप आहे याचा तरी अर्थ हाच-मार्गे आह्मी ज्ञानाबद्दल लिहितांना ह्मटलें आहे कीं संपूर्ण विश्वयोनि एकत्र केली असतां जें रूप होईल तें ईश्वराचें अंश होईल. प्रत्यक्ष ईश्वरास पूर्ण रूप होण्यास अनंत अवतार घ्यावे लागले. एकेक मनुष्य इतका दुर्बोध व हीन बुद्धि आहे कीं त्यास सर्व शक्तिमान परमेश्वराची बरोबरी करितां येणें शक्य नाहीं. अशी बरोबरी करणें ह्मणजे एक प्रकारची परमेश्वराशीं प्रतिस्पर्धाच आहे. अहंभाव नष्ट करण्याच्या रीति अनेक आहेत. त्यांतील मुख्य पाहिली मी क्षुद्र जंतु आहे व एका सर्व शक्तिमान प्रभूचा अनुदात्य असून जें जें मी करतों तें तें सर्व त्या पालकाचा मला प्रसाद मिळवून देववो हा मनाचा पक्का निश्चय व तदनुरूप वागण्याचा यत्न.

दुसरी—जें जें ईश्वरांत आहे तें तें सर्व अनुभवण्याची ईश्वरानें मला शक्ति दिली आहे. मी सन्मार्गानें ईश्वर विहित नियमानें कोणाचाही द्वेष न करितां प्रत्येकाबद्दल व त्या बरोबर माझ्या स्वतःबद्दल करुणा भाकीत राहीन तर तो मला इष्ट तें देईल.

तिसरी—ईश्वर सर्व व्यापी आहे, ह्मणून तो माझ्यांतही आहे. माझें सर्व वर्तन त्यास रूचेल असें असलें पाहिजे इत्यादि या सर्वांत तिसरी रीति फार धोक्याची आहे. इच्यानें जो अहंभाव आपण नष्ट करावयास पहातो तोच अहंभाव वृद्धिंगत होतो व अखेर मनुष्य सेटन प्रों किंवा सुंदोपसुंदादि राक्षसाप्रमाणें किंवा प्रत्यक्ष विश्वामित्रा प्रमाणें ईश्वराचे प्रतिस्पर्धी झाल्याची उदाहरण सर्वश्रुत आहेतच. मनुष्याचें खरें कर्तव्य आपले त्रिविध ताप जाळून सर्व शक्तिमान परमेश्वराची सेवा करण्याचे आहे. मोक्षार्थ यत्न करणे दुर्घट आहे प्रथमतः मोक्ष आहे किंवा नाहीं याचाच मोठा वाद आहे, नंतर तो आहे अशी मनाची खात्री पटल्यास त्यासाठीं सत्गुरु पाहिजे. येथें सत्गुरूचा अर्थ इतकाच कीं-

॥ ब्रह्मानंदं परम सुखदं केवलं ज्ञानमूर्तिं ॥
॥ द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्व मस्या दिलक्ष्यम् ॥
॥ एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षीभूतम् ॥
॥ भावातीतं त्रिगुणरहितं सत्गुरुतं नमामि ॥

हा श्लोक बहुतेकांच्या पाठांत आहे. परंतु बहुतेक आधुनिक गुरु या श्लोकाचा विपर्यास करून हा ते आपण स्वतःस लावून घेतात. या श्लोकांत अति महत्वाचा शद्व **एकं** व दुसरा **नित्यं**. हल्लीं घरोघर हिंडणाऱ्या शिष्य कार्यार्थी गुरूंस जन्ममरण नाहीं काय? बरें तें असेल तर पूर्वजन्मीं व पुढील जन्मीं ते त्याच शिष्यांच्या मागें लागलेले आहेत हे संभवूं शकतें काय? ते देशकाल पात्रातीत आहेत काय? या श्लोकांतील सत्गुरु एका परमात्म्याशिवाय दुसरा कोणी असूं शकतो काय? हे ध्यान जगत्गुरु दत्तात्रेयांचें आहे. तेच **नित्य** व **एक** आहेत. हल्लीं प्रवासामुळें एक मनुष्य पृथ्वीच्या या टोकात आहे तर दुसरा त्या टोकास असतो अशांना जन्मोजन्मीं मानवकायारूपी तोच सत्गुरु सर्व ठिकाणीं मिळूं शकतो काय? जेलोक आपल्यास हा श्लोक लावून घेतात ते देवाची आगळीक करीत नाहींत काय? याच श्लोकात हल्लीं जी समाजात भोळेपणाची वेडगळपणाची समजूत शिरत चालली आहे तिचें बीज आहे.

अपूर्ण

---

## यंदाची राष्ट्रीय सभा दुसरा दिवस

राष्ट्रीय सभेचे यंदाचें अधिवेशन कराची येथें ता० २६।२७।२८ डिसेंबर रोजीं झालें. नेहमींप्रमाणें सभामंडप उत्तम रीतीनें शृंगारलेला व विस्तृत होता. सिंधप्रांतांत अगदीं एकीकडे असतां व तेथें सृष्टीसौंदर्य किंवा तीर्थें वगैरे कांहीं नसतां बाहेरचे दूरदूरच्या प्रांतातले ४०० प्रतिनिधी केवळ राष्ट्रीय सभेच्याच यात्रेसाठीं जमले यावरून लोकांमध्यें राजकीय सुधारणेच्या महतीची बरीच जाणीव उत्पन्न झालेली दिसते. पहिल्या दिवशीं स्वागत कमिटीचे चेअरमन ना० मि० हरचंदराय व अध्यक्ष नवाब सय्यद महमद यांचीं भाषणें झालीं. या भाषणांसंबंधानें आह्मी आज दुसरीकडे थोडें लिहिलेंच आहे. दुसरे दिवशीं दक्षिण आफ्रिकेच्या प्रश्नाबद्दलचा ठराव मद्रासचे दिवाण बहादूर गोविंद राघव अय्यर यांनीं पुढें आणिला. सदर प्रश्नच्या निकालासाठीं दक्षिण आफ्रिकेंतल्या सरकारनें नमिलेलें कमिशन आह्मांस मान्य नाहीं असा नापसंतीचा शिक्का राष्ट्रीय सभेनें त्यावर ठोकला. याच संबंधांत लार्ड हार्डिंज साहेबांनीं कलकत्त्यास केलेल्या उपदेशाचाही विचार व्हावयास पाहिजे होता. पण व्हाइसराय साहेबांचें भाषण वेळेवर हातीं न आल्यामुळें तो व्हावयाचा राहिला ही मोठी खेदाची गोष्ट ह्मटली पाहिजे. या ठरावावर बोलणारात हिंदु व मुसलमान दोन्ही जातीचे लोक होते. यावरून हा जातीविषयक प्रश्न नसून नागरिकत्वाच्या हक्काच्या मूळतत्त्वाचाच प्रश्न आहे हें उघड होतें. याच वेळीं दक्षिण आफ्रिका मदतफंडास जपानांतल्या हिंदी लोकांनीं वर्गण्या जमवून ९९०० रुपयांची रक्कम पाठविली आहे असेंही मुर्वतमान अध्यक्षांनीं विदित केलें. या दुसऱ्या दिवशींच्या कार्यक्रमांत दुसरी एक विशेष गोष्ट ह्मणजे मॉस्लेम लीगनें ब्रिटिश साम्राज्यान्तर्गत स्वराज्याचें कांग्रेसचें ध्येय मान्य करून कांग्रेस विषयीं एकप्रकारची सहानुभूति दाखविली त्याबद्दलचा अभिनंदनपर ठराव होय. हा ठराव ना. भूपेंद्रनाथ बसु यांनीं आणिला. कांग्रेस विषयींची सहानुभूति आतां पुष्कळ मुसलमान सुशिक्षित पुढारी निःशंकपणें व्यक्त करूं लागले आहेत हें जसें त्या जातीच्या प्रगतीचें चिन्ह आहे त्याच प्रमाणें कांग्रेसच्या अंगीं असलेल्या कार्यक्षमतेचें ही तें चिन्ह आहे. कांग्रेस मृतवत् झाली, आतां ती एका पक्षाची झाली आहे, तिला पक्षघात झाला आहे, तिच्या हातून आतां कोणतेंही देशकार्य घडणें शक्य नाहीं अशी कोल्हेकुई करणारांची तोंडें या हिंदुमुसलमानाच्या ऐक्यानें आतां बंद पडली पाहिजे. न्याय व अंमलबजावणी खातीं निराळीं करण्याबद्दलच्या जुन्या ठरावाचीही या दिवशीं पुनरावृत्ति झाली.

---

## कांग्रेस-तिसरा दिवस

या दिवशीं बरेच महत्त्वाचे विषयावर ठराव करण्यांत आले. कानडांतल्या शीख लोकांना भोगाव्या लागणाऱ्या त्रासांची कहाणी चालली असतां मीर अयुबखान नांवाचे एक मुसलमान गृहस्थ काँग्रेसाविषयींचे आपलें प्रेम व्यक्त करण्यास पुढें सरसावले. याच बैठकीला प्रेस आक्टाबद्दलचा ठरावही ना. भूपेंद्रनाथ बसु यांनीं पुढें आणिला. ते ह्मणाले कीं सरकारनें घाबरलेल्या मनाच्या स्थितींत घाई घाईनें हा कायदा पास करून घेतला. पूर्वींचे राज्यकर्ते असे घाबरे नव्हते. ते धीराचे होते. त्यांनीं हिंदुस्थानाला अराजक स्थितींतून काढलें; त्यांनींच १८३७ मध्यें मुद्रणस्वातंत्र्य दिलें. १९१० सालच्या कायद्यानें त्याच्या श्रमावर पाणी फिरविलें. या कायद्यानें राजद्रोहाचा बीमोड तर होत नहींच, पण जो राजद्रोह दृश्य स्वरूपांत दिसला असता त्याला अंधारात करण्याची मात्र सोय करून दिली आहे. हें अधिक भयंकर आहे. या कायद्याचा नमुना सर हर्बर्ट रिस्ले साहेबानीं आस्ट्रियांतून आणिला! मि. बसूनीं हल्लींच्या कायद्यांतले दोष व त्यापासून उद्भवणाऱ्या अडचणी यांचें साविस्तर विवेचन केलें व कायदा पास करतांना ज्या गोष्टी दुष्परिणाम टाळण्यासाठीं ह्मणून योजिल्या आहेत असें लॉ मेंबरानें सांगितलें त्या गोष्टी कशा निरर्थक व रक्षण करण्यास असमर्थ आहेत तें उदाहरणासह दाखवून दिलें. सध्या बसलेल्या पब्लिकसर्विस कमिशननें विचारांत घेण्यासाठीं कांग्रेसनें सात आठ गोष्टींबद्दलच्या शिफारसीही केल्या व त्यानंतर कायमची जमाबंदी पद्धत, लष्करी खात्यांतल्या जागा, युनिव्हर्सिट्या, धंदेशिक्षण, कलकत्ता युनिव्हर्सिटीचे लेक्चरर संबंधानें हिंदुस्थान सरकारनें केलेली अविचाराची गोष्ट, स्वदेशी चळवळ, संयुक्त प्रांत व पंजाब यांना कौन्सिलें देण्याची अवश्यकता, व दक्षिण आफ्रिकेतल्या प्रश्नासंबंधानें विलायतेंत चळवळ करण्यासाठीं डेप्युटेशन पाठविण्याची जरूरी, न्याय व अंमलबजावणी खात्यांचा संबंध तोडणें, ब्रिटिश कांग्रेस कमिटीच्या कामाची प्रशंसा वगैरे अनेक ठराव झाल्यावर मि. गांधी याना उत्तेजनपर अशी तार पाठविण्यांत आली व नंतर अध्यक्षांचा समारोप होऊन सभेचें कार्य समाप्त झालें. कांग्रेसचें काम या तीन दिवसांपुरतेंच नसून वर्षभर चाललें पाहिजे असा आक्रोश यंदाच्या अध्यक्षांनींही पुनः केला. त्यांचा तो आक्रोश अरण्यरुदिताप्रमाणें निष्फल होईल अशी आह्मांस भीती वाटते. पुढची कांग्रेस मद्रासला व्हावयाची आहे. यंदाच्या कांग्रेसला सर फेरोजशहा मेथा, ना. गोखले, मि. सुरेंद्रनाथ बॅनर्जी, पंडित मदन मोहन मालवीय, वगैरे बडी बडी मंडळी मुळीच आली नव्हती हें त्यांच्या स्वदेशाभिमानाच्या बाण्यास कमीपणा आणणारें आहे खरें, पण येवढ्या वरून कांग्रेस विषयींची लोकांची आस्था कमी झाली आहे असा निष्कर्ष आंग्लोइंडियन पत्रकर्ते काढतात तो मात्र अगदीं खोटा आहे. यंदाच्या कांग्रेसला दीडशेंहून अधिक मुसलमान प्रतिनिधि आले होते. कांग्रेसाविषयींच्या वाढत्या आस्थेचेंच हें लक्षण काय?

---

## वीरोचित उद्गार.

संकट समय हाच माणसाच्या शीलाचा खरा परिक्षक आहे असें म्हणतात तें अक्षरशः खरें आहे. देशाच्या पुढाऱ्यांच्या शीलाची तीच एक खरी कसोटी आहे. दाक्षिण आफ्रिकेतले हिंदी लोकांचे देशी व युरोपियन पुढारी या कसोटीला पूर्णपणें उतरत आहेत हें पाहून कोणाला साभिमान आनंद होणार नाहीं. मि. गांधी व त्यांच्या पत्नी यांच्या परिक्षेच्या गोष्टी आता सर्वांस विदितच आहे. मि. गांधी याचे पूर्णसाह्यकर्ते मि. पॉलक व मि. कालेन बाच यांना म्याजिस्टेटनें कैदेच्या शिक्षा ठोठावल्या त्यावेळचे त्यांचे उद्गार प्रसिद्ध झाले आहेत ते त्यांच्या सारख्या काय पण कोणाही वीराला भूषणास्पद होतील. दोघानींही आपणास काय शिक्षा भोगावी लागेल याची चिंता न वाहतां स्पष्टपणें सांगितलें कीं ना. गोखले याचे आह्मी मित्र आहों, हिंदी लोकांना येथें अन्यायानें वागवितात ह्मणून त्यांचा पक्ष आह्मीं उचलला आहे व यासंबंधात आमची मनोदेवता सांगते त्याप्रमाणें आह्मी वागतों. मार्गात कांहीं संकटें आलीं तरी त्यांचा विचार आह्मी करीत नाहीं. आह्मी अशाच न्यायाच्या सरळ मार्गानें जाणार. तुह्माला काय हवी तेवढी आह्मांला शिक्षा करा, आह्मी आपला क्रम सोडणार नाहीं. केवढें छातीचें व वीरोचित हें भाषण! नाहीं तर पाचवार वर्षांपूर्वी राजद्रोहाबद्दलच्या फिर्यादींचा सुळसुळाट इकडे झाला होता त्यावेळीं कित्येक महाराष्ट्र वीरांनीं संकट

घेतांच शेपटें घालून सर फेरोजशहाचा मंत्र तोच आमचा गुरुमंत्र असें सांगून स्वतःची कातडी बचावण्याचा निंद्य प्रयत्न केला होता! एरव्हीं हव्या तेवढ्या देशाभिमानाच्या आणि आत्मत्यागाच्या लंब्या चवड्या बाता मारावयाच्या आणि लेखाबद्दलचा जाब देण्याची वेळ आली कीं वर्तमानकाळ कीं भूतकाळ अशा व्याकरणाच्या हास्यास्पद कोट्या करून किंवा सर फेरोजशहासारख्याच्या हातास हात लावण्यास पाहून स्वतःवरचें संकट टाळण्याचा यत्न करावयाच्या, फिरून आह्मी केवढे वीर बहादर ही फुशारकी आहेच! अशा तऱ्हेचे देशाभिमानी डोमकावळे कोणिकडे आणि मि. पॉलॉक किंवा मि. कालेन ब्राच यांच्यासारखे खरे खरे न्यायाचे मित्र व पुरस्कर्ते वीर बहादर कोणीकडे!' काचः काचो मणिर्मणिः.

## सामाजिक परिषद

सामाजिक परिषदेचे मुख्य सेक्रेटरी न्या. सर नारायणराव चंदावरकर यांना आपल्या प्रास्ताविक भाषणाला यंदा ब्यांकांचीं दिवाळीं हा आयताच विषय मिळाला ब्यांकाची अवस्था व दिवाळीं यावरून हिंदी लोकांच्या चारित्र्यांतल्या छिद्रांचें अन्वेषण करून सर नारायणराव यांनीं अतिशय संतापानें स्वदेशी उद्योगधंद्याची निर्भर्त्सना केली, आणि आमच्या लोकांचें शील सुधारणें हें सुधारणेचें मुख्य कार्य घडल्या शिवाय आमचें पाऊल पुढें पडणार नाहीं असें सांगितलें. सर नारायणरावाच्या भाषणांतल्या सारभूत तत्वासंबंधानें वाद नाहीं. पण त्यांनीं स्वदेशी चळवळीच्या माथीं दिलेलें अपश अनाठायीं व अविचारानें दिलें आहे असे कोणालाही वाटल्यावांचून राहणार नाहीं. ॲडव्होकेट ऑफ इंडिया सारखीं आंग्लो इंडियनपत्रें स्वदेशी चळवळीचे गोडवे गाणारीं नाहींत, पण त्या पत्रकर्त्यांला सुद्धां चंदावरकराच्या भाषणांतला हा भाग आक्षेपार्ह वाटला. कोणत्या व्यवहारात ठेचा खल्लयाशिवाय शहाणपण येत असतें? कोणता देश व्यापारात क्रांति घडवून आणणारीं दिवाळ्यांसारखीं प्रकरणें अनुभविल्या शिवाय एकदम सात्विक उत्कर्षास चढला आहे? इंग्लंड देश हा चंदावरकराना स्वर्गतुल्य वाटतो, पण तेथेंही साउथसी बबल सारखीं कोट्यावधि कुटुंबांना दुःखार्णवांत लोटणारीं कपटकृत्यें झालीं नाहींत काय? सारांश सर नारायणराव यांनीं स्वदेशी चळवळीवर दात ओठ खाण्यासारखें मोठें पाप त्या चळवळीनें केलेलें नाहीं, व अशा मोडक्यातोडक्या विषयाचा आश्रय करून आमच्या लोकांचें शील सुधारण्याचा चंदावरकराचा प्रयत्न हास्यास्पद आहे. दुसऱ्याला उपदेश करण्याचें काम सोपें आहे., तें करण्यास सर साहेबासारखे थोर व विद्वान् गृहस्थ नकोत. त्यांच्यासारख्यांनीं प्रत्यक्ष एखादें सुधारणेचें कृत्य करून दाखवावें. सरसाहेबानीं असें कोणतें कृत्य आजपर्यंत करून दाखविलें आहे? त्यांना इंदूर संस्थानचीं राज्यसूत्रें हातीं घेऊन जवळजवळ वर्ष होत आलें. या अवधींत त्यांनीं दहापांच व्याख्यानें देण्यापलीकडे कोणतें शतकृत्य केलें आहे? त्यांच्या शीलाचा ठसा संस्थानच्या कोणत्या कारभारावर उमटलेला दिसूं लागला आहे? स्वदेशी चळवळीला जसें शील व कर्तृत्व लागतें तसें संस्थानच्या राज्यकारभारालाही लागतें. आणि व्यापारासारख्या गोष्टींत सदर गुणांच्या अभावामुळें अपेश येणें जितकें वाईट आहे, त्यापेक्षां ही राज्यकारभारासारख्या कामीं अपेश मिळविणें अधिक वाईट आहे हें सर साहेबासारख्यांना आह्मीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. सामाजिक सुधारणेबद्दल बोलतांना पुढाऱ्यांनीं दुसऱ्यावर शितोडा उडवितांना दूरवर विचार व आत्मनिरीक्षण करण्याविषयीं फार सावधगिरी ठेविली पाहिजे

## ईश्वरी प्रेरणा

समुद्राला भरतीनें व पूर्ण चंद्रानें जशी मनोहर शोभा येते त्याप्रमाणें नाताळच्या परिषदा, सभा, मंडळें इत्यादिकांनीं आणि राष्ट्रीय पुरुषरत्नांच्या संकल्प दिप्तींनीं निराळा जोम, जिव्हाळा व जीवनकला यांच्या लाटा आमच्या राष्ट्रसमुद्रावर खेळूं लागतात आणि सर्व राष्ट्रभर एक विलक्षण संघशक्ति नवीन राष्ट्र बनवीत आहे किंवा भावी ब्रिटिश साम्राज्याचा कोहिनूर हिरा जवाहिऱ्याच्या यंत्रशाळेंत पैलू पाडून शोभिवंत असा तयार करीत आहे असा भास होतो. नाताळचे विचार मेघ शिशीरातल्या मेघडंबराप्रमाणें फोल नाहींत तर नव्या सुरूं होणाऱ्या सालांत पूर्णतेस न्यावयाच्या कार्यमालेसाठीं ते मृग नक्षत्राचे मेघ कर्मभूमी बीजवाही व गर्भधारक अशी करीत आहेत मृगाचा पर्जन्य जसा शेतकऱ्यांच्या उद्योगधंद्याला प्रारंभ करितो त्याप्रमाणें हे वार्षिकी महोत्सव राष्ट्रकार्याचा पुण्य क्षण सूचवितात आणि नव्या वर्षाच्या कार्यरेषा आंखून देत असतात. राष्ट्रीयसभा, औद्योगिक परिषद्, सामाजिक परिषद्, धार्मिक परिषदें इत्यादि बहुविध संस्था राष्ट्रपुरुषाला एक सुविचाराच्या विद्युच्छक्तीचा एवढा झोंका देतात कीं त्या योगानें वैराष्ट्र वर्षभर आपल्या प्रगतीच्या पंथात आंदोलन करीत करीत पुढें पुढें सरकत जात असतें. एवढ्या अफाट खंडा सारख्या या द्वीपकल्पात सर्वत्र विचार जागृती उद्भूत होते आणि उत्तरोत्तर प्रजा व राजा यांचा परस्पर संबंध इतका दृढ परिपक्व व प्रेमवाही होत चालला आहे कीं क्षणभर मन आनंदानें गुंग व तल्लीन होतें आणि अशी पक्की साक्ष देते कीं या नाताळच्याच मुहूर्तावर आमच्या राष्ट्राची हृदयंगम उभारणी होत चालली आहे. अशा प्रसन्न मनोवृत्तीचा उल्हास ह्मणजे ईश्वरी प्रेरणाचीं चिन्हें होत.

## वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—थंडी विशेष. आकाश साभ्र. कॉलरा बहुतेक नाहींसा झाली. किरकोळ ज्वरादि दुखणीं चालू आहेत. बाजार भाव कडकत चालले आहेत परंतु लवकरच उतरतील.

**पदवीदान**— नूतनाब्द पदवीदानांत या वर्षी रावबहादूर रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांस सी आय. ई. ची पदवी मिळाली. नारायणदाजीबा वाडेगांवकर रावबहादूर झाले. विद्या खात्यांतील सुप्रसिद्ध हेडमास्तर महमदखां बी. ए. खानसाहेब झाले व केशव वामन ब्रह्म रावसाहेब झाले. चारही पदव्या वरील गृहस्थांस या पूर्वींच मिळावयास पाहिजे होत्या. उशीरानें कां होइना पण सरकारानें गुणग्राहीत्व दाखविलें. वरील चारही सद्गृहस्थाचे आह्मीं अभिनंदन करितों.

**कायदे कौंसिल**—निवडणकीचा ज्यांना हक्क आहे अशा म्युनिसिपालिट्या, डिस्ट्रिक्ट कौंसिल व जमीनदार यांच्या याद्या तयार होत आहेत. कौंसिल येत्या जुलई महिन्यात सुरू होईल. निवडणूक येत्या एप्रील महिन्यांत होईल. जुलई व आगस्ट महिन्यात कौंसिलचें काम नियमितपणें चालेल.

रा. रा. जी. डब्ल्यू गेभर यांस पुनः आकोल्यास पोलीस सुपरिन्टेंडंट नेमण्यात आलें.

रा. रा गौरीशंकर दुबे, मुनसफ उमरावती यांस पुसद येथील कोर्टावर बदलले.

रा रा माधव मुकुंद गोवलकर मुन्सफ यांस उमरावतीस नेमण्यांत आलें.

## नोटीस

नोटीस बेशमी शीवनारायण रामसुकदास रा० आकोट यांस—

खालीं सही करणार यांज कडून नोटीसीनें कळविण्यांत येत आहे कीं, आमचे मालकीच्या दुकाना आकोट येथें शंकरलाल नरसींगदास या नावानें आहे. व मौजे पळसोद येथें श्रीकिसनदास बाळकिसनदास या नावानें आहे. सदहू दोन्ही दुकानावर रक्कम आमची लागत असून नफ्या नुकसानीत तुमचा हिस्सा होता. परंतु दुकाना संबंधीं कोणतेंही स्थावर मालावर व आसाम्या कडून घेणे असेल त्या रकमेवर तुमची मालकी कोणतेही प्रकारें नाहीं. तुमचे नफ्या नुकसानांचे हिस्या बद्दल तुह्मी आमचे पासून ता० १८।१०।१९१२ ईं॥ रोजीं तुमचे कडील मागील घेणें वजा जातां रुपये ५१०० शें घ्यावे असा ठराव झाला. तो ठराव असा कीं, दुकाना संबंधी वह्या, कागदपत्रें सर्व हिशेब समजावून आमचे स्वाधीन करून द्यावें. व ता. १८।१०।१९१२ पर्यंत झालेले हुकूमनामे आमचे नांवे ट्रान्स्फर करून द्यावें. आणि फारकती रजिष्टर करून द्यावी. नंतर तुह्मास रुपये आह्मी द्यावें अशा बद्दलचा तुह्मी आह्मांला लेख करून दिला आहे. त्या पैकीं काहीं कागदपत्र व वह्या आह्मांला दिल्या. व काहीं कागदपत्र व हिशेब समजावून दिले नाहींत व हुकूमनामे ट्रान्स्फर करून दिले नाहींत. ज्या वह्या आमचे ताब्यांत आल्या त्यांत पाहतांना गंगाराम सुरजमल अडगांवकर यांज कडे रुपये ५९३॥-॥ घेणे आहे. तें त्यास मागीतले असतां तो नाकबूल करितो. आणि तो ह्मणतो कीं, माझे नांवानें झालेला व्यवहार तो शीवनारायण यांचा घराऊ आहे. करितां त्या रुपयाचे जबाबदार ते आहे. या शिवाय जीनच्या वह्या वरून पाहतांना दोन सालचे रुपये ८५० तुह्मी नोकरी बद्दल उचलून घेतले. तें रुपये दुकानांत जमा केले पाहिजे होते. करितां एकूण रुपये १४४३॥-॥ व्याजासह असे आह्मास ठरविलेल्या रुपयांतून मुजरा करून देणें व बाकीचे जे काहीं हिशेब करून निघेल ते रुपये घेऊन जावे अशा विषयीं तुह्मांला आह्मी पुष्कळ वेळां सांगीतले. परंतु तुह्मी त्या प्रमाणें केलें नाहीं. व फारकतीही आह्मांला रजिष्टर करून दिली नाहीं करितां आतां या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं, नोटीस पोहोंचल्या पासून ८ दिवसाचे आंत फारकती रजिष्टर करून देऊन वर लिहल्या प्रमाणें रुपये घेऊन जावें. तसें न केल्यास कायद्या प्रमाणें व्यवस्था केली जाईल. आमचे ऐकण्यांत आलें आहे कीं, तुह्मी वर लिहल्या प्रमाणें सदहू दुकानचा सर्व हक्क सोडल्या नंतरही दुकानचे आसाम्या कडून रकमा वसूल करित आहांत. असें जर केले तर तुमचे वर कायदेशीर काम चालविण्यांत येईल. व त्या सर्व खर्चा बद्दल तुह्मी जबाबदार राहाल. या शिवाय दुसरी जी कांहीं दुकानची नुकसानी होईल त्याची जबाबदारी तुमचेवर आहे. तुह्मी जी जाहीर नोटीस दिली आहे ती खोटी आहे. ता० ३१।१२।१९१३ दस्तुर त्र्यंबक बाळाजी सही

शंकरलाल नरसिंगदास मालक प्रेमसुखदास भिकमचंद तर्फे मुखत्यार देवीदास छोटमल द. खु.

नों. नं. १६


अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले.

## ओटो मोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. १ औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—ओरियंटल ड्रग आणि केमिकल कंपनी गोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. १७

| | |
|---|---|
| **तांबूल नवरत्न** | न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबको सलाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे. |
| **नवरत्न टेबलेट** | उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे. |
| **नवरत्न तमाखु** | पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा. |
| **मद्रासी नस** | अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे |
| **गजकर्णाचें मलम** | गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे. |
| **केश काढण्याचें तेल** | केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे. |
| **चन्द्रकांत बाम** | मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे. |

बनविणार टी. एम. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट- चमन कंपनी.

पत्ता— ताजनपेठ बाजार- आकोला.

नो. नं. १०



Oriental Government Security

Life Assurance Company, Limited,

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

R. PATERSON BROWN, MANAGER.

**FUNDS EXCEED 4¼ CRORES.**

Claims paid for over 3½ Crores.

***ALL PERSONS***

WHO ASSURE FOR THE FIRST TIME
OR
WHO INCREASE THEIR PRESENT ASSURANCE
WITH

***THE ORIENTAL***

BY EFFECTING A WITH PROFIT POLICY
ON OR BEFORE 31 ST DECEMBER 1913 WILL BE ENTITLED TO

**THREE YEARS BONUS**

PROVIDED
THREE YEARS PREMIUMS HAVE BEEN PAID
AND
THE POLICY IS IN FORCE ON 31 ST DECEMBER 1915.

Prospectus, forms, and further information can be obtained on application to—
CHIEF AGENCY FOR C. P. BERARS AND KHANDESH,—
NAGPUR.

M. DESOUZA
CHIEF AGENT
*Nagpur.*

No N. 11



**त्रिकाल दर्शी आरसा?**

तुह्मास भूत, भविष्य वर्तमान जाणणे असल्यास ही जाहीर खबर वांचून त्वरित ऑर्डर धाडा. ह्या आरशासारखें त्रिकाळ ज्ञान प्राप्त करण्याचें साधन जगांत दुसरें एकही नाहीं. तत्संबंधानें शेकडा सरटीफिकीटें मिळालीं आहेत. श्रद्धाळू मुलें, स्त्रीया आणि पुरुष स्वतःचे विचार आणि त्यांचे परिणाम पाहूं शकतात. गांव परगांव दूर देशांतर आणि दूरच्या मित्र व सोयऱ्यांच्या रस्त्या तुह्मांस सहज मिळूं शकतील. अमूक काम होईल किंवा कसें? अमूक बाबतींत काय परिणाम होतील, व्यापारांत नफा किंवा तोटा, अमुक पदार्थाच्या किंमतीची कमीजास्ती, परीक्षेचे परिणाम, चाकरी वगैरे कांहीं तुमच्या मनाचा खुलासा करावयाचा असेल तो सर्व होऊं शकेल किंमतः—

| | |
|---|---|
| साध्या काचेचा रु. २९ | प्रत्येक |
| बिल्लोर काचेचा मजबूत रु. ३-९ | पोस्टेज |
| मुद्दाम मोठे बिल्लोर कांचेचा मजबूत रु. ६ | सहित |

हिंदुस्थाना बाहेरच्या ग्राहकानें २ रु. जास्त धाडावे.

आशाभाई वाघजीभाई पटेल मु०
करमसद, ता० आनंद जिल्हा खेडा.

नो. नं. १२



**वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.**

**नामर्दास मर्द बनविणारी**

**राजवंशी नवरत्न याकुती,**

**किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"**

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

**राजवंशी साळ्याचें तेल,**

**किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो"**

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे ॲनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकेटें दिलीं आहेत.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट, यांचा दवाखाना.
३८ जांवळी मोहल्ला मुंबई.

नो० नं० १३



सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

**आयोडाईज्ड सार्सापरिला.**



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धिवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याचा सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ. गौतमराव केशव
५६३ ठाकूरद्वार मुंबई.

नं० नं० १४


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४८ ] आकोला-- सोमवार तारीख १२ माहे जानेवारी सन १९१४ इ० अंक २

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवी ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठीमागून येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

### मुंबइ बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ ¾ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. Phillips. एजंट
नो० नं० २

### अनायासें देवदर्शन.

नेटपेपर्सः-- श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेप्रनाइटे नोट पेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकी किंमत ८८ व्हीपीनें ०१२ दोन्ही मिळून किंमत रु. १ व्हीपीनें रु० १८६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता--ब्रेंद्रे आणि कंपनी पणेसिटी
नो० नं० ३

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८०

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरुज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानांवर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ४

### 'विकावयाचा आहे.'

वाशीम येथील, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टाजवळ असलेला कै॥ राव बहादूर पुरुषोत्तमराव नारायणभट यांचा बंगला विकावयाचा आहे.

खंडवा ते इंगोली व्हाया वाशीम लैकरच रलवे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूंनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ९ वऱ्हाड

### रामबाण उपाय.

**रक्त पिती व कोड**

दहाहजार पुड्याफुकट. आम्हीं आमच्या औषधाची खात्री पटावी ह्मणून १०००० नमुन्याच्या पुड्या करण्याचें योजिलें आहे या पुड्या वरील महारोग दुरुस्त होण्यासारख्या आहेत. हे त्या निःसंषय सिद्ध करितील या पुड्या वापरून अनुभव पहावा ह्मणजे खात्री होईल. नमुन्याच्या पुडीची किंमत फक्त ०८ ठेविली आहे. ही किंमत फक्त टपाल हशील वगैरे खर्चापुरतीच आहे.

२ आह्मीं रक्तपिती; कोड, हे कसे उद्भवतात त्याची शुश्रुषा कशी करावी? वगैरे माहितीचें इंग्रजी व बंगाली भाषेंत पुस्तक तयार केलें आहे तेंही पण गरजूंनीं अवश्य वाचण्या लायक आहे. ह्मणजे त्या पापापासून त्यांचे संबंधीं रोगांची पूर्ण माहिती होईल किंमत फक्त ट. पा. सह ॥= सर्व पत्र व्यवहार इंग्रजींत करावा.

पण्डित कृपाराम
८ नंदीबागानलेन पो. सालकिया जि.
नं. ६ हावरा.

### "भानगड नको."

१ खरुज, गजकर्ण, खवडा, फोड, खाज, आगपैग, दाद, अजुत, भद, नख धावने, मुकी खाज, आग व पाणी सुटणे व साधारण कोणत्याही त्वचा विकारांवर १ च मलम १-२ वेळ लावल्यानें गुण देऊन ३ दिवसात कायमचा फायदा होतो. किं ४ आणे.

२ कापूर, शोप, पुदीना, पेपरमिंट, ओवा, हिंग, दालचिनी, दोडे, यांचे असल अर्क उपयोग सोबत असतो किं ४ आणे.

३ केंस जाण्याची बरीच औषधें निघालीं त्यांत बरेंच विकार ग्राहकांचे नजरेस येतात पण आमचें औषधानें जागा काळी न पडता व इजा नहोतां फारच लवकर केस जाऊन, लवकर येत नाहींत किं. फक्त २ आणे.

पत्ता--व्हि. आर. मुळे. नांदुरा.
जी. आय. पी.
नो. नं. ७

### नोटीस

नोटीस बेशमी बापुजी वा उदेभानजी वडे मु० पळशी बु० ता० आकोला. यांस खालीं निशानी करणार नोटीस देतो कीं मी तुमचें शेत ९ वर्षाचे करारानें वाहतो. त्याचे स्वामित्वाचे रुपये १९१२ बदल ठरावीक रुपये १८७॥- यांत १४६॥। रु. मी तुह्माला दिले व ४०॥- देणें राहिले. हें रुपये व १९१३ सालाबदल १८७॥- रुपये हे सर्व रुपये मी तुह्मास देण्यास तुमचे येथें आलों असतां तुह्मी हें पैसे न घेतां त्यापैकीं फक्त वायदा ९१॥। एक्यावण रुपये बारा आणे घेतला. बाकीची रकम घेतली नाहीं. त्यावर या दान वेळचे पैसे व चालू सालचे १८७॥- एकुण सर्व ३६४॥= तीनशे चौसष्ट रुपये तीन आणे मी पटवाऱ्याचे समोर तुह्मास देत असतां तुह्मी घेतले नाहींत. यावरून तुमचे मनांत कपट दिसते तरी हे रुपये ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत घेऊन जावे तसें न केल्यास पुढें तुह्मास देणें असलेल्या या रकमेबदल व होणाऱ्या व्याजाबदल मी जबाबदार नाहीं. मी दरवर्षी तुह्मास पैसे देत असतां तुह्मी मुद्दामच घेत नाहीं. तेव्हां हा दोष मजकडे नाहीं व यामुळें मागील व्याजही मी देणार नाहीं. कळावें ता. ४-१-१९१४ इ.

सहीची निशानी आंगठा
धनाजी वा मुकाजी धनगर
रा. पळशी बु॥ ता०
आकोला यांचा असे

नो. नं. ८

### नोटीस

गोपाळभट बीन बाबुभट जोशी भुते रा. शहर आकोला यांस--

खालीं सही करणार इजकडुन नोटीस देण्यांत येते कीं ता. २२-१२-१३ इ. रोजीं वऱ्हाड समाचार पत्रांतून नोटीस दिली ती अगदीं खोटी. माझे जागेवर तुमचा कोणतेच प्रकारचा हक्क नाहीं. ती आज तीन पिढ्यापासून एक सारखी माझे मालकीची आहे. माझे रहाते घराचे पडीत जागेमुद्दां घरपट्टी मी पुष्कळ दिवसापासून भरत आहे. अलीकडे तुमची इच्छा माझी जागा पचवावी या उद्देशानें तुह्मी वरील नोटीस मला दिली ती खोटी आहे. मी आपल्या जागेची वाटेल ती व्यवस्था करण्यास मालक आहे. कळावें ता. ७-१-१९१४

लक्ष्मी मर्द नारायण माळी रा. शहर आकोला नि॥ खु॥ हातची बांगडी

नो० नं० ९

## पत्र व्यवहार

### गणपती

(मागील अंकावरून पुढें चालूं)

या तिहींचा परस्पराशीं विरोध नाहीं. विरोध समजणें वेडेपणा आहे. श्रीकृष्ण भगवानांनीं ह्मटल्या प्रमाणें एकं सांख्यच योगंच. सांख्य योगौ पृथक् बालाः प्रवदान्ति नपंडिताः —श्रीपरमेश्वरास तिघेही प्रिय आहेत. श्री गणेशानीं वरेण्य राजाला उपदेश करतांना ज्ञान योगाचें लक्षण सांगितलें आहे. शिवे विष्णौच शक्तौच सूर्ये मयि नराधिप। या भेद बुद्धियोगःस सम्यग्यो गो मतो मम॥ शंकर, विष्णू, शक्ति, सूर्य व मी याचे ठिकाणीं अभेद बुद्धि ठेवणें हा जो योग तोच योग. भक्तियोगाबद्दल गणराज ह्मणतात 'गन्धर्वेषु मनुष्येषु तथा निर्यग्मवेषुच। सततं मांहि यः पश्येत्सोयं योग विदुच्यते. ह्मणजे सर्प गंधर्व, मनुष्य त्याच प्रमाणें पशू पक्षी इत्यादि तिर्यग्योनि याच्या ठायीं जो मला सतत पाहतो तोच उत्तम योगवेत्ता होय. कर्मयोग्याबद्दल त्यानीं सांगितलें आहे. यस्य यद्विहितंकर्म तत्कर्तव्यं मदर्पणम्। ततोस्यकर्मबीजानामुच्छिन्नाः। स्युर्महांकुराः॥ कर्मणा शुद्ध हृदयो ऽ भेदबुद्धिर्मुपैश्याति सचयोगः समाख्यातो ऽ मृतत्वायहि कल्पते॥ ज्याचें जें विहितं कर्म असेल तें त्यानें करून मला अर्पण करावें. कर्मांच्या योगानें अभेद बुद्धि प्राप्त होते. तोच योग मोक्ष देण्यास समर्थ होतो. असो या त्रिवेणीचा आश्रय केला असता मनुष्य निवृत्तिपथ आक्रमण करण्यास समर्थ होतो. श्रीविनायकानीं राजास सांगितल्या प्रमाणें त्या पुरुषास त्रिविधस्यापि दुःखस्य संतोषे क्षेपणं भवेत्। तोच पुरुष धन्य होय. त्या पूर्ण पुरुषाचे स्थिति विशेषाचें वर्णन ईशोपनिषदात केलें आहे कीं यस्तु सर्वाणि भूतानि आत्मन्येवा नु पश्यति। सर्व भूतेषुचात्मानं ततो न विजुगुप्सते॥ यस्मिन्सर्वाणि भूतान्या त्मैवा भू द्विजानतः। तत्रको मोहः कः शोक एक त्व मनुपश्यतः॥ असो या ब्राह्मि स्थितीप्रत परत जाणें, हें या एकंदर भुर्यमालेचें ध्येय आहे.

या ध्येयाच्या आड येणाऱ्या विघ्नाचा नाश करण्या करिता विघ्नेश विनायकानीं या पृथ्वीतलावर अनेक अवतार धारण केले आहेत. त्यासंबंधानें थोडा विचार करून आमचा विषय पुरा करूं. यदा यदाहि धर्मस्य ग्लानि र्भवति भारत। अभ्युत्थान मधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥ परित्राणाय साधूना विनाशायच दुष्कृताम्। धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे॥

भगवंताचे या अभय वचनाप्रमाणें श्रीगजाननाचे युगायुगीं अवतार झाले आहेत. गणेश पुराणांत लिहिलें आहे कीं नानावतारान्कुरुते स भूभारं हतवान्विभुः॥ युगेयुगे भिन्ननामा गणेशो भिन्नवाहनः॥ भिन्न गुणो भिन्न कर्मा भिन्न दैत्यापहारकः॥ ज्याज्यावेळीं जगामध्यें विहितकर्माचा उच्छेद होऊन अधर्माची प्रवृत्ति होते तेव्हां तेव्हां कारणावन परमेश्वरास धर्मस्थापनेकरितां अधोभूमिकेवर यावें लागते. खरें पाहतां अवतार होणें हें जितकें आनंददायक आहे तितकेंच सज्जनास दुःखदायक आहे. या धर्मस्थापनेकरिता जसे परमेश्वराचे अवतार होतात तसेच मोठमोठे ऋषि, महर्षि जीवन्मुक्त हे जीवाचे उद्धारार्थ आपलेमध्यें अनेक रूपानें जन्म घेतात किंवा विचरत असतात. ते निर्वाणाप्रत जाऊन ह्मणजे ब्रह्मरूप होऊन आपले जगाचा संबंध सोडतात, हें ह्मणणें वेडेपणाचें आहे. श्रीमद्भागवतांत लिहिलें आहे.

॥ चरन्ति ह्यवनौ कामं ब्राह्मणा भगवत्प्रिय ॥
॥ मादृशां ग्राम्य बुद्धिनां बोधायोन्मत्त लिंगिन ॥

कुमार, नारद, ऋभु, अंगिरा, देवल, असित, अपांतरातम, व्यास, मार्कंडेय, गौतम, वसिष्ठ, कपिल, बादरायणी दुर्वास, रोमश, चवन, दत्त, असुरी, पतंजली, पाराशर, मैत्रेय, भरद्वाज, वारुणी, देवाशर, पंचशिख, हिरण्यनाभ, कौसल्य, श्रुतदेव, ऋतध्वज हे महर्षि तसेच मोठमोठे सिद्ध पुरुष जगाची आत्मोन्नति व्हावी ह्मणून फिरत असतात श्री शंकराचार्यांनीं या जीवन्मुक्ताबद्दल लिहिलें आहे. शान्ता महान्तो निवसान्ति सन्तो, व सन्त वल्लोक हितं चरन्तः। तीर्णा स्त्वयं भीम भवार्णवं जना न हेतु नान्यानाप तारयन्तः॥ जे हा भवसमुद्र तरून गेले आहेत ते केवळ जगदुद्धारार्थ जगात राहून सर्वत्र संचार करीत असतात. मच्छपुराणात ह्मटलें आहे. तिष्टंति चेहये सिद्धा अदृष्टा विचरंतिच॥ अशाप्रमाणें सिद्ध पुरुष सर्व पृथ्वीवर फिरत असल्याबद्दल आमचीं पुराणें, सांगत असून, आमचे नित्य अनुभवास येत असता कोणी सिद्ध पुरुष अवतार घेणार असें ह्मणतांच लोकाचे कपाळाला अढ्या पडतात! असो, श्री गजाननाचे प्रत्यक्ष अवतारचरित्राबद्दल आपण थोडा विचार करूं. मागें सांगितलेंच आहे कीं सगुण आणि निर्गुण या दोहोस अधिष्ठान परब्रह्मरूप विनायक तोच भक्ताकरिता साकार व सगुण झाला. तोच उपादान कारण व निमित्त कारण आहे. सुवर्णाचे अनंत दागिने केले असतां ज्याप्रमाणें सुवर्णत्वास कमीपणा येत नाहीं त्याप्रमाणें सच्चिदानंद परमात्माच या जगांत अनंत रूपानें आपलें अनंतत्व दाखविण्याकरिता नटला आहे. सर्व त्याचीच लीला आहे.

श्री गजाननाचें स्वरूप इतर अवतार स्वरूपापेक्षां निराळें आहे. त्याचे ध्यानाकडे लक्ष दिलें असतां दिसून येईल कीं तो स्थूळ भूमिकेवरची विघ्नें दूर करणाराच नसून त्याचें स्वरूप ज्ञान, इच्छा आणि क्रिया शक्तीस उत्तेजित करण्या सारखें आहे असें दिसून येईल. श्री गजाननाचें स्वरूप वर्णन श्री एकनाथ महाराजानीं केलें आहे.

तुज माजी वासू चरा चरा।
ह्मणोनि बोलिजे लंबोदरा॥
हरूप तें वदन गण राजा।
चारी पुरुषार्थ त्याचि चारी भुजा॥
प्रकृति पुरुष चरण दोन्ही।
तळीं घालशी वोजावोनी।
तयावरी सहजासनी।
पूर्ण पणी मिरवशी॥
सूक्ष्माहूनी सुक्ष्मसान।
त्या माजी तुझे अधिष्ठान।
यालागीं मूषक वाहन।
नामाभिधान तुज साजे॥

निरनिराळ्या युगाचे ठायीं श्रीगणराजाचे ध्यान निरनिराळें आहे. युगा युगाचे ठायीं, भिन्न भिन्न नावें, भिन्न भिन्न वाहनें, भिन्न कर्म व भिन्न गुणानीं युक्त अशा श्री विनायकानें दैत्यांचा नाश केला आहे. कृतयुगांत– त्याचें स्वरूप तो सिंहासनारूढ असून त्यास दहा भुजा होत्या. या वेळीं त्याचें नांव विनायक असें होतें. त्रेता युगांत तो मयुरेश्वर नांवानें प्रसिद्ध असून तो शुभ्रवर्ण, सहा भुजानीं युक्त व दर्भारूढ असा होता. द्वापार युगात आरक्तवर्ण, उंदरावर बसलेला चतुर्भुज असा गजानन या नावानें प्रसिद्ध होता. व तेंच ध्यान आता ही प्रचलित आहे. कलीमध्यें त्याचें स्वरूप धूम्रवर्ण, अश्वारूढ व दोन भुजानीं युक्त असें राहील असें सांगितले आहे. आपण अद्याप द्वापारांतील ध्यानाचेंच ध्यान, पूजन व उत्छाह करीत आहोत. खरें पाहता अखेर कली युगात सांगितलेंच ध्यान कलीयुगास अनुसरून आहे व त्याचें अवलंबन आपणास करावें लागेल. त्यासंबंधानें गणेशपुराणात ह्मटलें आहे "कलौ तु धूम्रवर्णोसावश्वारूढो द्विहस्तवान्। धूम्रकेतुरितिख्यातो म्लेच्छानीक विनाशकृत" गणेशपुराण या नांवाचे व्यासकृत उप पुराणात गजाननाचे अवतार चरित्र विस्तार पूर्वक सांगितलें आहे. प्रथम गणेशपुराण जगाचा कर्ता जो ब्रह्मदेव त्यानें व्यासास सांगितलें, व्यासानीं सप्तऋषी पैकीं महर्षी भृगूस सांगितलें व भृगुऋषींनीं राजा सोमकांतास निवेदन केलें व सोमकांतराजा पासून याची प्रवृत्ति जगांत झाली.

अपूर्ण

## वऱ्हाडसमाचार

पौष शुद्ध १९ शके १८३९ प्रमाथी

### आचारमीमांसा

जों जों मनुष्य अधिकाधिक सुधारणा करतो तों तों तो आपल्या पायांत कृत्रिम समाजबंधनाची एकेक बिडी ज्यास्त टाकून स्वतःच्या स्वातंत्र्याची हानि करून घेतो असें एका विलक्षण सूक्ष्मदर्शी तत्त्ववेत्त्यानें ह्मटलें आहे तें खरें दिसतें. रानटी लोकातले शिष्टाचार किती थोडे आणि सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांतून शिष्टाचारांचें केवढें बंड आहे तें पाहिलें तर वरील विधानाची सत्यता कोणाही सहज पटेल. या आचारापैकीं कित्येक युक्तिवादाला पटण्यासारखे आहेत. त्यांच्याविषयीं बोलावयाचें कारण नाहीं. पण कित्येकांचें युक्तिवादाशीं बिलकुल पटत नाहीं. उदाहरणार्थ, कोणी आपणास भेटला ह्मणजे आपण नमस्कार करतों. येथें नमस्कार करणें हा आचार झाला, आणि त्याच्या द्वारें आदर विनय व श्रद्धा हे गुण व्यक्त केले. मनातले भाव शारीरिक चेष्टांनीं व्यक्त करणें हा गुण मनुष्यातच काय पण मनुष्येत्तर प्राण्यांतही आहे. पण एखाद्या माणसाविषयीं मनांत तिरस्कार बुद्धि वागत असतां ती व्यक्त न होऊं देतां तिच्या उलट दांभिक पूज्यभाव नमस्काराच्या द्वारें व्यक्त करण्याची चौर्यकला माणसालाच साधलेली आहे. हा गुण ह्मणा दुर्गुण ह्मणा, मनुष्येत्तर प्राण्यांत नाहीं. पुनः नमस्कार करावयाचा ह्मणजे दोन हात जोडून ते कपाळापर्यंत नेणें. या क्रियेंत कांहीं शास्त्रीय तत्त्व आहे काय? तसें केल्यानें विद्युत्प्रवाह कपाळांतून उतरून सगळ्या अंगात संचार करतो व तेणेंकरून शरीर पवित्र होत असल्यास न कळे. दोन्ही हात जोडून ते कपाळाला लावणें ही आपली रीत किंवा डोक्यावरची टोपी काढून हातांत घेण्याची साहेब लोकाची रीत या दोन्हीही वस्तुतः सोयीच्या नाहींत. हातांत सामान असावें, आणि असा नमस्कार करण्याचा प्रसंग यावा ह्मणजे कशी अडचण होते तें चांगलें कळतें. सद्गुरूच्या चरणावर लोटांगण घालणें किंवा साष्टांग नमस्कार घालणें या चाली समाजांत प्रचलित करणाराला शरीराची व कपड्याची स्वच्छता व स्वाभिमान या दोघांचीही ओळख नसली पाहिजे. शिवाय जमीन ह्मणजे किती असंख्य जंतूंचें आगर आहे याचीही त्याला कल्पना नव्हती असें दिसतें. शिवाय शिष्टाचारांचें अत्यधिक प्रेम हें दांभिकपणाचेंही एक लक्षण व्यवहारज्ञ लोक समजतात, आणि तें कांहीं खोटें नाहीं. जेथें खरें प्रम, खरा आदरभाव, खरी श्रद्धा आहे तेथें शिष्टाचाराची महती मुळींच नाहीं. खऱ्या प्रेमाला अभिव्यक्तीसाठीं बाह्योपाधीची अपेक्षा नसते. या गोष्टीचा विचार केला ह्मणजे असें दिसतें कीं आचारांचा हेतु मनातले भाव व्यक्त करणें हा नसून उलट खरा भाव दडपून ठेवून भलताच बाहेर दाखविणें असा असावा. अर्थात् आचारांचें पालन फार बारकाईनें करणें ह्मणजे लोकांच्या डोळ्यात एक प्रकारें धूळ टाकणेंच आहे.

सारांश काय, तर आचार अर्थशून्य व युक्तिहीन असतात. त्याच्या पासून फायदा काय होतो तें सागणें कठीण आहे, पण नुकसान मात्र स्पष्ट आहे. तें हें कीं कृत्रिमपणा किंवा दांभिकता यांना उत्तेजन मिळतें. या शिवाय शिष्टाचाराच्या संवयी ह्मणजे मनुष्याच्या स्वतंत्रतेच्या पायांतल्या बिड्या होत. त्या त्याच्या शरीराला व मनाला दोघानाही घट्ट बांधून ठेवतात, व आपला गुलाम करून सोडतात.

कोणताही शिष्टाचार घ्या, तो अस्वाभाविक, युक्तिहीन अर्थशून्य व वंचनापर बहुधा आढळेल. पण आश्चर्य हें आहे कीं शिक्षणांत व सुधारणेंत अग्रेसरत्वाचा मान मिळविणारे लोकच या शिष्टाचाराचे अधिक गुलाम बनून राहतात. हे या आचारांचे इतके गुलाम बनतात कीं दोन दिवस पोटाला न मिळालें तर चालेल, पण शर्ट कॉलर कडकडीत व तुळतुळीत नसला तर खपावयाचा नाहीं. भाकरीवर तेलाचा थेंब मिळण्याची मारामार पण दाढीला तूप लावल्याशिवाय घरा बाहेर न पडणाऱ्या मिया साहेबाच्या गोष्टींत

हेंच तत्त्व दृष्टांतानें व्यक्त केलें आहे. या आचारांनीं मनुष्याचे हातपाय किती जखडले गेले आहेत व त्याला खरोखरी अशी स्वतंत्रता कितीशी आहे तें पाहूं गेलों तर चोवीस तासांत अर्वातास तरी बिचारा स्वतंत्रता भोगतांना सांपडेल किंवा नाहीं याचीच शंका आहे. अमके पदार्थ खा, ते अमक्याच तऱ्हेनें, अमक्याच वेळीं खा, अशा रीतीनें बस, दक्षिणेकडे डोकें करून निजूं नकोस, तुझ्या मातापितराच्या मरणाबद्दल तूं इतकेच दिवस व अमक्याच रीतीनें दुःख केलें पाहिजेस, पुत्रजन्मोत्सव करणें झाला तरी त्याचा ठराविकच प्रकार असला पाहिजे हा कोण जुलूम! पण मनुष्याचें मन शिक्षणानें विकास पावून त्याला स्वतंत्रतेची जशी आवड उत्पन्न होते, तसा तो अधिकाधिकच आपखुषीनें शिष्टाचाराची गुलामगिरी आपल्यामागें लावून घेतो! मनुष्याचे विचार व त्याचें वर्तन यामधला विरोध आणखी स्पष्ट तो काय सांगावयाचा!

आचारांची उत्पत्ति हा शोधकांचा मोठा आवडीचा व्यवसाय आहे. तें खाजें त्याना इतकें प्रिय वाटतें कीं त्यापुढें बाकीचे नाद अगदीं व्यर्थ. पण इतका व्यासंग करूनही पुष्कळ आचारांची उत्पत्ति आजपर्यंत कोणालाच देतां आली नाहीं. शास्त्रीयदृष्ट्या मीमांसा केली असता कांहीं आचारांची उत्पत्ति लागते. पण सर्वांची नाहीं. एखाद्या शारिरीक अथवा मानसिक शक्तीनें संपन्न अशा व्यक्तीपुढें दुर्बलानें आपला विनय, चरणावर लोटांगण घालून व्यक्त करण्याला शास्त्रीय तत्त्वाचा आधार तरी आहे. कारण दुर्बळ माणसाच्या शरिराचा केंद्र भीतीनें कंप पावल्यामुळे नेहमीं विचलित होत असतो व एखादेवेळीं तरी तो मर्यादेच्या बाहेर जाऊन पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण शक्तीच्या तडाख्यांत सांपडून पृथ्वीतलाचें माप घेण्यास तो उद्युक्त होतो. पण नमस्कार करण्यासाठीं हात वर कां उचलला जावा? व त्यांच्या भेटीस येण्यासाठीं डोक्यानें थोडेसें खालीं कां वाकावें? विनय, आदर, इ० गुणांचा भार शिराला सहन न होण्याइतकें त्यांचें खरोखर वजन आहे काय? वगैरे प्रश्न पदार्थविज्ञान व मानसविज्ञान या विषयांचा आमरण अभ्यास करणाऱ्यानें सुद्धां सुटतील कीं नाहीं याची शंकाच आहे. प्रणयी जनांनीं परस्परांच्या अधरांचें चुंबन करणें हें सर्व देशात सर्वकाळीं प्रणयाचें चिन्ह समजलें गेलें आहे. हा चुंबनाचा विधि पूर्वीच्या नरमांस भक्षणाच्या प्रघाताचा अवशेष ह्मणावा कीं ह्मणावें तरी काय? प्रणयी जनांच्या ओंठांत मधुर रस वास करतो, किंवा तेथें कांहीं विशेष प्रकारची विद्युत् असते, असें काय असतें कीं त्याच्या योगानें प्रणयीजन त्या ओंठाकडे आकर्षिला जावा! मी तुझें कच्चें मांस तोडून खाल्लें असतें, पण काय करूं? पोलीसाचा म्यावें लागतें, असें ह्मणणेंही प्रणयाची भाषा होईल काय ? नाहीं. तर मग चुंबनाची युक्तिसंगत व समाधानकारक अशी दुसरी व्युत्पत्ति कोण देऊं शकेल?

---

## सहकारित्वाची गोशाळा.

सहकारित्व ज्या उद्योगाला लावाल तो उद्योग यशस्वी होतो याचें ताजें उदाहरण को आपरेशन ग्याझिटमध्यें नागपूरचे मि. डी. मेहता यांनीं दिलें आहे. नागपूर येथें सध्या निर्मळ दुधाची फार दुर्मिळता झाली आहे व शास्त्रीय पद्धतीनें गोशाळ चालविण्याचें ज्ञान आमच्या गवळी लोकांत नाहीं. ह्मणून सुशिक्षितांनीं पुढाकार घेऊन गवळ्यांच्या कडूनच पण आपल्या देखरेखीखालीं एक मध्यवर्ति गोशाळा चालविण्याचें ठरवून त्याची योजना लागलीच अंमलात हो आणिली. या योजनेप्रमाणें आज दहा महिने गोशाळा उत्तम प्रकारें चालली आहे व ती गवळ्यांना द्रव्याच्या दृष्टीनें आणि नागरिकांना शुद्ध दुधाच्या रूपानें फायदेशीरही होत आहे. अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न हिंदुस्थानांत झालेला असल्यामुळें या गोशाळेची माहिती मि. मेहता यांच्या लेखावरून येथें देतों.

या गोशाळेची चालक सहकारी मंडळी ता० ३ अक्टोबर १९११ रोजीं रजिस्टर करण्यात आली. या मंडळाचे सगळे सभासद गवळी आहेत. या गवळ्यांनीं आपापल्या गाई व ह्मशी दिसेंबर १९१२ मध्यें तेलिगखेडी येथील सरकारी गोशाळेवरील अधिकाऱ्याच्या ताब्यांत दिल्या. या गुरांना चारण्यासाठीं एक मोठें कुरण सरकारपासून घेतलें, गोशाळा शास्त्रीयतत्त्वावर चालविणारा एक इसम मिळविला आणि त्याच्या देखरेखीखालीं काम चालूं झालें. या गोशाळेंतल्या गाई ह्मशींचें दूध सगळें एका कंत्राटदाराला रुपयास ९ शेर या भावानें देण्यांत येतें. दूध काढण्याचीं भांडीं वगैरे फार स्वच्छ ठेवण्यांत येतात. काढलेलें दूध मोजून मोजक्या मापाच्या डब्यांतून गिऱ्हाईकांकडे पाठविणें, उरलेल्या दुधावरची साय काढणें, लोणी करणें वगैरे सगळीं कामें कंत्राटदार स्वतःच्या जोखमीवर पण गोशाळेवरील शास्त्रज्ञाच्या देखरेखीखालीं करीत असतो. हा कंत्राटदार गिऱ्हाइकांस रुपयास ६ शेर या भावानें दूध विकतो. ह्मणजे रुपयामागें ३ शेर दूध त्याच्या पदरांत पडतें. त्यांतून तो गोशाळेची भांडीं, यंत्रें, वगैरेची व्यवस्था करतो व उरेल तो फायदा घेतो गवळ्याचीं जीं गुरें डाक्तरांच्या तपासणींत निरोगी ठरतील तेवढींच गोशाळेंत घेण्यांत येतात. गुरांचें दूध काढणें, शेणगोठा करणें, त्यांना धुणें वगैरे सगळीं कामें गवळ्यांनीं स्वतः अगर नोकरांकडून पण गोशाळेच्या अधिकाऱ्याचे देखरेखी खालीं ते सांगतील त्याप्रमाणें केलीं पाहिजेत. गुरांना राहण्यासाठीं पत्रे घातलेलीं कीं घरें बांधलीं आहेत. त्याबद्दल भाडे दर दुभत्या गुरामागें ८ आणे व दुध न देणाऱ्या गुरास ४ आणे प्रमाणें द्यावें लागतें. गुराच्या शेणाच्या गोवऱ्या थापूं देत नाहींत. तें शेण खताच्या कामीं लावतात. गुरांना दाणाचारा गोशाळेकडून अगदीं माफक दरानें मिळतो व तो कोणत्या गुराला किती द्यावयाचा तें गोशाळेवरील अधिकारी ठरवितात. गोशाळेसाठीं एकदम मोठ्याप्रमाणावर दाणाचारा विकत घेतल्यामुळें गवळी फुटकळ घेतात त्यापेक्षां त्यांना गोशाळेपासून घेण्यांत फार फायदा असतो. याशिवाय गाई करितां सांड व ह्मशीसाठीं हेला हे उत्कृष्ट प्रतीचे आणविले आहेत. त्यांचा उपयोग करून घेण्याबद्दल गवळ्यांना कांहीं भाडें द्यावें लागत नाहीं. प्रत्येक गवळ्याचें खातें स्वतंत्र ठेविलें असून त्यात त्याच्या गाई ह्मशींला रोज किती दाणाचारा लागला, व दूध किती निघालें त्याचा बरोबर हिशोब तारीखवार ठेविला असतो. दुधाबद्दलच्या गवळ्याच्या बिलांतून त्याच्या नांवें खात्यांत असलेली रकम वजा करून बाकीची रकम महिन्याचे काठीं त्याला देण्यांत येतें. या व्यवस्थेनें गिऱ्हाइकांना उत्तम खात्रीचें दूध मिळतेंच, पण गवळ्यालाही सावकाराचें घर दाहावें लागत नाहीं, गाई ह्मशींला कोठें चारूं ही काळजी वाहावी लागत नाहीं, गिऱ्हाईक शोधण्यास जावें लागत नाहीं पैशाचा हिशोब ठेवण्याचे श्रम नाहींत, असे अनेक फायदे आहेत. ही गोशाळा सुरू होऊन १० च महिने झाले आहेत खरे; पण या अल्प अवधींत आलेला अनुभव मोठा उत्तेजन दायक आहे. या मुदतींत गवळ्याला सरासरीनें दर गुरामागें २० रुपये निवळ नफ्याचे मिळाले. हें नफ्याचें प्रमाण याहूनही ज्यास्त पडलें असतें. पण आरंभीं गोशाळेंत जीं गुरें आलीं त्यांतलीं बरींच दूध न देणारीं होतीं. पण ही स्थिति सर्व ठिकाणीं आणि सर्व काळीं असते असें नाहीं. असो, एकंदरींत नागपुरानें सहकारितेचा हा एक नवा उपयोग दाखवून दिल्याबद्दल आपण त्याचे आभारी असले पाहिजे आणि शक्य असेल त्या गांवीं, विशेषतः शहरांतून, या उदाहरणाचें अनुकरण झालें पाहिजे.

---

## आधुनिक गुरु

### नं. २

मागील अंकावरून पुढें चालूं

सर्व शक्तिमान परमेश्वर मग त्यास कृष्ण ह्मणा अथवा राम ह्मणा अथवा दत्तात्रेय ह्मणा वाटेल तें नांव द्या एक आहे. तो निरनिराळे वेळीं धर्म रक्षणार्थ किंवा दुष्टांपासून सज्जनांचें रक्षण करण्याकरितां किंवा भाविक लोकाना उत्साह देण्याकरितां किंवा अशाच पवित्र आणि विशिष्ट कार्याकरितांच विशिष्ट प्रसंगीं प्रकट झाला व त्यानें भक्तांस संसार सागर तरणें कसें आणि किती सुलभ आहे हें दाखविलें. अशा प्रकटीभूत होण्यासच अवतार ह्मणतात. हे अवतार त्या वेळीं जीवंत असणाऱ्या सर्व लोकांच्या कुंडलीनींतून अथवा अवतार सुषुम्नींतून अथवा ब्रह्मरंध्रांतून तिळ तिळ घेऊन झालेले नव्हते. हे अवतार स्वयंप्रकाश स्वसंवेद्य स्वेच्छेनें लोक हितार्थ झालेले होते. तरी देखील त्यात्या अवतारांचे वेळीं त्यांचें पूज्यत्व लोकांस समजलें नाहीं. सारांश प्रत्यक्ष देव लोकांत असतांना त्यास त्यांनीं ओळखिलें नाहीं.

या साम्यावरून महत्भक्त आह्मांस देवता पटवून देण्याचें सामर्थ्य आहे. वेदांत लागेल तो मंत्र आणि लागेल तो ताप दूर करण्याचें साधन आहे. वेदांत आगगाड्या, पोष्टऑफिसें, बिजेचेदिवे, छापखाने आधि व्याधि दूर करण्याचीं साधनें इत्यादि इत्यादि सर्व अहेत असें ह्मणणारे लोक आमच्या पहाण्यात बरेच आलेले आहेत, परंतु या बाष्कळ विधानांचा फायदा घेऊन लोकांस आपण वेदशास्त्रशून्य तसेंच वेदार्थ शत्रु असून वैदिक प्रक्रियांनीं लोकांस अजरामर करण्याचें, लोकांचें जारणमारण करण्याचें, लोकांस नृपरंक बनविण्याचें लोकांस अष्टसिद्धि प्राप्त करून देण्याचें साधन आमच्या जवळ आहे असें भासवून लोकांस नादीं लावणारा एक नवा वर्ग आपल्या महाराष्ट्रांत उत्पन्न होऊं लागला आहे. त्यांतल्यात्यांत आह्मी ज्ञानी अशी लोकांत थाप मारून छाप बसविणारे अधिक लोक सांपडतील. ह्मणजे थापाड्याचा वर्ग १ व त्यांत वेद क्रियेनें लागेल तें साध्य करून घेणारा अतएव मांत्रिक आणि तांत्रिक लोकांचा वर्ग १ मला देवता साध्य आहेत त्यांस विधीनें पामलें पाडून त्याच्या उरावर बसून लागेल तें काम करवून घेईन. संचित प्रारब्ध क्रियमाण सर्व खोटीं आहेत. देवताराधनानें त्यांजकडून लागेल तों वडवून घेईन असें ह्मणणारांचा पोट वर्ग दुसरा. आता राहिला वर्ग तिसरा. या सर्व वर्गात हा वर्ग फार मोठा आहे या वर्गास कर्म नको, आचार नको, नियमितपणा नको, दैवी संपत्ति नको, फक्त मी ज्ञानी आहे असें लोकांत सजवून दिलें ह्मणजे बरेच फावतें व ते आपल्या मुळ्यापांचा फायदा घेतात. चवथा वर्ग संकीर्ण मत वाल्यांचा या वर्गात बरेच लोक आढळतात. ते एकदा ज्ञानाची घमेंडी तर दुसऱ्यानें मंत्र तंत्र सामर्थ्याची किंवा क्वचित् प्रसंगीं भक्ति भावाची ही घमेंड मारतील.

वरील ४ ही वर्गातील लोक आपल्या ठिकाणींच बडबड करून स्वस्थ रहातील तर त्यांस कोणीही नांवें ठेवणार नाहीं. प्रत्येक मनुष्यास जर चांगल्या कल्पना करण्याचा अधिकार आहे तर त्यास वेडगळपणाच्याही कल्पना करण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्याचें व्यक्ति-स्वातंत्र्य हिरावून घेणें कल्पनातीत आहे. कायदा कृतीस शासन देतो. मनोमय कल्पनेस कोणत्याही कायद्यानें आजवर शासन केलेलें नाहीं. फक्त नीतिशास्त्र मनोमय कल्पनेस शासन करितें व असे लोक अशा विचाराचे असतात याहून त्यास अधिक तें कोणतें शासन असावें बरें! परंतु हे लोक आत्मघात करूनच रहात नाहींत. हे हल्लीं आपल्या महाराष्ट्र ब्राह्मण समाजाचें फार अहित करून राहिले आहेत. या गोष्टीस अनेक कारणें आहेत परंतु तीं देण्यापूर्वीं गेल्या १५ वर्षांपूर्वीची स्थिति थोडक्यात लक्षांत आणली पाहिजे. सरकारची दडपशाई आज एक सारखी १६-१७ वर्षें चालूं आहे. कोणावर केव्हां काय संकट गुजरेल याचा फारसा नियम नसे. एकंदर हिंदुजातींत स्वार्थ परायणता, असत्यप्रीति, दंभ, परस्पर हेवादावा हीं कशीं वाढत चालली आहेत हें कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे. अशा स्थितींत आपला बचाव अगर लाभ करून घ्यावयाचा असलातर एकच मार्ग राहतो

तो दुसऱ्याचे अंगीं द्वेश मूलक दोष स्थापण्याचा. सरकारी नोकरींत सरकार दरबारांत ब्राह्मणांनीं या गुणामुळें आणि या शिवाय स्थूल मानानें अन्य गुणामुळें आपलें वजन वाढविलें. ब्राह्मणांनां व्यापार अगर दुसरा हुन्नर करण्याची बुद्धि अद्यापि नाहीं. त्यांचे मुख्य स्वतंत्र धंदे ह्मणजे खासगी शाळा काढणें, वर्तमानपत्र चालविणें, पुस्तकें लिहिणें आणि वकिली किंवा डाक्टरी. या सर्व धंद्यांत मानसिक सामर्थ्याची जरूरी आहे. गेल्या १९ वर्षांत काहीं उपद्व्यापी मंडळींनीं भलभलत्याच गोष्टी करून देशामोंवतालची पारतंत्र्याची शृंखला अधिक जोरानें आवळून घेतली. याशिवाय इतक्या चळवळी पासून अधिकसा लाभ झाला नाहीं. इतर जितराष्ट्रांना एकादा हक्क मिळविण्यास जे आयास पडतात त्यापेक्षांही अधिक आयास करून आह्मास राज्यकर्त्यांची इतराजी कमाविता आली. परंतु एक अनुभव मिळाला.

महाडोहीं उडी घालणें। बळवंतास स्पर्धा करणें। हीं द्वारें अनर्थाचीं’ अशा विपन्न स्थितींत महाराष्ट्रात घरोघर निराशा नांदत होती. बरेच लोक आपला व्यवसाय मंदोत्साहानें चालवीत होते. अशा प्रसंगीं लोकात देवाची करुणा भाकावी असें साहजिकच वाटूं लागतें. स्वतःच्या मानसिक अस्वास्थ्यामुळें देवार्चनादि कर्मे बायकाच्या गळ्यात पडलीं पूर्वीचा पंडित अगर भिक्षुक वर्ग बहुतेक लोपून गेला आहे. विधि नियम सांगण्या करिता लोकांना नादीं लावणाऱ्या एकाद्या उपद्व्यापी वर्गाची वाण पडली.

**गुरुशिष्यपण ॥ हें तों अधम लक्षण ॥१॥**
**भूतीं नारायण खरा ॥ आप**
**तैसाचि दुसरा ॥२॥**
**न कळतां दोरी साप ॥ राहूं ने**
**दावा तो कांप ॥३॥**
**तुका ह्मणे गुणदोषीं ॥ एसें न**
**पडावें सोसीं ॥४॥**
**तुकाराम.**

अपूर्ण

---

## एक अतिशयित प्राचीन जैन शिलालेख

अजमीरपासून ३२ मैलांवर भिणाय नांवाचें एक खेडेगाव आहे. तेथील एका शतकऱ्याचे येथें मोठी शिला पडली होती. त्याचा तेथील मंडळी तंबाखू कुटण्याच्या कामाकडे उपयोग करीत असे. एकवेळीं अजमीरपुरातत्वान्वेषी श्रीयुत पंडित गौरिशंकर याचे दृष्टीस ती शिला पडली. तेव्हां त्यांना वाटलें कीं, हा साधारण दगड नसून पुरातनपैकीं असावा. ह्मणून त्यांनीं तिला उलटी करून त्यावर काहीं लेख आहे कीं काय ह्मणून तपास केला. तेव्हां त्यांना—"विरय भगवत थ चतुरसीति कार्य सालामालिनि रग्णि विठ माइझामिके" अशीं अक्षरें दिसून आलीं. त्यांवरून असें आढळून येतें कीं, महावीर स्वामी नंतर ८४ वर्षांनीं माइझामिका नामक नगरांत (जी पूर्वी मेवाडची राजधानी होती) शालामालिनी नामक राजानें हा शिलालेख लिहविला असावा—आजपर्यंत जैनांचे जितके शिलालेख मिळाले आहेत त्या सर्वांत हा प्राचीन आहे. ह्मणजे त्यास लिहून आज २,३९६ वर्षें झालीं. त्यावेळीं भगवान महावीर स्वामीचें निर्वाण होऊन फक्त ४८ वर्षें झालीं होतीं.

सुमति

---

## साहित्यपरिषदेची हानि.

महाराष्ट्र साहित्य परिषदेची कचेरी मुंबईस जाऊन एक वर्षच झालें. या वर्षांत साहित्य परिषदेला किती नवीन समासद मिळाले किंवा कोणी किती द्रव्यसाह्य दिलें याची आह्माला माहिती नाहीं, पण नुकत्या हातीं आलेल्या ‘विविध ज्ञानविस्तारा’च्या अंकावरून एक दुःखाची बातमी कळते कीं परिषदेच्या मुंबईच्या प्रयाणानंतर तिला पहिला अपशकुन झाला तो द्रव्यहानीचा होय. परिषदेनें आपला निधि मुंबईच्या एका ब्यांकेंत ठेविला होता व ती ब्यांक बुडाली! परिषदेच्या हानीची नक्की रकम परिषदेच्या पत्रिकेंत न देता हानि झाल्याची मोघम बातमी का प्रसिद्ध व्हावी तें कळत नाहीं. परिषदेचा रिपोर्ट प्रसिद्ध होण्यास जो विलंब लागला आहे त्याचें कारण ही द्रव्य हानिच असेल तर तें वाजवी आहे. आह्मांला भरंवसा आहे कीं विविध ज्ञानविस्तारकर्त्यांनीं अशा प्रसंगीं साहित्य परिषदेविषयीं सहानुभूति व प्रत्यक्ष साह्य कर्तृत्व दाखविण्याविषयीं दिलेल्या प्रोत्साहनाचा काहीं तरी परिणाम महाराष्ट्र भाषा प्रेमी जनांच्या मनावर अवश्य होईल व परिषदेची हानि भरून काढण्यास हातभार लावतील. परिषदेच्या व्यवस्थापक मंडळीसही आमची विनंति आहे कीं झालेल्या हानी बद्दलची आपल्या वरची जबाबदारी ओळखून व्यवस्थापक मंडळी स्वतःच्या सहीनें खुलाशाचें पत्रक प्रसिद्ध करून वस्तुस्थिति परिषदेच्या सभासदांस सत्वर कळवितील.

---

## मुंबईकर थकले!

१९१२ आक्टोबरमध्यें आमच्या येथें साहित्यसंमेलन झालें तेव्हां पुढचें साहित्यसंमेलन मुंबई येथें भरवावें अशी इच्छा मुंबईकरांच्या वतीनें प्रिन्सिपाल पाध्ये यानीं दर्शवून मंडळीला पाचारणही केलें होतें. पुण्यास लागोपाठ तीनचार संमेलनें झालीं तेव्हांपासूनच यासंबंधात मुंबईकरांत ईर्ष्या उत्पन्न झाल्याचें आह्मास ठाऊक होतें, व आतां मुंबईकर संमेलन भरविण्याची पाहिली संधी साधणार असें वाटलें होतें. पण मुंबईकराच्या तोंडची ही नुसती वाफ होती असें दुर्दैवानें अनुभवास आलें. पुढें आकोल्याच्या संमेलनाचे वेळीं परिषदेची कचेरी मुंबईस नेण्याचें ठरून मुंबईकरांना आपली कर्तृत्वशक्ति दाखविण्याचा एक सुप्रसंग मिळाला. पण काय! तीही तोंडची वाफच असें आता अनुभवास येत आहे! ब्यांकेच्या दिवाळ्याची सबब पुढें करून मुंबईकरांनीं स्वतःवर घेतलेली जबाबदारी टाळण्यास पहावें व मोठ्या आढ्यतेनें हजारों लोकांसमक्ष उच्चारलेले पाचारणाचे शब्द माघारे घेण्यास किमपि लाजूं नये ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. ब्यांकाचीं दिवाळीं निघालीं व पुष्कळ लोक बुडाले ह्मणून मुंबईकरांनीं आपली कोणती चैन कमी केली आहे? नाटकें तमाशे, सोडावाटर, आइसक्रीम, चहापार्ट्या, ॲटहोम पार्ट्या, क्लबचीं भोजनें, वगैरे गोष्टींत कोठें तरी खळ पडली आहे काय? चैनींत सुद्धां जर खंड पडला नाहीं तर अवश्यक कर्तव्य आणि स्वतःवर घेतलेली जबाबदारी यांच्याच आड मुंबईकरांनीं ही सबब येऊं द्यावी हें त्यांच्या शिक्षणास व कर्तृत्वाच्या अभिमानास शोभतें काय? मुंबईचें साहित्यसंमेलन या पूर्वीच व्हावयास पाहिजे होतें पण निदान आता तरी तें भरविण्याची खटपट न करतां मुंबईनें आशाळभुतासारखें एखाद्या संस्थानिकाच्या मदतीची अपेक्षा करीत रहावें हें तिच्या नावलौकिकास आणि कर्तृत्वास खास कमीपणा आणणारें आहे

---

## समाजाच आधारस्तंभ.

विलायतेंतल्या "डेलीन्यूज" पत्राचे संपादक मि. गार्डनर यानीं वरील नांवाचें एक पुस्तक अलीकडे लिहिलें आहे आणि त्यांत इंग्रज समाजाच्या कित्येक विद्यमान आधारस्तंभ मानलेल्या व्यक्तींचे स्वभावचित्र दिलें आहे. हीं चित्रें फार मजेदार व वाचनीय आहेत. पहिला मुख्य स्तंभ ह्मणजे आपले प्रिय व सन्मान्य बादशाहा पाचवे जार्ज हे होत.

मि. गार्डनर हे लिहितात कीं कामकऱ्याच्या वर्गांतून आलेले हे पहिलेच इंग्रज राजे आहेत. बादशहाची उद्योग तत्परता व कामकरी लोकांविषयींची पूर्ण कळकळ हीं या वाक्यानें व्यक्त केली आहेत. त्यांचा दुसरा गुण ह्मणजे सगळें राज्य पाहिलेले हेच एक बादशहा होत. तिसरा गुण सरकारी कामकाजामध्यें खोल बुडीमारून सत्यशोधून काढण्याची त्यांची हातोटी. याचें उत्कृष्ट उदाहरण हिंदुस्थानच्या प्रवासानंतर तेथील राज्यकारभारात सहानुभूतीची मोठी उणीव आहे असे त्यांनीं काढलेले उद्गार हें होय. या उद्गाराचा यक्षिणीच्या कांडी प्रमाणें दिसून आलेला प्रभाव प्रसिद्धच आहे. दुसरा आधारस्तंभ लॉर्ड मिलनर. यांचा स्वभाव वरच्यांच्या अगदीं उलट. याचे अंतःकरणात सहानुभूतीचा ओलावा मुळींच नाहीं. हे ह्मणजे नुसतें बुद्धिमत्तेचें निर्विकार यंत्र! लोकांचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याकडे याच्या बुद्धीचा सगळा खर्च व्हावयाचा. हिंदुस्थानात लोकसत्तेचा उत्कर्ष करावयाचा या सारखी यांच्या मतें दुसरी हास्यास्पद गोष्टच नाहीं. त्यांनीं केप कॉलनी येथें आपला अधिकाराचा तोरा कसा मिरविला तें प्रसिद्धच आहे. तिसरे स्तंभ लॉर्ड ह्यु सेसिल यांच्या मेंदूचें सुपीकत्व अजब आहे. वादांत कोट्या, लटपटी, इ० लढविण्यात त्याचा हात खंडा एखाद्या क्षुद्र गोष्टीपासून तों तहनाम्यावर खोटी सही करण्यापर्यंत हव्या त्या गोष्टीला समर्पक कारण योजून काढण्यांत यांच्या डोक्याची कुशलता तारीफ करण्यासारखी आहे चौथे आधारस्तंभ सर एडवर्ड कार्सन. यानीं होमरूलचे बाबतींत जें तांडवनृत्य मांडलें आहे त्याच्या मुळाशीं जात्याभिमान आहे. हिंदुस्थानांत जसें आंग्लोइंडियनाचें हिंदी लोकाशीं तसें आयर्लंडात इंग्रजाचें आयरिश लोकांशीं आहे. सगळा कारभार, सगळ्या मोठाल्या हुद्याच्या जागा, न्यायाधिकार वगैरे इंग्रजांच्या हातीं. पण आयरिश लोकांना हें कळूं लागल्यापासून इंग्रजाना ही आपलें वैभव जाण्याची भीती वाटूं लागली आहे ही आंतली मख्खी आहे. पाचवे आधारस्तंभ नवानगरचे जामसाहेब रणजितसिंगजी हे घेतले आहेत. इंग्रज लोक यांना आपल्या समाजाचें एक मुख्य घटक समजतात हा काहीं सामान्य मान नाहीं. इंग्रज लोकांची धुंदी उतरून त्यांच्या मनात हिंदी लोकांविषयीं आदर उत्पन्न करणारे ज्यामसाहेब हेच पहिले हिंदी गृहस्थ होत. या बाबतींत मि. गार्डनर याच्यामतें जामसाहेब हे गोखले, बॅनर्जी व टागोर याच्याहूनही श्रेष्ठ होत. लॉर्ड किचनर हे ह्मणजे बर्फाचे स्तंभ होत. लोकमताची त्याना पर्वा वाटत नाहीं. अर्थात लोक काय ह्मणतील इकडे त्याचें लक्ष नसतें. ते दुसऱ्याचीं भाषणें खुशाल चोरून, छाटून, आपलीं ह्मणून दाखवितात. शेंडी तुटो कीं पारंबी मोडो अशा कृतनिश्चयाचे ते आहेत. आपल्या समाजाचीं अशीं मार्मिक व मजेदार चित्रें काढण्याचा प्रयत्न कोणी कुशल व मार्मिक लेखक करील काय?

---

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—थंडी चागली उत्साहवर्धक व आरोग्यपोषक अशी आहे. रोगराई नाहीं. रब्बीचीं पीकें चागल्या भरभराटींत आहेत पण रब्बीचा पेरा असावा तितका मोठा नाहीं.

सर राबर्टसन चीफ कमिशनर यांस ट्रान्सव्हालकडे डेपुटेशनवर धाडल्यामुळें रा. रा. ए. क्रम्प व जे. वाकर यांस अनुक्रमें आफि. चीफ कमिशनर व फायनान्स कमिशनर नेमण्यांत आलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

अवकौरीचे हरास जिल्हावारीनें येणें प्रमाणें होणार आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उमरावती | १४ | ते | १७ | जानेवारी |
| बुलढाणा | २६ | ते | ३० | जानेवारी |
| आकोला | २ | ते | ९ | फेब्रुवारी |
| यवतमाळ | १० | ते | १४ | फेब्रुवारी |

रा. रा. वीरजसींग पोलीस सर्कल इनस्पेक्टर, बुलडाणा यांस त्याच जिल्ह्यांत डिपुटी सुपरिन्टेंडेंटची बढती देण्यात आली.

रा. रा. सखारामराव पोलीस इनस्पेक्टर हे रजेवर आहेत तोपर्यंत रा. रा. भगवंत नारायण देशपांडे यास इनस्पेक्टर नेमण्यांत आलें.

रा. रा. फ्रामरोज रुस्तमजी मुनसफ, खांडवा यास वाशिम येथें सबजज नेमण्यात आलें.

रा. रा. सी. के. सीमन असि. कमिशनर यास उमरावतीहून आकोल्यास बदलण्यांत आलें.

रा. पी. सी. एम. फिंडले लीगल रिमेम्ब्रन्सर यांस जुडिशिअल कमिशनरच्या ताब्यांतील सर्व कोर्टाचे पब्लिक प्रासिक्युटर व सिव्हील प्रोसीजर प्रमाणें आडव्होकेट जनरल नेमण्यांत आलें.

रा. रा. मंगलीप्रसाद तिवारी यांस आकोला पब्लीकवर्कखात्या सब डिव्हीजनला बदलण्यांत आलें.

गव्हाच्या पेऱ्याखालीं एकंदर ३१४००१० एकर जमीन असून त्यापैकीं २८१४२३ एकर वऱ्हाडांतील आहेत. वऱ्हाडातील हे पीक उमरावती, बुलढाणा व यवतमाळ या जिल्ह्यातच विशेष आहे.

जवसाचें क्षेत्र फार कमी असून गेल्या सालीं १९०९०२४ होतें तें यंदा तीन चतुर्थांश भागावर उतरलें आहे.

## नोटीस

नोटीस बेशमी गुलाबखांन वा॥ अब-दुलहमीदखांन रोहिला मु० वरणगाव ता. भुसावळ यांसः—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं माझा अज्ञान भाऊ नामे बिसमिल्ला वल्लद महमद अश्रफ रा. बिस्वाचांदुर हा कांहीं उनाडलोकांचे संगतीनें आपले येथें आला असतां त्या लोकांनीं व तुझ्ला फुसलाऊन कांहीं लेख त्याज जवळून लिहून घेतला असे त्याचे सांगण्या वरून समजते व तो असे ही सांगतो कीं त्यालेखास प्रामेसरी नोट ह्मणत असत. वरून तुह्मास नोटीस देतो कीं ज्या प्रामेसरीनोटीवर किंवा कोणतेही लेखावर माझे अज्ञान भावाची या पांच सहा दिवसांत तुह्मी सही घेतली तो लेख ही नोटीस पावल्या पासून ४ दिवसांत मजला परत आणून द्यावा व चांदूरबिस्वा मुक्कामीं वरील गोष्टीची खुलासा करावा. तसें न केल्यास ज्या लेखावर तुह्मी अज्ञानाची सही घेतली आहे त्याबद्दलची जबाबदारी माझे इस्टेटीवर कोणतेही प्रकारें राहणार नाहीं. व तुह्मी अज्ञानासी व्यवहार केल्याबद्दल कोर्टांत तुमचेवर दावा करण्यांत येईल. तुह्मी लिहून घेतलेला लेख अज्ञानाचे सहीचा असल्यानें रद्द आहे. कळावें ता. ७-१-१४

सही

शेखरहीम व॥ महमदअश्रफ द. खु. रा. चांदूरबिस्वा

नो. नं. १९

## जाहीर नोटीस

वि. सीनीअर सबजज साहेब बहादूर कोर्ट आकोला यांचें कोर्टांत.

सक्सेशन सर्टिफीकीट नंबर ६ सन १९१३ नेमली तारीख २४-१-१९१४

अर्जदार

सातावाई जवजे लक्ष्मीनारायण मारवाडी राहणार आकोला तालुका व जिल्हा आकोला.

सर्वत्र लोकांस कळविण्यात येतें कीं वरील अर्जदार इनें सक्सेशन सर्टिफीकीट मिळण्याचा अर्ज आमचें कोर्टांत तारीख ११-१२-१३ रोजीं दिला असून त्याची चौकशीची तारीख २४ माहे जानेवारी सन १९१४ इसवीची नेमली आहे. तरी त्या तारखेस ज्याची कांहीं तकरार असेल त्यांनीं सकाळीं १० वाजता आमचे कोर्टांत हजर राहावें. तसें न केल्यास वरील अर्जदार इस सर्टिफीकीट देण्यात येईल. व पुढें कोणतीही तक्रार ऐकिली जाणार नाहीं कळावें तारीख २३-१२-१३

R. N. Trivedi
Senior Sub Judge
Akola

नो. नं. १६

## जाहीर नोटीस

वि. सीनीअर सबजज साहेब बहादूर कोर्ट आकोला यांचे कोर्टांत

सक्सेशन सर्टिफीकीट नंबर ८ नेमली १३ तारीख ५-२-१४

अर्जदार

मनुलाल बालकीसनदास गजराथी रा० आकोटखेड ता० आकोट जिल्हा आकोला.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं वरील अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकीट मिळण्याचा अर्ज आमचे कोर्टांत तारीख १९-१२-१३ इसवी रोजीं दिला असून त्याची चौकशीची तारीख २ माहे फेब्रुवारी सन १९१४ इसवीची नेमली आहे तरी त्या तारखेस ज्याची कांहीं तक्रार असेल त्यानीं सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हजर राहावें तसें न केल्यास वरील अर्जदार यांस सर्टिफिकीट देण्यांत येईल व पुढें कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ता०२२-१२-१३ इ

R. N. Trivedi
Senior Sub Judge
Akola

नो. नं १७

## NOTICE

AKOT MUNICIPALITY

Under section 44 (2) of the Berar Municipal Law 1886.

It is hereby published for general information that the municipal Committee of Akot have at their special General meeting held on the 5 th January 1914, passed the draft rules under section 41 (1) A. (c) of the Berar municipal Law 1886 regarding the imposition of a tax on all tame dogs kept within the Akot municipal Limits.

The Copy of the proposed rules is appended. Persons interested should send in their objections, or suggestions if any, in writing to the proposed rules, within one month from the publication of the notice, to the Committee.

After the expiry of the above period, the said draft rules will be finally considered at a special meeting and submitted to the higher authorities for sanction.

sd/ G. K. Agarwale
for chairman
Akot Municipality

Dated Akot
7th January 1914

AKOT MUNICIPALITY

Draft rules

Under section 44 (1) of the Berar municipal Law 1886 the committee propose the imposition of a tax on all tame dogs kept within the Akot municipal limits under section 41 (1) A. (c) of the Berar municipal Law 1886 at the rate of as ...-8-... per dog

The sum will be payble in advance on the 1st of April every, year by the owner of such dogs.

sd/ G. K. Agarwale
Chairman
Akot Municipality

No. No. 18

अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले.

## ओटो मोहिनी

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. १ औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—ओरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. १९

## नोटीस

चावली मर्द इरभान टाके राहणार मौजे वापटी प्रगणे कारंजा तालुका मुर्तिजापूर जिल्हा आकोला.

नोटीस देणारीण शिंगी मर्द गणाजी घाये कुणबी राहणार मौजे बोरगांव निघाटे तालुका मुर्तिजापूर जिल्हा आकोला नोटीस देते असें कीं मौजे वापटी येथील सर्वे नंबर ४ आकार रुपये १३-१२ हें शेत तुझ्या नांवानें माझा चुलता इरभान टाके हा मेल्यानंतर तुझ्या नांवानें झालें आहे. तो नंबर माझ्या आज्याच्या कमाईचा होता.

२ माझे ऐकण्यांत आले आहे कीं सदर्हू नंबर देवाच्या नांवानें बक्षिस देत आहा, तसें करण्यास तुह्मास अधिकार नाहीं. तुह्मी ह्मी संमती घेतली नाहीं, तुह्मास औरस संतती नाहीं. मी तुमची पुतणी आहे व मीच सर्वस्वी तुमच्या पाठीमागें वारसदार आहे. माझे चुलतभाऊ २ दोघे असून व ते तुमच्या जवळ ह्मणजे मौजे वापटी येथें राहत असून त्यासही तुह्मी न विचारतां लोकांच्या सांगण्यावरून शेताची खराबी करीत आहां हें बरोबर नाहीं. नोटीस पोचल्यावर तुह्मी नंबर कोणाला गहाण, खरेदी अगर बक्षीस देऊं नये. दिल्यास त्याजबद्दल तुह्मी जबाबदार आहां. तुह्मी ह्मातारे झाले आहांत. तुमच्या जवळ कोणी स्त्री अगर पुरुष नाहीं. मी तुह्मास आपल्या घरीं नेण्यास तयार आहे. तुह्मी येत नाहीं याजबद्दल मी लाचार आहे. जर तुमची इच्छा माझ्या घरीं येण्याची नाहीं तर..तुमच्याकारितां ४ चार रुपये महिन्याचा नोकर ठेवितें, व तो तुह्मास खाण्यापिण्याची सर्व प्रकारची व्यवस्था करील. कळावें.

३ माझा बाप नामे नाणोजी आणि चुलता इरभानजी हे दोघे सख्खे भाऊ असून ते मरेपर्यंत एकत्र होते. मी वडील भावाची मुलगी आहे.

सही

शिंगी मर्द गणाजी घाये राहणार बोरगांव हल्लीं मुक्काम कामरगाव इच्या हातची निशाणी-ची बांगडी

नो० नं० २०

## नोटीस

नोटीस बेशमी भुली मर्द किसन बारी रा० निमकर्द ता. बाळापूर पोष्ट पारस जिल्हा आकोला ईस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं आपण तारीख २१-११-१९१३ रोजीं नोटीस नंबर ६४९ ची वतनदार छापखान्यांतून नोटीस छापून दिली ती पावली. त्यांत आपण लिहिले तारीख १७-११-१९१३ इसवी रोजीं रकम रुपये ४४० ची प्रामेसरीनोट लिहून दिली ही गोष्ट खरी आहे. परंतु मला भरणा पावला नाहीं. कारण प्रामेसरीनोट मौ० सोगोडा येथें लिहली व तूं मला सांगितले कीं माझे घरीं निमकर्द येथें जाऊन रुपये पाठऊन देते. असें मला ह्मटलें. तूं माझी सखी बहीण असल्यामुळें मी विश्वासानें प्रामेसरीनोट लिहून तुझेजवळ दिली. तेव्हांपासून आजपावेतों रुपये दिले नाहींस व मला रुपये मागणीची नोटीसही केली वरून मला असे वाटते कीं तुझे मनांतून बेइमानी आली. तरी या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं मी लिहून दिलेली प्रामेसरीनोट मला आठ दिवसाचे आंत आणून द्यावी मला रुपयाची जरूरी नाहीं तरी माझी प्रामेसरीनोट मला वापस द्यावा न दिल्यास ती बातल असें. त्याबद्दल माझे सेत व इतर जिनगी जबाबदार नाहीं व आपण लिहिल्याप्रमाणें आपणास अव्वल जप्ती काढण्यास अधिकारही नाहीं व दावा केल्यास त्याचा खर्च मी देणार नाहीं. वरील कराराप्रमाणें प्रामेसरीनोट मला वापस न दिल्यास तुझेवर विश्वासघाताबद्दल फिर्याद करावी लागेल त्याचा खर्च व या नोटिसीचा खर्च तुला द्यावा लागेल. कळावें तारीख ९-१२-१९१३

सही

किसन वा रामजी द० खु० रा. मौ. सोगोडा

नो. नं. २१

| | | |
|---|---|---|
| तांबूल नवरत्न | } | न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबके सकाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथांची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे. |
| नवरत्न टेबलेट | } | उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे. |
| नवरत्न तमाखु | } | पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा. |
| मद्रासी नस | } | अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे |
| गजकर्णाचें मलम | } | गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे. |
| केश काढण्याचें तेल | } | केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे. |
| चन्द्रकांत बाम | } | मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे. |

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट– चमन कंपनी.

पत्ता— ताजनापेठ बाजार– आकोला.

नो. नं. १०

Oriental Government security

Life Assurance Company, Limited,

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

R. PATERSON BROWN, MANAGER.

FUNDS EXCEED 4½ CRORES.

Claims paid for over 3½ Crores.

*ALL PERSONS*

WHO ASSURE FOR THE FIRST TIME
OR
WHO INCREASE THEIR PRESENT ASSURANCE
WITH

*THE ORIENTAL*

BY EFFECTING A WITH PROFIT POLICY
ON OR BEFORE 31 ST DECEMBER 1913 WILL BE ENTITLED TO

THREE YEARS
BONUS

PROVIDED
THREE YEARS PREMIUMS HAVE BEEN PAID
AND
THE POLICY IS IN FORCE ON 31 ST DECEMBER 1915.

Prospectus, forms, and further information can be obtained on application to—
CHIEF AGENCY FOR C. P. BERARS AND KHANDESH,—
NAGPUR.

M. DESOUZA
CHIEF AGENT
*Nagpur.*

No N. 11

त्रिकाल दर्शी आरसा?

तुह्मास भूत, भविष्य वर्तमान जाणणे असल्यास ही जाहीर खबर वांचून त्वरित ऑर्डर धाडा. ह्या आरशासारखें त्रिकाळ ज्ञान प्राप्त करण्याचें साधन जगांत दुसरें एकही नाहीं. तत्संबंधानें शेकडा सरटीफिकीटें मिळालीं आहेत. श्रद्धाळू मुलें, स्त्रीया आणि पुरुष स्वतःचे विचार आणि त्यांचे परिणाम पाहूं शकतात. गांव परगांव दूर देशांतर आणि दूरच्या मित्र व सोयऱ्यांच्या मदतीने तुह्मांस सहज मिळू शकतील. अमूक काम होईल किंवा कसें? अमूक बाबतींत काय परिणाम होतील, व्यापारांत नफा किंवा तोटा, अमुक पदार्थाच्यां किंमतींची कमीजास्ती, परिक्षेचे परिणाम, चाकरी वगैरे कांहीं तुमच्या मानाचा खुलासा करावयाचा असेल तो सर्व होऊं शकेल किंमतः—

| | | |
|---|---|---|
| साध्या काचेचा रु. २-९ | } | प्रत्येक पोस्टेज सहित |
| बिलोर काचेचा मजबूत रु. ३-९ | | |
| मुद्दाम मोठे बिलोर कांचेचा मजबूत रु. ६ | | |

हिंदुस्थाना बाहेरच्या ग्राहकानें २ रु. जास्त धाडाव.

आशाभाई वाघजीभाई पटेल मु०
करमसद, ता० आनंद जिल्हा खेडा.

नो. नं. १२

वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

राजवंशी साठ्याचें तेल,

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो"

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट, यांचा दवाखाना.
३८ जांवळी मोहल्ला मुंबई

नो० नं० १३

सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

आयोडाईज्ड सार्सापरिला.



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षे अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धिवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याचा सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाणः-- डॉ गौतमराव केशव
५६३ ठाकूरद्वार मुंबई.

नो० नं० १४


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बल्लाळ फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४८ ] आकोला–– सोमवार तारीख १९ माहे जानेवारी सन १९१४ इ० अंक ३

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मार्गे राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पाच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं १

## मुंबइ बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या **आकोले आणि उमरावती** येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{३}{४}$ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
आकोला २१-९-१० } एजंट
नो० नं० २

## अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः– श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगात दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेनाईट नोट पेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु १ व्हीपीनें रु० १०६




**सर्वत्र एजन्टस् पाहिजेत**

**पत्ता––बेंद्रे आणि कंपनी पुणेसिटी**

नो० नं० ३

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १०८

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरुज यांचा विकार एका दिवसां नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ४

## 'विकावयाचा आहे.'

वाशीम येथील, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टाजवळ असलेला कै॥ राव बहादूर पुरुषोत्तमराव नारायणभट यांचा बंगला विकावयाचा आहे.

खेडवा ते इंगोली व्हाया वाशीम लौकरच रेल्वे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ५ वऱ्हाड

## रामबाण उपाय.

### रक्त पिती व कोड

दहाहजार पुड्याफुकट. आह्मीं आमच्या औषधाची खात्री पटावी ह्मणून १०००० नमुन्याच्या पुड्या करण्याचें योजिलें आहे या पुड्या वरील महारोग दुरुस्त होण्यासारख्या आहेत. हे त्या निःसंषय सिद्ध करितील या पुड्या वापरून अनुभव पहावा ह्मणजे खात्री होईल. नमुन्याच्या पुडीची किंमत फक्त ०= ठेविली आहे. ही किंमत फक्त टपाल हशील वगैरे खर्चापुरतीच आहे.

२ आह्मीं रक्तपिती; कोड, हे कसे उद्भवतात त्याची शुश्रुषा कशी करावी? वगैरे माहितीचे इंग्रजी व बंगाली भाषेंत पुस्तक तयार केलें आहे तेंही पण गरजूनीं अवश्य वाचण्या लायक आहे. ह्मणजे त्या पासून त्वचे संबंधी रोगांची पूर्ण माहिती होईल किंमत फक्त ट. ख. सह ॥= सर्व पत्र व्यवहार इंग्रजींत करावा.

पण्डित कृपाराम
८ नंदीबागानलेन पो. सालकिया जि.
नं. ६ हावरा.

## "भानगड नको."

१ खरुज, गजकर्ण, खवडा, फोड, खाज, आगपैण, दाद, अंजुत, भद, नख धावेने, सुकी खाज, आग व पाणी सुटणे व साधारण कोणत्याही त्वचा विकारांवर १ च मलम १-२ वेळ लावल्यानें गुण देऊन ३ दिवसात कायमचा फायदा होतो. किं ४ आणे.

२ कापूर, शेप, पुदीना, पेपरमिंट, ओवा, हिंग, दालचिनी, दोडे, यांचे अस्सल अर्क उपयोग सोबत असतो किं ४ आणे.

३ केंस आण्याची बरींच औषधें निघालीं त्यांत बरेंच विकार ग्राहकांचे नजरेस येतात पण आमचें औषधानें जाग काळी न पडता व इजा नहोतां फारच लवकर केंस जाऊन, लवकर येत नाहींत किं. फक्त २ आणे.

पत्ता––व्हि. आर. मुळे. नांदुरा.
जी. आय. पी.
नो. नं ७

## चांदीचीं भांडीं.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**
नो. नं. ८

## अंबाजी तारंगा लाईट रेल्वे कंपनी.

### लिमिटेड

सदरहु कंपनीच्या कित्येक भागीदारांकडून हल्लीं मुंबईस चाललेल्या ब्यांकांच्या धामधुमींत कंपनीस कांहीं धक्का वगैरे बसला किंवा काय यासंबंधी व कंपनीच्या कामासंबंधीं वारंवार चौकशी होत असल्यामुळें कंपनीच्या सर्व भागिदारांस जाहीर रितीनें कळविण्यांत येते कीं हल्लींच्या चळवळींत ह्या कंपनीस कांहीं धोका न बसतां सर्व काम सुरळीत रितीनें चाललें आहे. रेल्वेचें १२ मैलाचे व स्टेशनें वगैरेचेंही बांधकाम संपलें असून येत्या जानेवारी महिन्यांत रूळ टाकण्यास सुरवात होऊन एप्रील अखेर बहुतेक १२ मैल लाइनवर गाडा चालू होईल. तसेंच पुढील बांधकाम जारीनें सुरू असून तेंही होतांहोईल तों लवकर पुरें करण्याबद्दल योग्य तितकी व्यवस्था करण्यांत येत आहे. सबब भागिदारांनीं कंपनीच्या अस्तित्वाबद्दल कोणत्याही प्रकारचा संशय न बाळगतां वेळोवेळीं मागतलेले कॉलचे पैसे कंपनीच्या आफिसांत भरावें कळावें.

४ ब्रूसलेन फोट मालचंद्र आणि नगिनदास
मुंबई एजन्टस्
नो. नं. ९

## नोटीस

नोटीस बेशर्मा तानी मर्द सूर्यभान सिंदे रा. सांगवी बाजार ता० आकोला यांस

खालीं सही करणार याजकडून नोटीसीनें कळविण्यांत येते कीं आमचे मालकीचे शेत सर्वे नंबर १४ पैकीं १ एकर ८०३५ गुंठे आकार रुपये १६ आहे. त्या सेताची दरसाल तुह्मी लागवण करीत असतां तरी नोटीसीनें कळविण्यांत येते कीं सदहू शेत आमचे मालकीचें आहे. तें शेत तुह्मी कोणास गहाण वगैरे देऊनये व कोणीही सदहू शेत गहाण वगैरे घेऊनये. आह्मी तुह्मास मरेपर्यंत अन्न वस्त्र देत जाऊं. सदहू शेतावर तुमचा कोणतेच प्रकारचा हक्क नाहीं. ता० ९-१-१४ दस्तुर गोविंद बाळकृष्ण रा० सांगवी बाजार सही

नागा उद्देभान
संपत चंद्रभान रा. सांगवी बाजार
नो. नं. १०

## पत्र व्यवहार

### गणपती

राजा सोमकांतास श्री गजाननाची कृपा कशी झाली या बद्दलची कथा फारच मनोरंजक आहे. ती कथा आपणास सांगितल्यास अप्रस्तुत होणार नाहीं. आमच्या वैदिक अथवा पौराणीक कथा ऐकणाऱ्याचे मनस्थितिबद्दल कांहीं नियम आहेत. ते नियम ज्यास मान्य आहेत त्यासच पुराण श्रवणाचा खरा लाभ होत असतो. सूत शौनकादीक ऋषींस उद्देशून ह्मणतो अतोऽहं 'साधु' वृत्तेभ्यः कथ इष्ये विशेषतः ह्मणजे सदाचारी पुरुषासच मी कथा सांगेन. अर्थात अश्रद्धावान् व दुराचारी पुरुषास गजाननाचे अवतार चरित्राचें रहस्य कळणें कठीण आहे. त्यानीं ह्मटलें आहे पाखंडिना नास्तिकानां न भवेत् पाप कर्मिणां—यांना श्रवण होऊं शकत नाहीं. त्यानीं ह्मटलें आहे.

गणेशाख्य पुराणस्य श्रवणे द्विज सत्तमाः ।
माया येषां नसंसारे न दारापत्य भूमिषु ॥

ज्यांची बाह्य विषयासक्ति नाहींशी झाली नाहीं ते अवतार कथा ऐकण्यास योग्य नाहींत. सौराष्ट्रांत देवनगर नावाचें शहरीं सोमकांत नावाचा राजा राज्य करीत होता. तो संतती व संपत्तीयुक्त असून प्रजापालन दक्ष असा धर्मात्मा होता. सोमकाताच्या भार्येचें नांव 'सुधर्मा' असें असून पुत्राचें नांव सुकंठ असें होतें. हीं सर्व नांवें अन्वर्थक होतीं हें त्याचे चरित्रावरून समजण्यासारखें आहे. प्रजेस अत्यंत प्रिय असलेला असा तो-राजा सर्व ऐश्वर्य भोगीत असतां एका एकीं त्यास महारोग उत्पन्न झाला! त्याचे सर्व अंग गलितकुष्ट झालें. त्यास त्याच्या दुःखाच्या वेदना असह्य झाल्या. त्याचे सर्वांगास दुर्गंधी येऊं लागली. अशा स्थितींतही राजाचे धर्मपत्नीनें त्यास सोडलें नाहीं, येवढेंच नाहींतर ती जास्त जास्त भक्तिपुरस्सर राजाचे सेवेंत तत्पर राहिली. आपण राज्य शकट चालविण्यास योग्य नाहीं असें वाटून सर्व राज्य पुत्राचे स्वाधीन करून वनात जाण्याचा राजानें निश्चय केला. तेव्हां त्या साध्वी पत्नीनें अमात्यांस बोलाऊन सांगितलें "व्रजे सहानेन प्रधानवर्या प्रशिष्ट राज्यं सहने सुतेन" सुधर्मा राणीनें त्यावेळीं जो उपदेश केला आहे व राजाचे दुःखांत भागीदार होण्याचें जें कारण सांगितलें आहे तें प्रत्येक स्त्रीनेंच काय परंतु कुटुंबातील प्रत्येक मनुष्यानें ध्यानांत धरण्यासारखें आहे. ता ह्मणते-मयापि नानाविध भोगवस्या सुखेन राज्यं परि भुक्तमस्य । स्त्रिणांहि भर्ता गमनं सदैव परत्रलोके मुनिभिःप्रादिष्टम् ॥ ह्मणजे नाना प्रकारचे भोग भोगणाऱ्या मीही ( राजाबरोबर ) राज्य सुखानें भोगलें आहे व पतीसह वर्तमान स्त्रियांनीं परलोकीं अर्थात [ स्थूल-देहानंतर सूक्ष्म भूमिकेवर देखील ] परत्र गमन करावें. राजाची ही स्थिति पाहून व राजा वनांत जाणार हें समजल्यापासून राजपुत्र सुकंठासही परम दुःख झालें. राजानें अमात्य, भार्या व पुत्राची पुष्कळ समजूत घातली परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. राजा श्रीरामचंद्राप्रमाणें सोमकांताचे मागें त्याची प्रजा, अमात्य मंडळी भार्या व पुत्र जाऊं लागले. सायंकाळचा मुक्काम गांवाबाहेर झाल्यानंतर दुसरे दिवशीं राजानें आपले प्रजाजनास, अमात्यांस व पुत्रास आग्रहपूर्वक परत जाण्यास सांगितलें. या वेळेस राजानें आपले पुत्रास उपदेश केला आहे. तो फार वाचनीय आहे. सुकंठानें मातेस परत चलण्याविषयीं विनंति केली. तेव्हां तिनें उत्तर दिलें आहे. बाळा, 'पातिव्रत्येन धर्मेण परवत्यस्मि बालक । भर्तुरन्योन देवोऽस्ति योषितां मान्य एवच ॥ सर्व मंडळी परत गेल्यानंतर राजा जवळ त्याची सहधर्मिणी, व तीन अमात्य राहिले होते. एके दिवशीं प्रातःकाळीं तृणावर गलित कुष्ट, सर्व अंगांतून रक्त व पूं वाहत आहे अशा स्थितींत तो राजा निजला आहे, त्याचे जवळ ती साध्वी सुधर्मा सेवेंत तत्पर आहे, अमात्य कंदमुळें आणण्यास दूर गेले आहेत, अशावेळीं तेथें एक तेजस्वी मुलगा आपले पित्याकरितां उदक नेण्यास आला होता. त्यानें या अप्सरेसदृश परंतु गलित कुष्ट पुरुषाजवळ बसलेल्या राणीस पाहिलें! त्यास तिला पाहून मोठें आश्चर्य वाटलें. तिची चवकशी करून जवळच आश्रमात त्याचा पिता भृगुऋषि राहत होते. त्यास सर्व हकीकत सांगितली. भृगूऋषीस करुणा येऊन त्यानीं लगेच त्यास आश्रमांत आणण्याकरितां पुत्रास पाठविलें. यासच साधू, जविन्मुक्त महात्मा ह्मणतात-'जे का रंजले गांजले त्यासि ह्मणवी आपुले । तोचि साधू ओळखावा देव तेथेंची जाणावा ॥ वेदकालिन् ब्राह्मणास जो देवतुल्य मान होता त्याचें तरी हेंच कारण आहे. हल्लीं ब्राह्मण हें आडनाव आहे. ब्राह्मण कुलात येणें हें हल्लीं भूषण नसून दूषणच आहे व ह्मणून तुकोबानीं ह्मटलें आहे "बरा झालो कुणबी झालो । ना तरी दंभेचि असतो मेलो " अशा रीतीनें हल्लीं ब्राह्मणत्वाची श्रेष्ठता आहे.

असो नंतर राजास अशी स्थिति प्राप्त होण्याचें कारण भृगुऋषींनीं ध्यानानें जाणून घेऊन राजा सोमकांतास त्याच्या पूर्वजन्माची सर्वकथा सांगितली. पूर्वीच जन्मात सोमकांतानें उन्मत्तपणानें ब्रह्महत्याकरून, अनेकास आपल्या दुर्वर्तनानें पिडिलें होतें. परंतु अखेर मरण समयीं जमविलेल्या पैशांतून श्री गजाननाचे वनामध्यें असलेल्या एका मंदिराचा जीर्णोद्धार केला होता. त्यास यमलोकीं नेल्यानंतर प्रथम पुण्य भोगतोस अगर पाप भोगतोस असें विचारलें. त्यानें प्रथम पुण्य भोग मागितला व ह्मणून राजानें प्रथम ऐश्वर्य व भोग प्राप्ती झाली नंतर पूर्व पाप भोगण्या करितां या रोगाचें दुःख भोगावें लागलें. ही गोष्ट ऐकून प्रथम राजास शंका आली लगेच राजाच्या अंगांतून हजारों पक्षी निघून राजाचें मांस तोडूं लागले. राजा अत्यंत व्याकूळ झाला तेव्हां गजानन मंत्रानें त्याचे अंगावर उदक सिंचन करतांच ते पक्षी नाहिसे झाले. नंतर ऋषींनीं आपले तपःसामर्थ्यानें त्याचे अंगातून निघालेल्या पाप पुरुषाचा नाश करून त्या राजास क्लेशापासून सोडविलें. तेव्हां राजानें श्री गजाननाचें महात्म ऋषीस विचारलें, तेंच गणेशपुराण होय. राजा सोमकांताचे चरित्रांत पुष्कळ प्रसंग फार विचार करण्या सारखे आहेत. भार्येची पतिनिष्ठा, पुत्राची पितृभक्ति, प्रजेचें राजाबद्दल असलेलें प्रेम, राजाचें प्रजा वात्सल्य, पूर्व जन्म दृष्टि शक्ति कर्म विपाक, व अखेर सर्व पाप दग्ध करण्याचें ऋषिसामर्थ्य असे पुष्कळ प्रश्न मनन करण्यासारखे आहेत. पूर्वकर्म जीवास कसें भोगावे लागते हें उत्तम समजतें.

श्री गजाननानीं अनेक अवतार घेतले त्याबद्दल आपण पुढें केव्हां तरी विचार करूं परंतु भाद्रपद शु॥ चतुर्थीस आपण जो उत्साह करितो त्याबद्दल विचार केला पाहिजे.

अपूर्ण

# वऱ्हाडसमाचार

पौष वद्य ८ शके १८३९ प्रमादी

## भारतीय शिल्पशास्त्र.

सर्वभक्षक आणि सर्वांच्या स्मृतीचा लोप करणाऱ्या कालाच्या तडाख्यांत आमचे किती शास्त्रग्रंथ नष्ट झाले कोणास ठाऊक, पण जे कांहीं थोडेसे आज हजारों वर्षांनीं आमच्या भाग्यानें पुनः उपलब्ध झाले आहेत त्यांच्या बहुमोल गुणांवरून असें वाटतें कीं या शास्त्रग्रंथांच्या नाशासारखी आमची येवढी मोठी हानि दुसरी कोणतीही नसेल. आमचें गणितशास्त्र, ज्योतिष, गायनशास्त्र, व्याकरणशास्त्र, छंदशास्त्र इ० अनेकशास्त्रें इतकीं पूर्णत्वाला गेलेलीं आहेत कीं सभ्याचे पाश्चात्य पंडितांच्या आदराला तीं पूर्णपणें पात्र झालीं आहेत. नष्ट झालेले शास्त्रग्रंथ आज उपलब्ध असते तर या आदरांत केवढी भर पडली असती! भारतीय सुधारणा ही अन्यसापेक्ष नसून स्वतंत्र होती हें कसें बिनचुक दाखवितां आलें असतें, आणि भारतीय सुधारणेवर शितोडा उडविणाऱ्या आक्षेपकांचीं तोंडें बंद करतां आलीं असतीं. अलीकडे भारतीय शिल्पशास्त्रासंबंधानें पाश्चात्य व प्राच्य असे दोन स्वतंत्र पंथच झाले आहेत, व पहिला दुसऱ्याची उठल्या सुटल्या निंदा करीत आहे. अशावेळीं प्राच्य अथवा भारतीय शिल्पकलेचें यथार्थ स्वरूप लोकांच्या लक्षांत येऊन त्या कलेला तिचें योग्य उच्चस्थान प्राप्त होण्यास त्या कलेसंबंधाची शक्य तेवढी माहिती प्रस्तृत करणें हाच उत्तम उपाय आहे. कलकत्त्यास बाबू अवनींद्रनाथ टागोर व त्यांचा शिष्य वर्ग, मि. हावेल व सिलोनचे डा. कुमार स्वामी हेच सध्या या भारतीय शिल्पविद्येचे ज्ञाते आचार्य आहेत. तेव्हां यांच्या लेखांवरूनच भारतीय शिल्पकलेविषयींची शास्त्रीय माहिती मिळविणें अवश्य आहे

खरा बुद्धिमान्, प्रतिभावान, ओजस्वी शिल्पकार शिल्पशास्त्राच्या नियमांनीं बद्ध नसतो, त्याच्या करितां शास्त्राचे नियम नाहींत ही गोष्ट आमच्या शास्त्रकारांनीं कबूल केली आहे. त्यांनीं ह्मटलेंच आहे— 'एकेषामेव तद्रम्यं लग्नं यत्र यस्य हृत । शास्त्रमान विहीनं यत् रम्यं तद्विपश्चिताम् ॥' शिल्पकारानें आपलें बुद्धि सर्वस्व खर्चून आणि आपली सगळी करामत लावून तयार केलेली मूर्ति शास्त्रनियमाला सोडून असली तरी ती आपला प्रभाव दाखविल्यावांचून राहावयाची नाहीं. अशा प्रतिभावान शिल्पीसाठीं शास्त्रें नहींत. शास्त्रें निर्माण करणारा तो, त्याला शास्त्रें काय बंधन घालणार ?

पण सगळेच शिल्पी प्रतिभावान् नसतात. आणि अशांच्याच उपयोगासाठीं शास्त्रें झालीं आहेत. आपल्या भारतीय शिल्पशास्त्राप्रमाणें १ नरमूर्ति, २ क्रूर मुर्ति, ३ आसुर मूर्ति, ४ बाला मूर्ति व ५ कुमार मूर्ति असे मूर्तीचे पांच प्रकार आहेत. या निरनिराळ्या प्रकारच्या मूर्तींच्या रचनेसंबंधाचीं निरनिराळीं तालमानें शास्त्रकारानीं सांगितलीं आहेत. ताल ह्मणजे बारा अंगुळें पहिला प्रकार नर मूर्ति. यांत नर नारायण, राम, इंद्र, भार्गव, अर्जुन इ.च्या मूर्ति येतात. याचें परिमाण १० ताल. दुसऱ्या ह्मणजे क्रूर मूर्तींत भैरव, नरसिंह, चंडी, इ.च्या मूर्ति येतात. याचें परिमाण १२ ताल. तिसऱ्या आसुरी मुर्ति. यात महिषासुर, रावण, वृत्र, कुंभकर्ण, हिरण्यकशिपु इ. असुरांच्या मूर्ति येतात. यांचें परिमाण १६ ताल. वटपर्णावर शयन करणारा बालकृष्ण, व इतर मुलाच्या मूर्ति या चौथ्या ह्मणजे बालवर्गांत येतात. याचें परिमाण पांच ताल. बालवय संपून तारुण्याची कळी उमलूं लागली आहे अशा ह्मणजे वामन, उमा, पार्वती, सीता, लक्ष्मी यांच्या मूर्ति या पांचव्या ह्मणजे कुमार मूर्तींच्या प्रकारांत येतात. यांचें परिमाण सहा तालें समजावें. पण सरसकट मध्यम प्रमाण ह्मणजे नऊ ताल हें उत्तम समजतात. या नऊ ताल परिमाणाच्या मूर्तीच्या उंचीचे नऊ भाग केले असतां एकेक भाग एकेक ताल होतो. या एकेका तालाच्या चतुर्थांशाला अंश ह्मणतात. नऊताल उंचीच्या मूर्तींच्या निरनिराळ्या अवयवांचीं मानें अशीं असतात-कपाळाच्या मध्य बिंदुपासून गालाच्या खालच्या भागापर्यंत १ ताल; कंठापासून छाती १ ताल, नितंबभागापासून गुडघे २ ताल, मध्यप्रदेश १ अंश, कंठ १ अंश, गुडघ्यापासून पायापर्यंत २ ताल, गुडघा १ अंश विस्तार— मस्तक १ ताल, कंठ २॥ अंश, एका खांद्यापासून दुसऱ्या खांद्याचें अंतर ३ ताल, छाती ६ अंश, नितंब २ ताल इ. हाताची लांबी-खांद्यापासून कोपरापर्यंत २ ताल, व कोपरापासून मनगटापर्यंत ८ अंश, तळहात १ ताल. मुखाचे तीन भाग कल्पितात. पहिला भाग कपाळाच्या मध्य बिंदू पासून डोळ्यातल्या भावलीच्या मध्यापर्यंत, दुसरा तेथून नाकाच्या शेंड्यापर्यंतचा, आणि तेथून गालाच्या खालपर्यंतचा. शुक्राचार्यांच्या मतें पुढील परिमाणात निरनिराळे अवयव असावे-कपाळ ४ अंगुळें, नाक ४ अं, नाकाच्या शेंड्यापासून हनवटी ४ अं, मान ४ अं, भुवईची लांबी ४ अं, व रुंदी अर्धे अंगुळ, कानाची उंची ४ अं, रुंदी ३ अं, डोळ्यांतली भावली नेत्राच्या लांबीच्या एक तृतीयांश इतकी, तळहात ७

अं, मधलें बोट ३॥ अं, अंगठा ३॥ अं, पावलाची लांबी १४ अं, पायाचा अंगठा २, तर्जनी २॥ मधलें बोट १॥ व करंगळी १॥ अंगुलें असावीं. स्त्री मूर्तीचें परिमाण पुरुषमूर्तीपेक्षां प्रायः एका अंशानें कमी असावें. मुलाची मूर्ति करताना त्याच्या कंठापासून पायापर्यंतची लांबी त्याच्या तोंडाच्या लांबीच्या ४॥ पट, त्याचे हात मुखाच्या किंवा पावलाच्या दुप्पट, अशा प्रमाणांत असावीं. त्याची मान आखुड, डोकें मोठें, व शरीराची वृद्धि त्याच्या वयाच्या मानानें असावी. मूर्तीच्या आकृति प्रकृतीविषयीं सांगताना शास्त्रकारांनीं जागोजाग फल, पुष्प, किंवा जीव यांचीं उदाहरणें देऊन त्यासारखी असें ह्मटलें आहे. जसें-'मुखं वर्तुलाकारं कुकुटांडाकृतिः' ह्मणजे मुख कोंबड्याच्या अंड्यासारखें लांबट गोल असावें. 'ललाटं धनुषाकारं' ह्मणजे कपाळ धनुष्यासारखें अर्धचंद्राकृति असावें, 'भ्रुवई निंबपत्राकृतिर्धनुष्याकृतिर्वा' ह्मणजे पुरुषाच्या मूर्तींत लिंबाच्या पानासारखी व स्त्री मूर्तींत धनुष्याकृति असावी, व हर्ष, भय, क्रोध इ. विकार सूचित करावयाचे असता वायुविचलित निंबपत्राप्रमाणें ती आकुंचित, अवनमित, उन्नमित, वगैरे असावी. नेत्र मत्स्याकृति असावे. खंजन नयन, हरिण नेत्र, कमलनयन, पद्मपलाश नयन असे त्यात आणखी पुष्कळ प्रकार आहे. नारी मूर्तीचे नेत्र चंचल असावे. कान 'ग्रंथलकारवत्' असावे असें ह्मटलें आहे. ह्मणजे ग्रंथ लिहितांना ल हें अक्षर जसें काढतात तसें कान काढावें. नाक 'तिल पुष्पाकृतिर्नाम' ह्मणजे तिळीच्या फुलासारखें असावें असें ह्मटलें आहे. पण हें देवी किंवा स्त्रीमूर्ति यांच्यासंबंधानें समजावें. पुरुष-मूर्तीच्या नाकाचा आदर्श ह्मणजे 'शुकचंचु' हा होय. अधर किंवा खालचा ओंठ 'बिंबफलवत्' असावा. हनवटी आम्रबीजासारखी असावी. कंठ शंखासारखा तीन वळ्यांनीं युक्त असावा. कंठांतून शब्द निघतो व शंखांतूनही निघतो तेव्हां ही उपमा योग्य आहे. कंठाच्या खालूपासून उदरापर्यंतचा शरीराचा भाग गोमुखासारखा असावा. यानें वक्षस्थळाचा कठीणपणा, कटिप्रदेशाची कृशता, व जठराचा कोंक विलंबित भाव व रचना हीं सुंदर रीतीनें सूचित केलीं आहेत. शरीराचा मध्यभाग डमरू किंवा सिंहकटीसारखा असावा. बाहु 'करिकराकृतिः' ह्मणजे हत्तीच्या सोंडेसारखे व खांदे 'गजतुंडाकृति' असावे. कालिदासानें खांद्याला वृषाची उपमा दिली आहे. बाहुला हत्तीच्या सोंडेची उपमा नुसत्या आकृतीकरिताच दिलेली नाहीं, तर दोघांचेंही चलनवलनाचे प्रकार, विक्षेप वगैरे सारखे असतात. कोपरापासून मनगटापर्यंतचा हाताचा भाग 'बालकदलीकांडा' प्रमाणें असावा. बोट 'शिंबीफलवत्' असावें, मांडी केळीच्या गाभ्यासारखी, गुडघा 'कर्कटाकृतिः' ह्मणजे कर्कटाच्या अथवा खेकड्याच्या पाठीच्या हाडासारखा असावा. जंघा मत्स्याकृति, कर व पाय कमळाच्या पानासारखे असावेत, असे भारतीय शिल्पशास्त्रग्रंथांत नियम घालून दिले आहेत. हे नियम किती व्यापक व सूक्ष्म अवलोकनांती आणि सौंदर्याच्या कल्पनेशीं पूर्णपणें जुळवून ठरविण्यांत आले आहेत हें अजंठा, वेरूळ, कार्ला, इ. ठिकाणच्या लेण्यांतलीं चित्रें ज्यांनीं लक्षपूर्वक पाहिलीं असतील त्याच्या लक्षांत चटकन् येईल. भारतीय शिल्पकार नियमाबरहुकुम रचना करीत नाहींत, त्यांची कृति सशास्त्र किंवा सृष्टिदेवतेनें पुढें ठेविलेल्या आदर्शानुरूप नसते असें भलभलते प्रलाप करणारांनीं वर जे नियमांचे थोडेसे मासले दाखविले आहेत त्यातला प्रत्येक नियम घेऊन तो काळजीपूर्वक तपासून पहावा, आणि हे नियम पाश्चात्य शिल्पशास्त्राच्या नियमापेक्षां निसर्गाला किती अधिक धरून व विद्यार्थ्यांची समजूत पटण्याला किती सोपे आहेत याची स्वतः खात्री करून घ्यावी. भारतीय शिल्पशास्त्रासंबंधानें दुसरे कांहीं आक्षेप घ्या, पण तें शास्त्र नियमबद्ध नाहीं, किंवा निसर्गदेवतेच्या स्वरूपाला सोडून आहे हा आक्षेप कधींही टिकणार नाहीं. भारतीय शिल्प ग्रंथ उपलब्ध झाले नाहींत तोंपर्यंत अशा टीकाकाराना फावेल, पण हा काळ लवकरच संपून भारतीय शिल्पकला प्रकाशांत येईल अशीं सुचिन्हें भाग्यानें दिसूं लागलीं आहेत.

## प्रेस आक्टाची सुधारणा.

कामरेड पत्रावरील खटल्यांत कलकत्ता हायकोर्टाचे चीफ जस्टिस सर लॉरेन्स जेन्किन्स यांनीं आपल्या निकालात प्रेसआक्टामधले जे दोष दाखविले होते ते अशा स्वरूपाचे होते कीं सरकार आपण होऊनच या आक्टाची सुधारणा करील अशी अपेक्षा करणें गैरवाजवी झालें नसतें. प्रेस आक्ट पास झाला त्यावेळची स्थिति भयप्रद होती. अर्थात् घाईघाईनें त्या स्थितीला तोंड देण्याकरिता कायद्याचा मसुदा तयार झाला, आणि तत्कालीन स्थितीकडे लक्ष देऊन बहुतेक नामदार समासदांनीं त्याला संमतिही दिली यावेळीं लॉ मेंबर मि. एस. पी. सिंह यांनीं लोकांना जीं आश्वासनें दिलीं होतीं व कायद्याची बजावणी अन्यायाची व जुलमाची होऊं नये ह्मणून ज्या तजवीजी आक्टांत केल्या आहेत ह्मणून सांगितलें त्यांचा फोलपणा कामरेड वरील खटल्यानें उघडकीला आणिल्यापासून या आक्टामध्यें वाजवी त्या सुधारणा करून लोकांच्या मनांत स्वस्थता स्थापित करण्याची आवश्यकता अधिकच दिसूं लागली. पण खेदाची गोष्ट आहे कीं सध्याच्या होम मेंबराला सध्याच्या प्रेस आक्टांतले दोष नजरेस आणून दिले तरी दिसत नाहींत. गेल्या आठवड्यांत वरिष्ठ कायदेकौंसिलापुढें ना० मि० सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं प्रेस आक्ट सुधारणेबद्दलचा ठराव आणिला होता, पण सदर ठराव बहुमतानें नामंजूर झाला. सुखाची गोष्ट येवढीच कीं बहुतेक सगळ्या लोकनियुक्त समासदांनीं ठरावाचें पुष्टीकरण केलें. पण सदर आक्टांच्या निरनिराळ्या कलमांतला विरोध काढून टाकण्यास सरकारी अधिकारी व सरकार नियुक्त सभासद विरुद्ध असल्यानें सदर ठराव नामंजूर झाला. लॉर्ड हार्डिंज यांच्यासारख्या उदार आणि विचारी व्हाइसराय साहेबांच्या कारकीर्दींत ही चुकीची दुरुस्ति झाली नाहीं याबद्दल फार निराशा वाटते. तथापि हातपाय न गाळतां ना. मि. बॅनर्जी यांनीं सदर ठराव पुनः लवकरच आणावा अशी आमची सूचना आहे. जॉन बुलची धिमेपणाबद्दल ख्याति आहे तशीच न्याय प्रियतेबद्दलही आहे, तेव्हां आज नाहीं तरी कालांतरानें सरकारची सदर ठरावाच्या उपयुक्ततेची खात्री होऊन इष्ट सुधारणा घडून येईल अशी उमेद आहे.

## राज्यपद्धतींत सुधारणा.

लॉर्ड हार्डिंज यांची कारकीर्द आणि राज्य पद्धतींत प्रगति या गोष्टी समानार्थक आहेत असें आतां पर्यंतच्या अनुभवावरून व्यक्त झालेंच आहे. व्हाइसराय साहेबांच्या अल्प कारकीर्दींत अनेक महत्त्वाच्या सुधारणा झाल्या आहेत व लवकरच एक मोठी क्रांतिकारक सुधारणा घडून आणण्याचा त्याचा विचार आहे असें बाहेर आलें आहे. सध्याच्या राज्यपद्धतींत सुशिक्षित हिंदी लोकांचा हात ज्यास्त शिरकावा व त्यामुळें त्यांच्यातली असंतुष्टता कमी व्हावी हा उद्देश मनात धरून त्यांनीं कांहीं सुधारणा सुचविल्या आहेत व या सूचना स्टेट सेक्रेटरी साहेबांकडे गेल्या आहेत, असें कळतें. या बाबतींत कितपत तथ्य आहे तें आह्मांस ठाऊक नाहीं. तथापि लॉर्ड हार्डिंज साहेबांच्या सूचना फार मुत्सद्दी धोरणाच्या व हिंदुस्थानच्या आणि ब्रिटिश साम्राज्याच्या हिताच्याच असतील याविषयीं कोणाचाही मतभेद असणें शक्य नाहीं.

## महार वि. ब्राह्मण.

उमरावतीस 'बहिष्कृत भारत' नांवाचें एक नवीन पाक्षिक पत्र सुरू झालें आहे. याचें संपादकत्व रा. गणेश अक्काजी गवई नांवाच्या एका तरुण अस्पृश्य वर्गातील ब्राह्मसमाजिस्ट गृहस्थाकडे आहे. अशिक्षित, अस्पृश्य, सर्वथा त्याज्य मानलेल्या वर्गातल्या एका उत्साही व तरुण गृहस्थानें पुढें सरसावून आपल्या बंधूंच्या उन्नतीसाठीं अशा प्रकारचा उद्योग हातीं घ्यावा ही गोष्ट सर्वथा अभिनंदनीय आहे यांत शंका नाहीं त्यात पुनः होता होईल तों स्वावलंबनाच्या तत्त्वावर कार्य करण्याची संपादकाची जी प्रतिज्ञा आहे ती तर फारच बाणेदार आहे. आमचें हें नूतन भावंड चिरायु होऊन आपली प्रतिज्ञा शेवटास नेण्याचें सामर्थ्य त्याला प्राप्त होवो येवढेंच इच्छितों. जाता जातां सुबोध पत्रिका कर्त्याबरोबर आह्मीही आमच्या भावंडाला येवढेंच सांगतों कीं ब्राह्मणांनीं महारांना आजपर्यंत दाबून ठेविलें किंवा उन्नतीचे कामीं मदत केली असे वादग्रस्त प्रश्न उकरून काढून जातिद्वेष संपादण्याचें श्रेय संपादकांनीं घेऊं नये. अस्पृश्य वर्गाच्या उन्नतीच्या चळवळीसंबंधानें लिहिण्याच्या हरएक प्रसंगीं असली सावधगिरीची सूचना आह्मांस याचीशी वाटते. कारण मागसलेल्या वर्गातल्या पुष्कळ पुढाऱ्यांना आपल्या अवनतीच्या अपेशाचें खापर ब्राह्मण वर्गाच्या कपाळीं फोडल्या खेरीज आपल्या कार्याचा श्रीगणेशाच करता येत नाहीं असें बहुधा आढळण्यात येतें. बहिष्कृत भारताचे संपादक ही 'महारविरुद्ध ब्राह्मण' अशाप्रकारचे हेडिंग आपल्या लेखांना देऊन तशा प्रकारच्या मोहांत आपण गुरफटले गेलों आहों असें अप्रत्यक्षरीत्या दाखवीत आहेत. ह्मणून त्यांना ही मित्रत्वाची सूचना करीत आहों. तिचा ते योग्य विचार करोत.

## प्रांतिक कायदे कौंसिल.

आजकाल आमच्यांतील सुशिक्षित व लोककार्यकारी गृहस्थाच्या बोलण्याचालण्यांत आणि विचारभुवनांत प्रांतिक कायदे कौंसिलाच्या गोष्टी घोळत आहेत. कदाचित् जनसमूहाला या गोष्टी आवडत ही नसतील पण साऱ्या जनतेच्या कल्याणाच्या विथीका उघड्या करून देण्याची सर्व सत्ता लोकाग्रणींच्या हातीं असते. ते ज्याप्रकारें आपली सत्ता बुद्धीच्या द्वारानें, विद्वत्तेच्या जोमानें व राजभक्तीच्या जिव्हाळ्यानें चालवितील त्या मानानें प्रजा व सरकार यांचा एकजीव होऊन नवीन बनत चाललेल्या राष्ट्राच्या उभारणीला उभयतां मनोभावें मदत करण्यास शिकतील. प्रांतिक कायदे कौंसिलाचे अधिकार नवे आहेत खरे पण विद्येचा प्रसार, दळणवळणाच्या सोयी आणि निकट निकट होत चाललेला संबंध यांनीं जी गोष्ट घडून येत आहे ती यथाकाल व वस्तुस्थितीला अनुरूप आहे; आणि लोकल बोर्ड व मुनिसिपालिटी या दोन संस्थांतून जो यशोमार्ग आक्रमण्यांत आला आहे त्याचाच पुढील पंथ ह्मणजे प्रांतिक कौंसिल होय.

सध्यां महिना दीडमहिन्यांत सभासद निवडण्याची गर्दी उडणार होती पण एका अकल्पित कारणामुळें फेब्रुवारींत होणारी निवडणूक एप्रिलपर्यंत तहकूब ठेवावी लागत आहे. जें अकल्पित कारण ह्मटलें तें तरी मोठें राष्ट्रकार्य आहे आणि त्या कामीं आमचे आलिशान सर बेंजामिन राबर्टसन यांची योजना झाली आहे ही गोष्ट आमच्या प्रांताला बहुमानाची व भूषणाची होय. सर राबर्टसन हे दक्षिण आफ्रिकेच्या प्रश्नाचा उलगडा करण्याच्या मोहिमेवर जात आहेत आणि त्यांत ते यशस्वी होऊन इंडिया गव्हरमेंटचे व प्रजेचे कृतकृत्य धन्य राजपुरुष होतील अशी आमची मनोदेवता साक्ष देत आहे. या बिकट, नाजूक व मुत्सद्दगिरीच्या विशिष्ट कार्यांतून मुक्त होऊन ते परत येईपर्यंत आणि त्यांच्याच कल्याणकृत् अध्यक्षतेखालीं प्रांतिक कायदे कौंसिलाची पहिली सभा भरण्यांत यावी ह्मणून ती सभा जूनपर्यंत पुढें ढकलण्यांत आली आहे. ह्या समयोचित गोष्टीनें कायदे कौंसिलाच्या संस्थापनेची यशश्री यथाभाग विभागली जाईल व दक्षिण आफ्रिकेतल्या भावी कामगिरीचें पारितोषक ह्मणून जुलै महिन्यांतला महोत्सव सर राबर्टसन यांचें अभिनंदन करण्याकडे दृष्टी देऊन उभा आहे.

## ही प्रगति कीं परागति?

सारस्वत ब्राह्मणांत ज्या अनेक पोटजाती आहेत त्यांचें एकीकरण करण्याच्या स्तुत्य उद्देशानें त्यांच्यांत अलीकडे एक संयुक्त ज्ञातिपरिषद दरसाल भरविण्यांत येत असे. यंदा तिचें अधिवेशन कारवार

येथें नुकतेंच झालें. या परिषदेची आज खरोखर अवश्यकता आहे किंवा काय व तिचा परिणाम समाजास हितप्रद होईल कीं नाहीं असे प्रश्न या परिषदेच्या जन्माचे वेळीं उपस्थित होऊन तिच्यशी स्पर्धा करणारी दुसरी एक परिषद विरुद्ध पक्षानें काढली होती. पण प्रगतीला विरुद्ध जाणारी कोणतीही चळवळ थंड पडावयाचीच या नियमानें तिची लवकरच शांति झाली, व संयुक्त परिषद भरभराटली. हें सगळें पाहून कोणाही प्रगतिपर प्रवृत्तीच्या माणसास आनंदच होईल. पण यंदाच्या अधिनिवेशनासाठीं मुंबईहून कु. कृष्णाबाई ठाकूर एम. ए. या प्रतिनिधि ह्मणून निवडून आल्या असतां परिषदेंतल्या काहीं गृहस्थांनीं परिषदेच्या रचनेच्या नियमांतल्या कांहीं संदिग्ध शद्बांचा आधार पुढें करून स्त्रियांना प्रतिनिधि होतां येत नाहीं असा आक्षेप घ्यावा ही अत्यंत आश्चर्याची गोष्ट आहे. जी परिषद पोटजाती एकत्र करण्याची उच्च महत्त्वाकांक्षा धारण करते तिला आपल्या आयाबहिणींशीं संयुक्त होतां येऊं नये हें आश्चर्य नव्हे तर काय ह्मणावयाचें ? स्त्रियांच्या शिक्षणाच्या प्रश्नाचा परिषदेंत खल करावयाचा, मुलींच्या लग्नातल्या वयोमर्यादेच्या प्रश्नाची चर्चा करावयाची, आणि कु० कृष्णाबाई सारख्या उच्च शिक्षणाचा लाभ घडलेल्या स्त्रियांना प्रतिनिधि होतां येत नाहीं असेंही त्याच तोंडानें ह्मणावयाचें याला प्रगति ह्मणावयाचें कीं परागति ह्मणावयाचें तें आह्मांस कळत नाहीं. हा प्रश्न उपस्थित करणाराला आह्मी येवढेंच विचारतों कीं नियमांतल्या शद्बांच्या अर्थांत संदिग्धता असली तरी अर्थ करणारांना परिषदेच्या उद्देशाकडे लक्ष देऊन ती काढून टाकतां येत नाहीं काय? परिषदेचे नियम स्वयंभू आहेत कीं मनुष्यकृत आहेत? आणि परिषदे करिता नियम आहेत कीं नियमाकरितां परिषद आहे?

---

## धर्मविषयक कांग्रेस.

सध्याचा मनु कांग्रेसा व परिषदा यांचा आहे असें ह्मणण्यांत कांग्रेसा व परिषदा यांना कोणत्याही प्रकारें दूषण देण्याचा उद्देश नाहीं तर खरोखर वस्तुस्थितीचें निदर्शक असें तें वाक्य आहे. देशकाल परत्वें उन्नतीच्या साधनांत ही भिन्नता ठेवावी लागते, व त्या मानानें अनपेक्षित असे इष्ट परिणामही घडून येतात.

अमेरिकेंत सव जगाची धर्मपरिषद भरली नसती तर आमच्यांतल्या विवेकानंदासारख्या महत्म्याचा साऱ्या जगाशीं परिचय झाला असता काय? विलायतेंत ही परिषद झाली नसती तर आमच्यांत डा. ब्रजेंद्रनाथ सील, प्रो. वासवानी, प्रो. सरकार यांच्यासारखे विद्वान् आणि धर्मपर प्रवृत्तीचे लोक आहेत हें जगाच्या निदर्शनाला कसें आलें असतें? या धर्मपरिषदेची बैठक यंदाचे सालीं हिंदुस्थानांत करावी ह्मणून अगोदर व्यवस्था करण्यासाठीं डा. संदरलंड नांवाचे एक एकेश्वर ख्रिस्ती पंडित इकडे आले आहेत. ही परिषद हिंदुस्थानांत कलकत्ता, लाहोर व मद्रास अशा तीन ठिकाणीं भरविण्याचा विचार आहे. या परिषदेला जगांतल्या सव ठळक राष्ट्रांतून निरनिराळ्या धर्मांचे आचार्य प्रतिनिधि ह्मणून येतील. हिंदुस्थान हें पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांत धर्मांचें उत्पत्तिस्थान ह्मणून प्रसिद्ध आहे. हिंदुस्थानची भूमि ही हिंदु, जैन, बौद्ध यांची तर पुण्यभूमि आहे. इंग्लंड, अमेरिका वगैरे ख्रिस्ती राष्ट्रांची शैशवावस्था ही सुरु झाली नव्हती अशा प्राचीन काळीं या भरतभूमींत मनु, याज्ञवल्क्य, मैत्रीय, प्रवराजनक, पाराशर, व्यास, शुक, इ. महान् विद्वान् आणि थोर तत्त्वज्ञ स्त्री पुरुष धर्म व दर्शनशास्त्रें यातील गूढ प्रश्नांची चर्चा करण्यांत निमग्न असत. ती परंपरा अजूनही सर्वांशीं नष्ट झाली नाहीं, अलीकडच्या काळांतही श्रीपरमहंस रामकृष्ण, श्रीदयानंद, श्रीराजाराममोहन राय, वगैरे सारखीं विद्वद्रत्नें चमकलीं व सध्याही कांहीं चमकत आहेत. निदान धर्माच्या बाबतींत तरी हिंदुस्थानदेश इतर कोणत्याही राष्ट्राला शर्यतींत पुढें जाऊं देणार नाहीं, असें कृतीनें दाखविण्याची दुर्मिळ संधी यंदाचे सालीं हिंदुस्थानाला मिळणार आहे. ह्मणून डा. सदरलंड यांच्या प्रयत्नाचें आह्मी अभिनंदन करतों व त्यास संपूर्ण यश प्राप्त व्हावें असें इच्छितों.

---

## आधुनिक गुरु

नं. २

मागील अंकावरून पुढें चालूं

हें प्रत्यक्ष तुकारामानें सांगितलें असून कोणी तरी देवास खात्रीनें आळवून देतो वाटाड्या शिवाय घरोघर चालत आलेली उपासना व्यर्थ आहे असें घरोघर सागत हिंडणाऱ्या लोकांची समाजात जरूर पडली. पाटणकरांच्या संगीत नाटकांचा आणि या गुरुमंडळाचा अवतार एक कालींच झाला. मनाचा सहाजिकच

### अध्यात्मशिक्षणाकडे कल होतो

अध्यात्मशिक्षणास पूर्वीच्या पद्धतीनें साधन चतुष्टय संपन्न शिष्याची जरूर असे. विवेक, वैराग्य, शमदमादिषट्संपत्ति मुमुक्षुता अंगी असल्याशिवाय शिष्य उपदेशास पात्र समजला जात नसे. तुकाराम, रामदासादि महाज्ञानी गुरूचीं लक्षणें आणि शिष्याचीं लक्षणें सागन तशा कसोटीचे गुरु अगर तशा कसोटीचे शिष्य नसतील तर गुरुशिष्यसंबंध फोल आहे असें सांगितलें आहे. साधनचतुष्टय संपादन करण्याकरिता चित्तशुद्धि पाहिजे ह्मणजे वर्तन, शील, स्वभाव हीं सदाचारानें, वर्तनानें, वर्णाश्रमवर्णीत क्रिया करून प्राप्त करून घेतलीं पाहिजे. ही मोठी आडकाठी वर सांगितलेल्या आर्त, निराश अतएव उद्विग्न स्त्री पुरुषांना भासूं लागली. दोन दोन आण्याला अडीच अडीच आण्याला सभाषांतर गीताग्रंथ मिळूं लागल्यानें किंवा स्वानंदसाम्राज्य यासारखे अगर परमामृतासारखे 'तयाचे वचनीं नाहीं। करूं नको येर काहीं ॥ शिष्यास प्रत्यय दिल्यानंतर उपदेश करावा असें सांगितलें असताही निजलाभासाठीं शिष्य करण्यास हापापलेल्याच्या हातीं अशा प्रकारच्या ओव्यांचे ग्रंथ सर्वांच्या हातीं आल्यानें कर्म आणि भक्ति यांला फांटा मिळून बोलण्यात सुंदर पण करण्यास कठिण अशा वेदांताची सांथ महाराष्ट्रावर आली आहे.

ज्ञानी ओळखण्यास ज्ञानी पाहिजे. ज्याला एकदा ज्ञान झालें आहे त्यानें कसलींही अविचाराचीं कर्में केलीं तरी त्यास बंधन नाहीं. ज्ञानाग्निच तो. तो सर्व पुण्यकर्में आणि पाप कर्में भस्म खास करितो. इतकेंचें नाहीं तर ज्ञान शेवटीं आपल्या आवडत्या भक्तास (अतएव ज्ञान्यास) मोक्ष देतें.

आह्मी ज्ञानी नाहीं परंतु कांहीं ग्रंथांच्या आधारानें आमची ज्ञानाची कल्पना उपनिषदें व गीता यांचे आधारांसह दिलेली आहे ती आमच्या मतें खरी आहे पण एकंदरीत ती कल्पनाच. दुसरा ज्ञानाचें वर्णन दुसऱ्या रीतीनें करील हें साहाजिकच आहे. अननुभूत विषयाबद्दल कोणीही कल्पनाच करणार. कदाचित् ज्ञान स्थितींत कोणी गेलाच असला तरी त्या स्थितीचें वर्णन देहबुद्धीवर आल्यावर त्याला थोडेंच करितां येणार आहे. यासाठीं कलौ वेदांति वो भांति। फाल्गुने बालका इव ॥ ज्ञान वाचानिक रितीनें ह्म० नुसत्या बोलण्यानें मूर्खास पटवून देता येतें. परंतु भक्ति दाखवितां येत नाहीं. ही ज्ञानांत मोठी खुबी आहे. माणसास प्रवाहास किंबहुना प्राणिमात्रास नद्यादिकांस वरून खालीं उतरणें सोपें असतें, या साठीं आज काल स्त्रियांमार्गें आणि मुक्तामार्गें ब्रह्मविद्या पारंगत वेदांती लागलेले आढळतात. ज्ञान्यांचीं लक्षणें पुढ वारंवार येणारच आहेत. पूर्वी ऋषि, मुनि, गुरु आणि गुरुमध्यें दासबोधांत सांगितलेले विद्यागुरु मंत्र गुरु इत्यादि अनेक प्रकारचे गुरु असत. परंतु अलिकडे कानफुक्या बैराग्यापासून तों थेट मोक्ष गुरुपर्यंत सर्वांनाच सद्गुरु होण्याची तळमळ लागलेली दृष्टीस पडते. गरीब बिचारा शिष्या गुरूस सांगत असतो महाराजा तुह्मी माझे मंत्र गुरु अहां. गुरु मुकुंदरायाच्या परमामृतातील एकादी ओवी ह्मणून 'छट् बेव्य मुर्खा मी तुझा मोक्ष गुरु आहे, मी तुझासद्गुरु आहे. सत्य फक्त सर्व शक्तिमान परमेश्वरास आणि सद्गुरूसच माहित असतें. इतरांस नाहीं यासाठीं मी ह्मणतों हें तुला मानलें पाहिजे" परंतु हा विषय पुनः आणखी एकवार येणारच आहे यासाठीं येथें हा तूर्त तोडून देऊं.

अपूर्ण

---

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—ऋतुमानांत फरक होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. कडक थंडी जाऊन गुलाबी थंडी पडते. किंचित् उष्मा मधून मधून भासतो. रोगराई नसून एकंदर हवा पाणी व सूर्यप्रकाश ही मनाला उल्हास व आरोग्य देणारीं आहेत.

कापशी येथून ज्या विहिरीचें पाणी आकोल्यास आणिलें आहे त्या विहिरीची स्थिती अगदीं गर्हणीय आहे. पाणी निकारी, रोगट, व दुर्गंधी करण्याला जी साधनसामुग्री लागेल ती सर्व तेथें आपलें कार्य यथास्थित करीत आहेत. अधिकाऱ्यांनीं इकडे लक्ष्य देण्यास त्वरा करावी अशी आमची सूचना आहे.

इंडियाचें सानिटरी कानफरन्स यंदा लखनौ येथें आजपासून भरणार असून वऱ्हाड तर्फे रावबहादूर गणेश नागेश सहस्रबुद्धे वकील, इलिचपूर यांस सरकारांतून धाडण्यांत आलें आहे. शाळागृहाची स्थिती स्वच्छ व आरोग्यवर्धक व आल्हादकारक करण्याकडे योजावयाच्या उपायाची सूचना ते करणार आहेत असें कळतें.

ललितकलादर्श नाटक मंडळीनें 'राक्षसी महत्वाकांक्षा' या नाटकाच्या प्रयोगानें मंडावून सोडलें आहे. लोकांस प्रयोग इतका आवडतो हें पाहून नाटक मंडळीचें व ग्रंथकर्त्याचें करावें तितकें कौतुक थोडेंच!

आकोला अम्याटूर नाटक मंडळी आज रात्रौ 'तोतयाचें बंड' या नाटकाचा पुन्हा प्रयोग करणार आहे; आणि या खेळाचें उत्पन्न येथील स्त्रियांच्या दवाखान्याला देण्याचा संकेत आहे. नाटकगृहातील बहुतेक जागा आगाऊ टिकिटांनीं भरून गेल्या आहेत. मे० कमिशनर, डिपुटी कमिशनर इत्यादि सर्व अधिकारी मुद्दाम या खेळाला येणार आहेत. आणि त्यांच्याच प्रोत्साहनानें आमची ही उदार गुलहौशी मंडळी या सार्वजनिक कार्यासाठीं स्वतःला श्रमवून लोकांचो करमणूक करणार आहे हें त्यास भूषणावह आहे.

स्त्रियांच्या दवाखान्यानिमित्त जी कमिटी नेमण्यांत आली आहे तिची सभा आजच भरणार आहे. सरकारी आश्रयाखालीं हा दवाखाना पश्चिम वऱ्हाडला शोभेल असा टोलेजंग होईल असा रंग दिसतो.

गेल्या शनिवारीं रा. रा. स्टांडन कमिशनर साहेब व रा. रा. देवर साहेब डिपुटी कमिशनर यांच्या स्वाऱ्या आकोल्यास पारस रस्त्यानें परत आल्या आहेत. याच समयाला रा. रा. क्रास्थवेट साहेब सहकारी-मंडळ्यांचे राजिस्ट्रार हेही आले आहेत.

येथील 'सेंट्रल ब्यांके'ची सभा जिल्हाबोर्डाच्या कचेरींत भरली होती आणि एका महत्वाच्या विषयावर चागली भवति न भवति झाली. वरील तिघेही साहेब बहादूर सभेला आले होते. सहकारी मंडळाच्या मार्फतीनें जुनीं कर्जें फेडण्याचा हा प्रश्न आहे आणि याच्या उत्कृष्ट निकालावर सहकारी मंडळें एका बिकट बाबदींत पाऊल पुढें टाकतील. इस्टेटवाल्या कर्जबाजारी गृहस्थांस जुन्या कर्जांतून मुक्त करून त्यांस माफक व्याजाच्या शर्तींवर कांहीं वर्षांनंतर आपापल्या पायावर उभें राहण्यास शिकविण्यात येईल. प्रयत्न फार स्तुत्य आहे आणि या प्रथमच्या कार्याला यश येईल त्या मानानें सर्वच सहकारी मंडळें या दुसऱ्या उपक्रमाकडे आपला मोर्चा फिरवितील.

गेल्याच्या मागील शनिवारीं व रविवारीं येथें एक शिक्षक समाजाची सभा भरली होती त्या वेळीं शास्त्रीय विषय सुलभ करून देण्याच्या पद्धतीवर डाक्टर पाध्ये यानीं अन्नपचनाच्या क्रिये संबंधानें व्याख्यान दिलें आणि रा. रा. श्रीधर अनंत भागवत यांनीं वनस्पती शास्त्राची बरीच उपयुक्त माहिती सांगितली. अशा सभा वारंवार होतील तर शास्त्रीय विषयांतील विद्वान मंडळीस आपल्या जुने अभ्यासाची उजळणी करण्यास सांपडून लोकशिक्षणासही बरीच मदत होईल.

रा. रा. स्टांडन साहेब कमिशनर हे उद्यां येथून निघून कान्हेरी, पुनोती, साकरडोह, मनोरा इत्यादि भागानें यवतमाळकडे जाणार आहेत.

नागपूरच्या वेड्याच्या आश्रना संबंधानें नवीन नियम करण्यांत आले असून त्यांत सुपरिनटेंडंट, डिपुटी सुपरिनटेंडंट, सब असिस्टंट सर्जन, कंपौंडर, हेडक्लार्क, सेकंड क्लार्क, वगैरेंच्या कामगिरींचें टिप्पण कसें असावें या संबंधानें खुलासा आहे. वेडा ह्मणजे सरकारी पाहुणा. याच नात्यानें त्याचें संगोपन करून त्याच्या औषधोपचाराचा इतिहास निरनिराळा ठेवण्यात येईल ह्मणजे त्या योगानें कोणत्या वेडाला कोणतें औषध लागूं पडते याचाही कदाचित् शोध लागेल.

हत्याराच्या कायद्या अन्वयें मध्य प्रांतातील ज्या थोर थोर जमेदार व राजमान्य मुनसिपल सभासदास हत्यारें वापरण्यास परवाना लागत नाहीं त्यांची नामावळी छापली आहे त्याप्रमाणें वऱ्हाडांतील अशा सन्मान्य गृहस्थांची यादी प्रसिद्ध होईल तर तितकेंच बरें होईल.

रा. रा. रघुवीरसिंग दुनियासिंग एक्स्ट्रा असि. कमिशनर व माजिस्ट्रेट वर्ग १ यवतमाळ यास फाशीच्या शिक्षेचे गुन्हे खेरीज करून बाकीच्या सर्व गुन्ह्याची चौकशी करण्याचे असिस्टंट सेशन जज्जाचे अधिकार देण्यांत आले आहेत.

तसेंच खान बहादूर सोराबजी शापूरजी माजिस्ट्रेट एक्स्ट्रा असि. कमिशनर व सब डिव्हीजनल वर्ग १ आकोला यासही फांशीच्या शिक्षे खेरीज इतर शिक्षेचे गुन्ह्याची चौकशी करण्याचे असि. सेशन जज्जाचे अधिकार देण्यांत आले आहेत. हे अधिकार खान बहादुरास पूर्वींच मिळावयाचे होते पण तशा अधिकारसंपन्न माजिस्ट्रेटाची गरज या जिल्ह्यास विशेष असल्या मुळें हा हुकूम आता प्रसिद्ध झाला आहे हें यथायोग्य आहे. अलिकडे सेशन खटले कमी करण्यासाठीं हे अधिकार देण्याचा प्रघात पडत चालला आहे पण त्यामुळें सेशन कोर्टाचें काम हलकें होईल हें खरें पण आरोपीला जो असेसरांच्या मताचा लाभ मिळत असतो तो यापुढें मिळणार नाहीं.

नोंदणीच्या कायद्याअन्वयें दारव्हा तालुक्यातील खेडी, लिंगड, नांदगव्हाण व रहाटी हीं गावें आजपर्यंत या जिल्ह्यातील मानोरा संबरजिस्ट्रारच्या हद्दींत होतीं तीं यापुढें डिग्रस सब-डिस्ट्रीक्टच्या हद्दींत गणलीं जातील.

**पोलीस मेडल**—रा. रा. बी. डब्ल्यू. ड्युरी असि. सुपरिनटेंडंट, वाशिम व सदाशिव नारायण सब इनस्पेक्टर, आकोला या उभयतांनीं १२ एप्रिल १९१३ रोजीं देवजी कोळी या डाकेखोरास कळम्बेगावीं मोठ्या शिताफीनें कैद केलें. तो निजला होता पण त्याच्या जवळ १ कुऱ्हाड व १ सुरा असून तो मोठा धीप्पाड होता. एका महाराच्या वर्दीनें हा धाडसाचा प्रसंग घडवून आणिला. याला पकडण्यासाठीं ५०० रुपयाचें बक्षीस लागलेलें होतें.

तसेंच शीरपुती गांवीं २६।२।१९१३ रोजीं आग लागून एक शामजी नांवाचा इसम जळक्या घरांत झोंपीं गेला होता त्याला काढण्यासाठीं रा. रा. महमद याकूब कानस्टेबल, अनसिंगी स्टेशन यांनें जीवाकडे पाहिलें नाहीं आणि आगींत उडी घालून एक प्राण वाचविला ही त्याची खरी बहादरी होय. येणें प्रमाणें वरील तिघाजणांस यंदा हें पोलीस मेडल बक्षीस देण्यात आलें आहे.

रा. रा. बळवंत यादव खोल्कुटे बी. ए. एक्स्ट्रा असि. कमिशनर यवतमाळ यांस सब-डिव्हीजनल आफिसरचे अधिकार देण्यात आले आहेत.

को-आपरेटीव सोसायटीच्या कायद्या खालीं नवीन नियम करण्याचा स्थानिक सरकारचा विचार आहे तेव्हा त्या नियमाचा कच्चा खर्डा १० जानेवारीच्या सी. पी. ग्याझेटात प्रसिद्ध झाला आहे तिकडे त्या त्या प्रकरणाचा विचार करणाऱ्या गृहस्थानीं अवश्य लक्ष्य पुरवून आपापल्या सूचना स्थानिक सरकाराकडे रवाना करण्याला आळस करूं नये.

तीळ — एकंदर ब्रिटिश इंडियांतील तीळाच्या पेऱ्यापैकीं सरासरी एक पष्ठांश पेरा मध्यप्रात व वऱ्हाड मिळून आहे. मध्यप्रांतांत या पेऱ्याचें क्षेत्रफळ ७,८६,४८९ एकर असून वऱ्हाडात ८०,०७९ एकर आहे. एकंदर उत्पन्न ७० हजार टन तीळापर्यंत येईल असा सुमार आहे.

पाढरकवडा येथून दक्षिण आफ्रिका फंडाला ४०० रुपये वर वर्गणी जात आहे ही वऱ्हाडच्या इतर शहरास लाजवीत आहे. राजश्री माधवराव आळे वकील यानीं या गांवीं ही राष्ट्रीय जागृती उत्पन्न केली हें वर्णनीय होय.

अक्कलकोटचे एकजण इंदुप्रकाशास लिहितात कीं अमच्या मुर्तिजापूरचे प्रसिद्ध गृहस्थ रा. रा. नारायण वामन जमादार यांनीं अक्कलकोटास श्री ब्रह्मानंदस्वामीच्या मठापुढें शोभिवंत व दुमजला सभामंडप आपल्या खर्चानें उभारलेली आहे आणि त्यानीं पाकशाळा, महाद्वार व नगारखाना यासाठीं आतां पूर्वींच्या २० हजार रुपयाला जोडून ४ हजार रुपये आणखी दिले आहेत. त्यांचे चिरंजीव विठ्ठलराव हे श्रीच्या कृपेचें फळ समजून त्यांनीं हा दानशूरपणा केला आहे. दानशूर लोक आहेत, संपत्त विपूल आहे पण त्यांस लोकोपयोगी चालन देण्याला तशाच विलक्षण हृदयस्फूर्ती पेरणाऱ्या सत्मूर्ती पाहिजे आहेत.

---

रा. रा. एफ. एस. बुलक माजी कमिशनर वऱ्हाड यांस विलायतेस खिस्ताज्ञा झाल्याचें वर्तमान नुकतेंच आलें आहे. हे मेट्रापोलिटन पोलिस खात्याचे हेड कान्स्टेबल तिकडे होते आणि त्याच हुद्यावर असतांना वयाच्या ७० व्या वर्षी त्यांस मृत्यु आला हें यथाकाल होय. याचे वडील वऱ्हाडात अव्वल इंग्रजीच्या वेळीं मोठे सुप्रसिद्ध अधिकारी होते आणि त्यांच्याच जुन्या संबंधामुळें त्यांच्या चिरंजीवाची बढती वऱ्हाडात जुडिशिअल कमिशनरच्या जागीं व पुढें कमिशनरच्या जागीं करण्यांत आली होती. हे सिव्हिल सरव्हंट असून २२ वर्षे चाकरी संयुक्त प्रांतात झाली होती. वऱ्हाडाला त्यांचा परिचय ७ वर्षे घडला आणि येथून पेनशनीवर गेल्यानंतर आज १३ वर्षे ते नामशेषच होते आणि आतां आह्मी त्यांचा निधनलेख लिहीत आहो. पेनशन ह्मणजे संबंध तुटणारा मुहूर्त असा प्रकार असतो आणि त्यांचें प्रेमही कसें लयास जातें याचा मोठा आचंबा वाटतो. अधिकारमग्न मंडळींनीं लोककार्यमग्न होण्यास शिकावें असा बोध वरील उल्लेख शिकवील तर मोठा लाभ होईल.

---


अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

# ओटो मोहिनी.

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करून दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करून अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. १ औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—आरिएंटल ड्रग आणि केमिकल कंपनी सोल प्रोप्रायटर्स जुमा मसजिद मुंबई

नो. नं. १६


## नोटीस

नोटीस बेशमी १ झसाजी वा॥ राघोजी व २ सोनाजी वा॥ परसाजी व ३ नारायण वा॥ तुकाराम व ४ अयाजी वा॥ गंगाराम शेळकी रां० मौजे नायगांव प्र. व ता. मेहकर जि. बुलडाणें यासी:—

नोटीस दे. भिमाई मर्द जानजी शेळकी रा. माजे नायगांव प्र० व ता. मेहकर जि. बुलडाणे नोटीस देते कीं मी तुह्मास २॥-३ वर्षे झालीं कुलमुखत्यार पत्र दिलें असोन ते तुमचे पासी आहे. तुह्मी माझी जोंनगी अफरातफर करून नुकसान केलो आहे व मजवर जबरदस्ती करून माझी जमीन वहीत करीत आहा. व माझे देण्या घेण्याचा हिशोब देत नाहीं करिता या नोटीसीनें कळविण्यात येते कीं तुह्मां चौवाचे मुखत्यारपत्र मी रद्द केलें आहे तुह्मी माझे तर्फे व माझें करितां कोणतेंही काम करूं नये. केल्यास ते मजला कबूल नसोन मी त्याजबद्दल कोणत्याही रीतीनें जबाबदार होणार नाहीं. माझी जमीन माझे ताब्यांत देऊन देण्या घेण्याचा सर्व हिशेब ही नोटीस पावल्यापासून आठदिवसाचे आंत द्यावा. व माझी पावती घ्यावी तसें न केल्यास रीती प्रमाणें कायदेशीर तजवीज मजला करावी लागेल व तो खर्च तुह्मास द्यावा लागेल मग तुमची तक्रार चालणार नाहीं करितां आगाऊ नोटीसीनें कळविलें आहे कळावे ता॥ ७-१-१४

सही

भीमाई मर्द जानजी इची नि.

नो. नं. १७

## नोटीस

रामचंद्र केशव सोनार राहणार हैसपूर तालुके व जिल्हा आकोला यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं तुह्मी माझा बाप नामे तुकाराम नारायण व भाऊ सिताराम व बाळाजी तुकाराम सोनार राहणार हैसपूर यांचे जवळून तारीख ४।१।१४ इसवी रोजीं मौजे हैसपूर येथील जी जागा खरेदी घेतली ती हल्लीं माझ्या ताब्यांत आहे ती मी खरेदी देत नसतां तुह्मी माझा भाऊ नामे सिताराम तुकाराम यास तुह्मी आपले पुढ्यांत घेऊन मजला मारहाण करून जबरदस्तीनें माझें जवळून त्या खरेदीखतावर माझी सही करून घेतली. ती सही मजला मुळीच कबूल नाहीं व तें खरेदीखतही मला कबूल नसून त्याचा भरणाही मला पावला नाहीं सबब ती सही व तें खरेदीखत यावरून तुह्मी मजवर दिवाणी अगर फौजदारी कोर्टांत त्याबद्दल दावा वगैरे केल्यास त्याबद्दल किंवा त्या दाव्यासंबंधी खर्चाबद्दल मी जबाबदार राहणार नाहीं ही नोटीस लिहून दिली. सही तारीख १०।१।१४ इसवी दस्तुर नरसिंगराव मुनशी आकोले.

सही

गंगाराम तुकाराम सोनार राहणार हैसपूर मुकाम आकोला दस्तुरखुद.

नो. नं. १८

## जाहीर नोटीस

मौजे खीरपुरी खुर्द ता॥ बाळापूर येथील सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं:-

मौजे खीरपुरी खुर्द ता॥ बाळापूर येथील मढी समोरील पडीत जागा लांबी पू० प० हात ३९ फुट ३ इंच रुंदी द० उ० फुट ३९ याची चतु:सीमा पु० सुखदेव जैराम याचें राहातें घर प० गावातील सार्वजनीक खुले मैदान उ० प्रतिवादांचे कवेलू द० रस्ता येणें प्रो चतु:सिमेतील जागा सार्वजनीक आहे असा ठराव करून ती जागा प्रतिवादीचे ताब्यांतून वादीचे ताब्यांत देण्यांत यावी असे बद्दल दि० मु० नं० २९०/१३ चा दावा आमचे कोर्टांत

१ नथु भगवान कुणबी
२ सीताराम मोराजी कुणबी
३ देवराव जैराम कुणबी
४ फत्तु वा॥ जगदेव कुणबी
५ आत्माराम उदेभान कुणबी

सर्वत्र रा० खीरपुरी खुर्द या पांच जणांनीं सदरहु गावांतील लोकातर्फे पंच ह्मणून प्रतिवादी जैराम बगाजी मुरुमकार रा० खीरपुरी खुर्द यांचे विरुद्ध आणिला आहे व त्याचे चौकशीची तारिख ६।२।१४ नेमिली आहे. तरी सदरहु दाव्यांत वादी ह्मणून शरीक होऊन काम चालविण्याची सदरहु गावांतील रहिवाशापैकीं आणखी कोणास इच्छा असल्यास त्यांनीं वरील तारखेचे आंत आमचे कोर्टांत अर्ज द्यावा कळावें ता॥ ८।१।१४

J. C. Salomen
Muusiff No 3
Akola

No. N. 19

**तांबूल नवरत्न** — न कत्थेकी परवा न चुनेसे काम, हमारे मसालेका सबके सलाम. पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे.

**नवरत्न टेबलेट** — उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे.

**नवरत्न तमाखु** — पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळ्यास दीड आणा.

**मद्रासी नस** — अति उत्तम सुवासिक नस. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे

**गजकर्णाचें मलम** — गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे.

**केश काढण्याचें तेल** — केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे.

**चन्द्रकांत बाम** — मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे.

बनविणार टी. एस. मित्र. जळगांव.

आकोल्याचे सोल एजंट- चमन कंपनी.

पत्ता— ताजनापेठ बाजार- आकोला.

नो. नं. ११



## त्रिकालदर्शी आरसा?

तुह्मास भूत, भविष्य वर्तमान जाणण्याचे असल्यास ही जाहीर खबर वांचून त्वरित ऑर्डर धाडा. ह्या आरशाखेरीज त्रिकाळ ज्ञान प्राप्त करण्याचें साधन जगांत दुसरें एकही नाहीं. तत्संबंधानें शेकडा सरटीफिकीटें मिळालीं आहेत. श्रद्धाळू मुलें, स्त्रीया आणि पुरुष स्वतःचे विचार आणि त्यांचे परिणाम पाहूं शकतात. गांव परगांव दूर देशांतर आणि दूरच्या मित्र व सोयऱ्याच्या चेहरा तुह्मांस सहज मिळूं शकतील. अमूक काम होईल किंवा कसें? अमूक बाबतींत काय परिणाम होतील, व्यापारांत नफा किंवा तोटा, अमुक पदार्थांच्यीं किंमतीची कमीजास्ती, परीक्षेचे परिणाम, चाकरी वगैरे कांहीं तुमच्या मनाचा खुलासा करावयाचा असेल तो सर्व होऊ शकेल किंमत:—

साध्या कांचेचा रु २-९ (प्रत्येक पोस्टेज सहित)
बिल्लोर कांचेचा मजबूत रु. ३-९
मुद्दाम मोठे बिल्लोर कांचेचा मजबूत रु. ६

हिंदुस्थाना बाहेरच्या ग्राहकानें २ रु. जास्त धाडावे.

आशाभाई, बावभीभाई पटेल मु०
करमसद, ता० आनंद जिल्हा खेडा.

नो. नं. १३



# Oriental Government Security Life Assurance Company, Limited,

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

R. PATERSON BROWN, MANAGER.

## FUNDS EXCEED 4½ CRORES.

Claims paid for over 3½ Crores.

## *ALL PERSONS*

WHO ASSURE FOR THE FIRST TIME
OR
WHO INCREASE THEIR PRESENT ASSURANCE
WITH

## *THE ORIENTAL*

BY EFFECTING A WITH PROFIT POLICY
ON OR BEFORE 31 ST DECEMBER 1913 WILL BE ENTITLED TO

# THREE YEARS BONUS

PROVIDED
THREE YEARS PREMIUMS HAVE BEEN PAID
AND
THE POLICY IS IN FORCE ON 31 ST DECEMBER 1915.

Prospectus, forms, and further information can be obtained on application to—
CHIEF AGENCY FOR C. P. BERARS AND KHANDESH,—
NAGPUR.

M. DESOUZA
CHIEF AGENT
*Nagpur.*

No N. 12



## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

## राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

## राजवंशी सांध्याचें तेल,

किंमत रुपये १ ट्रेड मार्क "सँडो"

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे अॅनेलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकेटें दिलीं आहेत.

ठिकाणा — डॉ० डी० एच० भट, यांचा दवाखाना.
३८ जावळी मोहल्ला मुंबई.

नो० नं० १४



सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

## आयोडाईज्ड सार्सापरिला.



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धिवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याचा सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ गौतमराव केशव
नो० नं० १५ ५६३ ठाकूरद्वार मुंबई.


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd. NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४८] आकोला-- सोमवार तारीख २६ माहे जानेवारी सन १९१४ इ० अंक ४


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.



## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पाच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला २१।९।०९ { G. A. Phillips. एजंट
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६३/१ तोळे असतें.

साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत व जारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० { G. A. PHILLIPS. एजंट
नो० नं० ३



## अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेग्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चैाकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु १ व्हीपीनें रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेसिटी
नो० नं० ३



## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानातील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १०८

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसां नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.
नो० नं० ४



## ‘ विकावयाचा आहे. ’

वाशीम यथील, पूर्वीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टाजवळ असलेला कै॥ राव बहादूर पुरुषोत्तमराव नारायणभट यांचा बंगला विकावयाचा आहे.

खंडवा ते इंगोळी व्हाया वाशीम लोकरच रलवे लाईन ओपन होणार असल्यानें गरजूनीं किंमती वगैरे विषयीं समक्ष किंवा पत्रद्वारें खालील पत्यावर खुलासा मागवावा.

ना० खं० फडके
वऱ्हाड समाचार ऑफीस आकोला
नो० नं० ५ वऱ्हाड



## रामबाण उपाय.

**रक्त पिती व कोड**

दहाहजार पुड्या फुकट. आह्मीं आमच्या औषधाची खात्री पटावी ह्मणून १०००० नमुन्याच्या पुड्या करण्याचें योजिलें आहे या पुड्या वरील महारोग दुरस्त होण्यासारख्या आहेत. हे त्या निःसंषय सिद्ध करितील. या पुड्या वापरून अनुभव पहावा ह्मणजे खात्री होईल. नमुन्याच्या पुडीची किंमत फक्त ०= ठेविली आहे. ही किंमत फक्त टपाल हशील वगैरे खर्चापुरतीच आहे.

२ आह्मीं रक्तपिती; कोड, हे कसे उद्भवतात त्याची शुश्रुषा कशी करावी? वगैरे माहितीचे इंग्रजी व बंगाली भाषेंत पुस्तक तयार केलें आहे तेंही पण गरजूनीं अवश्य वाचण्या लायक आहे. ह्मणजे त्या पापासून त्वचे संबंधी रोगांची पूर्ण माहिती होईल किंमत फक्त ट. हा. सह ||= सर्व पत्र व्यवहार इंग्रजींत करावा.

पण्डित कृपाराम
८ नंदीबागानलेन पो. सालकिया जि.
नं. ६ हावरा.



## “भानगड नको.”

१ खरुज, गजकर्ण, खवडा, फोड, खाज, आगपैण, दाद, अजुत, भद, नख धावने, सुकी खाज, आग व पाणी सुटणे व साधारण कोणत्याही त्वचा विकारांवर १ च मलम १-२ वेळ लावल्यानें गुण देऊन ३ दिवसात कायमचा फायदा होतो. किं ४ आणे.

२ कापूर, शोप, पुदीना, पेपरमिंट, ओवा, हिंग, दालचिनी, दोडे, यांचे अस्सल अर्क उपयोग सोबत असतो किं ४ आणे.

३ केंस जाण्याची बरींच औषधें निघालीं त्यांत बरेंच विकार ग्राहकांचे नजरेस येतात पण आमचें औषधानें जागा काळी न पडता व इजा नहोतां फारच लवकर केंस जाऊन, लवकर येत नाहींत कि. फक्त २ आणे.

पत्ता—व्हि. आर. मुळे. नांदुरा.
जी. आय. पी.
नो. नं. ७



## चांदीचीं भांडीं.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक. व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**
नो. नं. ८


## नोटीस

नोटीस बेशमी संदलबी मर्द नूरमहंमद चौधरी रा. ठि. ताजनापेठ मोमीनपुरा आकोला यासीः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तूं माझी साक्षांत सून असून मी येथं नसता तूं आठ दहा माणसें आणून घरांतील सर्व सामान व डागडागीनें व नगदी रोख रु. ४०० व दोन हैसी असे सर्व सामान तीन गाडी भरून नेलें. हें त्वा चागलें केलें नाहीं, शिवाय तूं सय्यद गफूर यांचे घरात रहात होती, त्यालाहि कुलूप लाविलेस. तरी खरोखरीच पाहिले असता महंमदी लॉ प्रमाणें तुह्मा दोन अण्याचा हक्क आहे, व बाकीचा सर्व तुझ्या नवऱ्याच्या बहिणीचा व माझा आहे, आह्मास असें समजले आहे कीं, तूं त्या सर्व चीजगीची अफरातफर करण्याच्या विचारांत आहेस, तरी ह्या नोटीसीनें कळवितो कीं, तूं आठ दिवसाचें आंत आमची सर्व चीजवस्तु आमचे ताब्यांत यावी तसें न केल्यास कायद्या प्रमाणें तजवीज केली जाईल. वर लिहिलेल्या मुदतींत तुह्मी सर्व चीजवस्तु परत न कराल तर तुह्मी दुसऱ्या कबाड लोकांच्या मदतीनें ही बेविश्वासानें चोरी केली आहे. त्याबद्दल तुह्मावर व तुमच्या सल्लागारावर फौजदारींत फिर्याद दाखल करणें नाइलाजास्तव भाग पडेल. पण तुमच्या वाईट व गैरकायदा वर्तनानें एकवेळ तशी फिर्याद केल्यावर मग माझ्या हातीं कांहीं राहणार नाहीं इतकेंच नाहीं तर ही घराण्याला लाजविणारी गोष्ट तुमच्या अपकृत्यामुळें घडणार आहे. या उपर तुमच्या मर्जीला येईल त्या प्रमाणें तुह्मी काय ती गोष्ट पक्की करावी. आणि वरील अखेरच्या दर्ज्याला सर्व प्रकार येऊं नये ह्मणून देवापाशीं प्रार्थना आहे. कळावें ता० १६-१-१९१४ईसवी.

सही[उर्दूत]
शेखलाल वा॥ हाफिजचांद ताजनापेठ आकोला.

नो. नं. ९

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येत आहे कीः—

आमचे दुकानीं आह्मी रामाकिसन रामप्रताप राठी. रा. चांदाक्षण हल्लीं रा. अंजनी खुर्द ता॥ मेहकर यांस कुलमुखत्यार नेमले होते परंतु त्यांच्या हातून दुकानचा हिशोब कागदपत्र वगैरे यांचा बंदोबस्त न ठेवल्या कारणानें फार नुकसान झालें सबब आह्मी त्यांचें कुलमुखत्यारपत्र रद्द केलें आहे. आतां आमच्या दुकानच्या नांवानें सदरहु रामाकिसन यांशी कोणी देवघेव करूं नये. केल्यास ती व्यर्थ आहे. ही नोटीस दिली सही तारीख १६-१-१९१४

सही

मंगनीराम सदाराम दुकान मौजे अंजनीखुर्द ता० खु०

नो० नं० २३

---

## पत्र व्यवहार

### गणपती

मागील अंकावरून पुढें चालूं

एकवेळ जगन्माता पार्वतीनें श्रीशंकरास प्रश्न केला कीं तुह्मी ज्याचें ध्यान करता त्याचें ध्यान मला सांगा. अशा प्रमाणें पार्वतीनें अत्यंत नम्रपूर्वक प्रश्न विचारल्यानंतर शंकर सांगतात. तुझें प्रिय करण्याचे इच्छेनें व लोकावर उपकार करण्याचे इच्छेनें मी त्याचें स्वरूप तुला सांगतों. “यो देवः सर्वभूतेषु गूढश्चराति विश्वकृत् । यो ऽनंतशीर्षानन्तश्रीरनंत चरणः स्वराट् ॥ अनन्त श्रुतिनेत्रश्चानंत नामा गुणातिगः । अनतरूपा या देवो वेद कर्ताऽखिलार्थदः ॥ इत्यादि तऱ्हेचे त्या श्री विनायकाचें स्वरूपवर्णन शंकरानीं उमेस केलें आहे. त्याचे सगुण स्वरूपास ‘गुणेश’ असें नांव आहे. पार्वतीनें विनंति केली कीं आपण सांगितलेलें विनायकाचें स्वरूप, ध्यान अथवा ज्ञानही अगम्य आहेत. मला त्या श्रीगजाननाचा प्रत्यक्ष स्थूलावर साक्षात्कार होईल असा उपाय सांगा. तेव्हा शंकरानीं तशी प्राप्ति होण्यास काय केले पाहिजे हें सांगितलें. तपःसामर्थ्यानें अमूर्त वस्तू मूर्त स्वरूपास येते. सर्व जगाची उत्पत्ति ब्रह्मदेवान तपानेंच केली. शंकर ह्मणतात हे देवी, एक निष्ठ तया यावत्तपसाराधितेनते । तावत्प्रत्यक्षतां देवी कथं यास्याति सप्रभुः ॥ एकनिष्ट तपावाचून त्या प्रभूची प्राप्ति होणार नाहीं पार्वती तसें तप करण्यास तयार होती. तिनें श्री शंकरास तप कसें करावे ह्मणून विचारलें व त्या योगेश्वर महादेवानीं तिला तो सर्व प्रकार सांगितला. बायकहो, आपण पातिपत्नीचा संबंध विषयबुद्धीनें जसा पाहतो तसा नसून तो खरोखर गुरुशिष्यसंबंध आहे. अमूर्त असा विनायक मूर्त गजानन स्वरूप घेण्यास अंबेनें गोड गोड मोदक खाण्याकरितां, अथवा आपले मनाचे विषय चोचले तृप्त करण्याकरितां केलेलें व्रत नसून तिनें देवाची बारा वर्षे तपश्चर्या केली. तिनें ही तपश्चर्या लेखन नांवाच्या पर्वतावर केली असें गणेश पुराणांत लिहिलें आहे. अंबेची तपश्चर्या पुरी झाली तेव्हा तिला श्री विनायकानीं ज्या स्वरूपानें दर्शन दिलें त्या बद्दल लिहिलें आहे “किरीट कुण्डल धरो दशबाहू त्रिशूलभृत । भालचंद्रः शंखचक्र मुक्तामाला विभूषितः ॥ अक्ष मालांच कमलं कस्तुरी तिलकं दधत् । मध्ये नागयज्ञ मुखो दक्षिणेच शिवाननः ॥ वामे ब्रह्म मुखः शेषे पद्मासन गतोविभुः ॥ तत्फणा मंडलः छा : कुंद कर्पूर संनिभः ॥ ज्यानें मस्तकीं कोटिसूर्यसदृश किरिट घातला आहे, श्रवणांत ज्याचे कुंडलें आहेत, ज्याला दहा बाहू आहेत, ज्याचे हातांत त्रिशूल असून मस्तकावर चंद्रमा आहे. तसेच शंखचक्र व मौक्तिकांचे माळांनीं भूषित होता त्याचे तें त्रिमूर्तिरूप पाहून गौरीनें एकाग्र भवानें त्यास नमस्कार केला. गौरीनें तूं माझा पुत्र हो ह्मणजे तुझें निरंतर दर्शन होईल असा वर मागितला. नंतर पुढें हें सर्व वर्तमान श्रीशंकरास कळविल्यानंतर भाद्रपद शुद्ध ४ थीस गौरीनें विनायकाची पार्थीव मूर्ती करून तिची षोडशोपचारें पुजा करून आनंदोत्सव केला. तेव्हा ती पार्थीव मूर्ति सचेतन झाली. त्या अत्यंत मनोहर व प्रकाशित मूर्तीस पाहून गौरी मूर्छित झाली. तेव्हां गजाननानें थोडें सौम्य रूप धारण केलें. गौरीनें डोळे उघडून पाहिले तों [तिच्यापुढें—सहस्रशिर्षपुरुषः सहस्राक्ष सहस्र पाद । अशा तऱ्हेचें विश्वरूप प्रकट झालें. हें अद्भुत रूप पाहून ती फिरून गोंधळून गेली. परंतु श्रीशंकराचे उपदेशाची तिला आठवण होऊन ती त्या विराट स्वरूपाकडे कौतुकानें पाहूं लागली, व नंतर तिनें त्या ब्रह्मांड नायकाची प्रार्थना केली कीं ‘हे देव तूं प्राकृत रूप धारण कर’ प्रार्थना करताच देवानें बालरूप धारण केलें. ही बातमी शंकरास कळताच तेही त्या बालकाचें दर्शन घेण्याकरितां आले. त्यांनीं त्या बालास पाहिले तेव्हां त्यास कसें दिसले याबद्दल गणेश पुराणांत लिहिलें आहे “नायं बालोऽनादि सिद्धो जरा जन्म विवर्जितः । लीला विग्रहवानेप स्वप्रकाशो गुणातिगः । शुद्धं सत्वमयः सर्व जीवेशो भुवनेश्वर । मुनिध्येयो खिलाधारो ब्रह्मभूतोखिलप्रदः ॥ असो, अशा तऱ्हेनें श्री सिद्धि विनायक हे भाद्रपद शु॥ ४ सोमवार स्वाति नक्षत्रावर पांच शुभग्रहानीं युक्त सिंह लग्नावर साधूचें संरक्षण व दुष्कृतांचा नाश करण्याकारितां अवतीर्ण झाले. पुढें दहा दिवस आनंदोत्सव करून अकराव्या दिवशीं त्यास ‘गुणेश’ असें नांव ठेविलें. तोच हा आपला विघ्नहर्ता सर्व मंगलकारी गुणेश, अथवा गणेश होय यावेळेपासून श्री गजाननाचा जन्मोत्साह करण्याचा संप्रदाय पडला. श्री गजाननानीं श्री कृष्णलीलाप्रमाणें अनेक लीला करून अनेक दैत्यांचा वध केला आहे.

अपूर्ण

---

वऱ्हाडसमाचार

पौष वद्य ३० शके १८३५ प्रमादी

### भाषाधर्म

मनांतले भाव व्यक्त करणारी ती भाषा. मनुष्य समाजप्रिय प्राणी असल्यामुळें त्याच्यानें आपल्या मनांतले भाव दुसऱ्यापाशीं व्यक्त केल्याशिवाय राहवत नाहीं. त्याच्या आवडीनिवडी, त्याची प्रकृति, देशस्थिति इ० गोष्टीचा रंग प्रथम त्याच्या मनावर आणि नंतर त्याच्या भाषेवर चढत असतो. मनुष्यजातीचे ठळक पाच वर्ग करतात. या प्रत्येक वर्गांतल्या प्रत्येक व्यक्तीची भाषा त्याच्या त्याच्या मनोभावानुरूप निराळी असते. युरोपियन पंडित ह्मणतात कीं आदम आणि हवा यांना सृष्टिवैचित्र्य पाहून विस्मय वाटला, आणि तो मनोभाव प्रबळ असतां आपणाहून अधिक शक्तिसंपन्न, कठोर व दुर्निवार अशा विभूतींची उपासना तीं मनांत करूं लागलीं. हाच धर्माचा आणि धर्माबरोबर भाषेचाही उगम होता. अशा रीतीनें प्रत्येक मनोभावाची विचक्षणा केली असतां असें दिसून येईल कीं ज्या देशांत जशी परिस्थिति, हवामान, राहणी, वगैरे असेल तद्नुरूपच तेथील लोकांची भाषा असते. भाषेच्या प्रत्येक शब्दांत धर्म अधर्म, पापपुण्य वगैरेच्या कल्पना लुप्त असतात. युरोपचा ख्रिस्ती धर्म व युरोपियन भाषा यांची ताटातूट कोणालाही करतां येणें शक्य नाहीं. त्याच प्रमाणें आमच्या प्राच्य भाषा व प्राच्यधर्म यांचीही ताटातूट कोणाला करतां येणार नाहीं. आमच्या संस्कृत भाषेशीं वेद, उपनिषदें, पुराणें इतकीं संबद्ध आहेत कीं एकमेकांना आधाराधेय झालेलीं आहेत. हें जसें धर्माविषयीं सांगितलें तसेंच देशाच्या राष्ट्रीय उत्कर्षापकर्षाविषयीं ही विधान केलें असतां तें फारसें चुकणार नाहीं. साहित्य ह्मणजे तरी काय? संहतीचें (समाजाचें) चित्तविनोदन ज्यानें करतां येतें तें साहित्य. समाजांतल्या अगदीं खालच्या पायरीपासून अगदीं वरच्या पायरीपर्यंत सर्व व्यक्तींचे मनावर ज्याचा प्रभाव ठसतो ती शक्ति केवढी जबरदस्त ह्मटली पाहिजे! या शक्तीनेंच समाजांत सजीवता येते. सर्वांना भारत रामायणांतल्या श्लोकाचें पूर्ण रहस्य कळो वा न कळो पण त्यांतल्या स्त्रीपुरुषांच्या चरित्रांचा आमच्या हिंदु समाजांतल्या स्त्रीपुरुषांच्या चरित्रावर आज हजारों वर्षे फार खोल परिणाम घडत आला आहे ही गोष्ट कोण नाकबूल करील? तशीच गोष्ट शेक्सपिअर, वर्डस्वर्थ, फर्दुसी, होमर वगैरे कवींची आहे. कवीच्या मृत्यूनंतर शेंकडों वर्षेपर्यंत मागें त्याच्या विचाराची छाप समाजावर टिकली नाहीं तर तो कवि कसचा? अलीकडे सुशिक्षित मंडळी इंग्रजी ग्रंथकाराचे उसने विचार घेऊन ते आपल्या मराठी वाङ्मयांत आणण्याचा अट्टहास करीत असलेले दृष्टीस पडतात. त्यांच्या श्रमाचें काहींच सार्थक होत नाहीं. त्याच्या योगानें लोकांच्या विचारांना पुष्टि येत नाहीं, आणि भाषेला ही येत नाहीं. पूर्वींचे कवि ह्मणजे तुकाराम, रामदास, नामदेव, मुक्तेश्वर, मोरोपंत वगैरे यांचे विचार समाजांतल्या अशिक्षित वर्गाच्याही रोमरोमांत कसे प्रविष्ट झाले-आणि ’ तेंही मुद्रण कला, किंवा व्याख्यानमाला नसतां आणि आतां सर्व साधनांची अनुकूलता असून तसें जिवंत साहित्य का निर्माण होऊं नये याचें इंगित यांतच आहे. हल्लींचें साहित्य हें केवळ समाजाच्या पृष्ठ भागाचें साहित्य आहे. त्याची मुळें आंत खोल गेलेलीं नाहींत. हल्लींचें साहित्य ह्मणजे धड नाहीं इंग्रज, आणि धड नाहीं अस्सल हिंदी असें अर्धवट आहे. हल्लींचें साहित्य हें विरोधालंकाराचें मूर्तिमंत उदाहरण आहे असें जें एका मोठ्या पंडितानें ह्मटलें आहे तें अगदीं खरें आहे. हल्लींच्या साहित्यसेवकाचे विचार आंग्लो-इंडियन ह्मणजे हिंदी व इंग्लिश याच्या मेसळीचे असतात. इंग्रजी साहित्यात जें आहे तें आपल्या देशी भाषात उतरलें पाहिजे अशी विलक्षण अनुकरणप्रियता ही त्याचे ठायीं दिसते, त्यामुळें बिचाऱ्या देशी भाषेच्या प्रकृतीला न मानवणाऱ्या अनेक गोष्टी आधुनिक साहित्यसेवक त्या साहित्यांत कोंबून भरीत असतो. जुनें साहित्य आणि आधुनिक साहित्य याच्यात दुसराही एक भेद आहे. तो हाकीं पूर्वींचें साहित्य प्रसारासाठीं छापखान्यावर अवलंबून राहणारें नाहीं. हल्लींच्या साहित्याचें जीवितच मुळीं छापखाने हे आहेत. छापखाने नसतेतर हें साहित्य प्रकटच झालें नसतें. विस्मृतिसागरात केव्हांच नामशेष झालें असतें!

भाषा व साहित्य यांच्या मधला निकट संबंध व त्यांचें विशिष्ट स्वरूप हीं पाहिलीं ह्मणजे त्याचे अंगीं काहीं विशेष धर्म आहे ही गोष्ट प्रत्यंतरास येते, आणि हें प्रत्यंतर घेण्याची ज्यास इच्छा असेल त्यानें आधुनिक कवींतल्या शिरोमणीची काव्यें व मुक्तेश्वरासारख्या जुन्या कवींची काव्यें यांची तुलना आपल्या मनाशींच करून पहावी. मुक्तेश्वर जी रचना करील ती रा० नारायणराव टिळकांना साधणारी नाहीं व टिळकांची मुक्तेश्वराला येणार नाहीं. पण मुक्तेश्वराची सगळी मनोवृत्ति अव्यभिचारिणी हिंदु व टिळकांची व्यभिचारिणी धड हिंदु नाहीं, धड ख्रिस्ती नाहीं अशी राहिलीच पाहिजे. टिळकांची काव्यरचना उत्कृष्ट यांत शंका नाहीं. तरी पण ती खास महाराष्ट्रीय ह्मटली जाणार नाहीं. कारण तिच्या रक्तांत निःसंशय भेसळ आहे. सध्याचा प्रत्येक साहित्यसेवक टिळकांच्या वर्गांतला आहे. तो धर्मानें जरी हिंदु ह्मणवीत असला, तरी विचारानें अर्धा अधिक ख्रिस्ती असतो. त्याच्या मनोवृत्ति शंकराचार्य किंवा मनु अथवा व्यास यांपेक्षां हर्बर्ट स्पेन्सर किंवा मेटरलिंक, शेक्सपिअर किंवा टेनिसन, कॉम्ट किंवा बर्गसन यांच्या वळणावर अधिक गेलेल्या असतात. बहुजनसमाजाच्या मनोवृत्तीशीं या लोकांच्या मनोवृत्तींचें तादात्म्य कसें व्हावें! जुन्या लोकांना या नव्या साहित्यांत आपलेपणाची ओळख कशी पटावी आणि नवें साहित्य हें साहित्य या उपपदवीला कसें पोंचावें?

तें तर उवड उवड अशक्य आहे. आधुनिक साहित्य हीन प्रभ व अकृतकार्य कां या प्रश्नाचें उत्तर आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून सूज्ञ वाचकांच्या पूर्णपणें ध्यानांत येईल.

## जपानांतले भूकंप

गेल्या आठवड्यांत जपानांत भूकंपाचे जबरदस्त धक्के बसून व ज्वालामुखी पर्वताचें स्फोट होऊन एक सबंध गांव जळून खाक झालें, आणि त्या पर्वतांतून निघणाऱ्या तप्तरसाच्या प्रचंड प्रवाहांनें वीस मैल प्रदेश व्यापून ७० हजार लोकांची भयंकर नुकसानी केली, साकुराशिमा हें शहर सबंध रक्षामय झालें आहे, किती लोक मेले त्याची गणती नाहीं, वगैरे अतिशय घाबरवून सोडणाऱ्या तारेच्या बातम्या येत होत्या. पण आतां असें कळतें कीं वरील वर्णनांत बरीच अतिशयोक्ति आहे. हानि झाली आहे यांत शंका नाहींच, पण ती पाहिल्यानें बातमीदारानें कळविली तितकी भयंकर स्वरूपाची नाहीं. तरी सुमारें दोनशें माणसें मेलीं आहेत, हजार दीड हजार घरांना जबरदस्त नुकसान पोंचलें आहे आणि दहावीस हजार लोकांना भीतीनें आपलें गांव, घरदार, धन दौलत, वगैरे सोडून पळून जावें लागलें आहे. अजून ज्वालामुखीचें गुरगुरण आणि रसोद्गिरण संपलें आहे असें नाहीं. त्यामुळें पुढच्या घटकेला काय बातमी येईल याचा कांहीं नेम सांगतां येत नाहीं. सुमारें ९० वर्षांत भूकंपामुळें व ज्वालामुखीच्या स्फोटामुळें इतकी भयंकर हानि जपानांत कधीं झाली नव्हती असें ह्मणतात. जपानांत बहुतेक सगळ्या देशभर दर आठवड्यांतून एखादा दुसरा भूकंप व्हावयाचाच. त्यामुळें भूकंपाचे लहानमान धक्के जपानी लोकाच्या खिजगणतींत नसतात. भूकंपाला टक्कर देण्याची जपानी लोकांची तयारी ही तशीच आहे. त्यांचीं लांकडी हलकीं घरें, त्यांची राहण्याची तऱ्हा वगैरे सर्व भूकंपापासून नुकसान सहसा होणार नाहीं अशाच बेताची असते. भूकंपाविषयींचें शास्त्रीय ज्ञान जपानी लोकांनीं जितकें मिळविलें आहे तितकें पृथ्वीच्या पाठीवर दुसऱ्या कोणी लोकांनीं मिळविलेलें नाहीं. टोकियो युनिव्हर्सिटींत भूकंपविद्येचे प्रोफेसर व त्याच विषयाची विशेष प्रयोगशाला आहे. परंतु मनुष्यशक्ति अखेर दैवीशक्तीपुढें किती पंगु आहे याची प्रतीति अशा मधून मधून येणाऱ्या हानीच्या प्रसंगीं येते.

## सल्लागार मंडळें.

हिन्दुस्थानच्या राज्यपद्धतींत नवीन प्राणाचा संचार होऊं लागल्यापासून हळू हळूं तिचें स्वरूप इष्ट दिशेनें कसें पालटत चाललें आहे तें जिज्ञासूंनीं लक्षपूर्वक पाहण्यासारखें आहे. प्रथम कौंसिलाच्या विस्तारालाच आंग्लो इंडियन अधिकाऱ्यांची हरकत होती, विस्तारे करावयाचाच तर त्यांत लोकनियुक्त सभासद तरी अधिक नकोत असा त्यांचा आग्रह पडला. लोकनियुक्त सभासदांची संख्या वाढवीत असाल तर निदान हिंदु व मुसलमान यांच्यांत भेद करणारें जातिविशिष्ट निवडणुकीचें पिलूं तरी आंत सोडा अशी त्यावर सल्ला देण्यांत आली. लोकनियुक्त सभासदाचें बहुमत झालें. तरी एखादा ठराव नामंजूर करण्याचा ठराव सरकारनें हातीं ठेविला. अशा पदोपदीं अडचणी येत गेल्या तरी लोकमताचा प्रचंड प्रवाह अशा अडचणींतून मार्ग काढीत काढीत जोरानें वाहत असलेला पाहून कोणाला समाधान वाटणार नाहीं ! ता. १४ जानेवारी रोजीं भरलेल्या वरिष्ट कायदे कौंसिलाच्या सभेंत मद्रासचे ना. रामं अयंगार यांनीं असा ठराव पुढें आणिला होता कीं प्राप्तीवरील कराची आकारणी करण्याचे कामीं सरकारी अधिकाऱ्यांस मदत करण्यासाठीं बिनसरकारी गृहस्थांचीं सल्लागार मंडळें स्थापण्याचे संबंधांत स्थानिक सरकारचा विचार घेण्यांत यावा. ठरावाच्या मागणीकडे पाहिलें तर ती अतिशय साधी व अल्प आहे. पण तिच्यांत एक महत्वाचें तत्व अंतर्निविष्ट आहे हें विचारी वाचकांस सांगावयास नकोच. ना. मि. रामं अयंगार यांच्या ह्मणण्याप्रमाणें हल्लीं कित्येक प्रांतांतून व्यवस्था आहे व तिचें काम चांगलें चाललें आहे, तेव्हां ती हिंदुस्थानांत सर्वत्र सुरू करावी असा त्या मागणीचा गर्भितार्थ असून अशा रीतीनें बिनसरकारी गृहस्थांना राज्यकारभाराच्या एकेका बाबींत अधिकाऱ्यांशीं संलग्न करण्याचें तत्व या मागणीच्या मुळाशीं आहे. सरकारी अधिकाऱ्यांच्या तीक्ष्ण दृष्टीला हें तत्व दिसलें असलेंच पाहिजे. तरी नामदार सभासदाचा ठराव त्यांनीं मुकाट्यानें मान्य केला, आणि लोकनियुक्त सभासदाचा प्रयत्न सुलभ रीतीनें यशस्वी झाला. पण याचें रहस्य हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत संचार पावलेल्या नवजीवनांत आहे हें विसरतां कामा नये. अबकारी खात्यांत असें सहकारी सल्लागार मंडळ इतकें दिवस होतें. आतां प्राप्तीवरील करासंबंधांत लवकरच येईल. म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांत आहेतच. आतां हत्यारांचे परवाने, शिक्षणखात्याची व्यवस्था आणि जमाबंदी यांच्या संबंधांत अशीं मंडळें स्थापन होण्याची फार अवश्यकता आहे, आणि हळूं हळूं तीं येतील अशी आमची खात्री आहे.

## फल संरक्षण विद्या

हिंदुस्थानचा तरणोपाय आतां द्रव्यप्राप्तीचे नवेनवे मार्ग शोधण्यांत व उद्योगवृद्धी करण्यांतच आहे. ज्या गोष्टी आजपर्यंत असाध्य ह्मणून टाकून दिल्या आहेत त्यांच्यावर अलीकडील शास्त्रीय शोधांचा प्रकाश पाडून त्या गोष्टींत यश प्राप्ति करून घेतली पाहिजे. अशी एक विद्या सध्या फलसंरक्षण विद्या ही आहे. ही आमच्या लोकांनीं साध्य करून घेतली तर फार फायदेशीर होणारी आहे. हिंदुस्थानांत आंबे, संत्रे, लिंबे, सफरचंद, बोरें, वगैरे उत्तम प्रकारचीं फळें पुष्कळ प्रांतांतून होतात. त्यांची चटक परकीय राष्ट्रांना लावून त्यांच्याकडून पैसे काढण्यास ही विद्या चांगली उपयोगी पडेल. पुढील युक्तीनें हीं फळें विलायतेसारख्या लांबच्या देशास सुद्धां पाठवितां येतील असें कित्येक शास्त्रज्ञांस वाटत आहे. अनुभव घेऊन पाहावा. सिद्ध झाल्यास एक नवा उद्योग धंदा हस्तगत होईल. ती युक्ति अशी:—

बाटलींत अगर डब्यांत फळें घालून तीं टिकाऊ करण्यासाठीं शिजवावीं लागतात. परंतु शिजविल्याशिवाय तीं कशीं टिकवावीं, याबद्दलची माहिती लोकांस नाहीं. फळें व शाखभाजी ही पुढील पद्धतीनें एक वर्षपर्यंत टिकवितां येतात फळें ठेवणें ती उत्तम स्थितींत असावीं. त्या फळांचा कोणताही भाग थोडा देखील लागलेला, सडकेला अगर नासलेला नसावा. फळें ठेवतांना तीं अगदीं कोरडीं असावीं. ॲपल अगर पीअर ठेवणें असेल तर फळीवर तें एक आठवडाभर ठेवावें व त्यास पाणी सुटतें, तें कोरड्या रुमालानें पुसावें. नंतर निदान दीडफुट उंचीची लांकडी साधारण मोठी पेटी घ्यावी. रेती व लांकडाच्या करवतीनें कापतांना झालेला भुसा अथवा बुचाचा भुसा आणावा. भुशापेक्षां रेती जास्त चांगली; कारण भुशाचा वास कधीं कधीं फळांस लागण्याचा संभव असतो. रेतीच्या योगानें पेटींतील हवा नाहींशी करतां येते. पेटीच्या तळाशीं कांहीं इंच जाडीचा रेतीचा अगर भुशाचा थर करावा. यावर फळें एकास एक लागणार नाहींत, अशा रीतीनें मांडावीं यावर तीं झांकतील, इतकी रेती अथवा भुसा घालावा. याप्रमाणें थरावर थर रचावे व सर्व पेटी भरावी. पेटीस घट्ट झांकण लावावें. ती उबदार कोरड्या हवेच्या जागीं ठेवावी. या रीतीनें फळें ठेवल्यास ताजींच्या ताजी अशीं फळें एक वर्ष टिकतात. पेरू, डाळिंब, मुसंबी, नारिंग, अननस, आंबा, केळें, पोपया, अंजीर, सफरचंद, कलिंगड, भेंडा, गावारी, वांगी, टोमाटो, बटाटे, कांदे गाजर, सिताफळ, रामफळ, काकडी, अलकोल, कावी, वगैरेसंबंधीं प्रयोग करून पाहावे व अनुभव प्रसिद्ध करावा. मुलांमुलींनीं व बायकांनीं हे प्रयोग करून पाहाण्याजोगे आहेत.

## गाई कीं बकऱ्या ?

दिवसेंदिवस दुधाची महागाई होत चालली आहे. शिवाय चांगलें निर्भेळ दूध पैसे देऊनही मिळत नाहीं. गाई ह्मशींचें दूध आपल्या देशी पद्धतीनें कितीही काळजीपूर्वक काढलें तरी शास्त्रज्ञांच्या पसंतीस तें येत नाहीं. आपले गवळी गाई ह्मशीला चारण्यांत, दूध काढण्यांत, व तें घरोघर नेऊन घालण्यांत अतिशय गलिच्छपणा करतात. यामुळें अनेक रोगांचें जंतु गाईह्मशींच्या दुधाच्याद्वारें मनुष्याच्या अंगांत प्रविष्ट होतात असें डाक्तर लोकांचे मत आहे. हिंदुस्थानांत होणारा क्षयरोगाचा प्रसार केवळ या दुधामुळें आहे असें कित्येक ह्मणतात. हा अनर्थ टळण्यास व लोकांना स्वस्त खर्चांत निरोगी, व पुष्टिकर असें दूध मिळण्यास कांहीं मार्ग आहे काय ? हा प्रश्न पुष्कळांना येऊन पडला असेल. प्रसिद्ध अमेरिकन डाक्तर मि० बुक यांनीं हा सोडविला आहे. त्यांना अनेक प्राण्यांच्या दुधांचें रासायनिक पृथक्करण करून पाहिल्यावर असें दिसून आलें कीं सर्वांत बकरीचें दूध फार सोयीचें आहे. या दुधांत क्षयरोगाचे जंतु मुळींच नसतात. पुष्टिकारक द्रव्येंही अधिक प्रमाणांत आहेत आणि बकऱ्या संभाळणें कमी त्रासाचें व खर्चाचें आहे. हिंदुस्थानांत गोरगरीब कुणबी, मुसलमान वगैरे लोक बकऱ्या पाळतात व त्यांच्याच दुधावर त्यांच्या मुलाबाळांचें पोषण चालतें. बकरीचें दूध पचण्यास चांगलें ह्मणून लहान मुलाला गाईच्या दुधाऐवजीं तें घालतात. ही बकऱ्या पाळण्याची रीत सरसहा अंमलांत येईल तर आमच्या मुलांलेकरांना थोडेंसें तरी पुष्टिकर व तुष्टिकर असें दूध मिळेल. शिवाय बकरीचें राहणें गाई ह्मशींपेक्षा पुष्कळच स्वच्छ असतें. तेव्हां लोकांनीं आतां गाई ह्मशी बाळगण्यापेक्षां बकऱ्या बाळगाव्या, आणि गोपालाच्या ऐवजीं मेषपाल व्हावें हें योग्य व सोयीचें आहे.

## जृंभकास्त्र

आमच्या पुराणांतून केलेल्या युद्धांच्या वर्णनांत अग्न्यस्त्र, वाय्वास्त्र, जृंभकास्त्र, वगैरेचीं वर्णनें आहेत, पण त्या कावि कल्पना, अतिशयोक्ति, मतलबी ब्राह्मणांचें बरळणें, अशीं निंदास्पद विशेषणें लावून आमच्यांतली शहाणी ह्मणविणारी मंडळी पुराणांचा तिरस्कार करते. पण या मंडळीनें त्याज्य व सबझूट मानलेल्या गोष्टींची पुनरावृत्ति परदेशीयांनीं केली ह्मणजे मात्र ही मंडळी आश्चर्यानें तोंड फाडून त्यांचें कौतुक करते! अमच्या पुरणांतलीं जृंभकास्त्रें खोटीं! कारण, हजारों लोकांना एकदम झोपेनें वेढून टाकता येणें कल्पनेला तरी शक्य आहे काय? असें ही मंडळी ह्मणणार? पण हें शक्यच नाहीं तर अनुभवसिद्ध आहे असें एका राशियन शास्त्रज्ञानें प्रत्यक्ष दाखविलें आहे. सेंटपीटसबर्ग येथें हंफ्रे नांवाच्या एका इसमानें एक नवीन बंदुक तयार केली आहे. ती सोडली ह्मणजे प्राणी निद्रिस्त होतो. इतका कीं त्याला चेतनाच राहत नाहीं. त्याला वेदना बिलकुल होत नसतात. या बंदुकिच्या युक्तीमुळें केवढें भूतदयेचें काम होईल त्याची कल्पना करतां येत नाहीं. लढाईतून रक्तपात होण्याचें कारण उरणार नाहीं. हिंस्त्र पशूंना व सर्पादि जंतूंना मारण्याचें कारण नाहीं. त्यांना निद्रावश करून लांब नेऊन सोडून देतां येईल. युद्धांत शस्त्रवैद्याचें काम उरणार नाहीं. कारण अस्थिभंग होण्याची भीती नाहीं. या बंदुकींत घालण्याच्या काडतुसाच्या टोकांत छिद्रांत अफूच्या अर्काची एक गोळी बसविली असते. ती शरीरांत प्रविष्ट होतांच मनुष्य निचेष्ट पडतो, किंवा वेड्यासारखा हंसत हंसत नाचायला लागतो, व हें तांडवनृत्य करतां करतां गात्रें शिथिल होऊन निद्रावश होतो. पूर्वी आमच्यांत जृंभकास्त्र होतें तें असेंच निद्रावश करणारें होतें. पण त्या अस्त्राचा प्रयोग आह्मां लोकांवरच होऊन आह्मी तूर्त निद्रावश झालों आहों, व स्वतःजवळची विद्या हरवून बसलों आहों. आमच्या वाडवडिलांनीं जृंभकास्त्रासारखे शोध लाविल्यावर त्यांच्या वंशजांना जणूं काय हातपाय ताणून निद्रामुख घेण्याचा हक्कच येऊन पोंचला आहे.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान —** या आठवड्यात थंडी बिलकुल नाहींशी झाली असें प्रारंभीं वाटत होतें परंतु काळपासून थंडी चमकूं लागली आहे. कापूस इतका येतो कीं, सकाळीं रस्ते कांहींवेळ बंद पडतात. आरोग्य पूर्णपणें नांदत आहे.

मे० कमिशनर साहेब याच तालुक्यांत फिरतीवर आहेत.

मे० डेप्युटी कमिशनर साहेब गेल्या शुक्रवारीं नागपूरास स्वयंसेवकाचे सैन्याचे तपासणीचे वेळीं हजर राहण्यासाठीं गेले आहेत. या आठवड्याच्या अखेरीस परत येतील.

रावबहादूर देवराव विनायक यांची प्रकृती दिवसेंदिवस क्षीण होत चालली आहे. हें कळविण्यास आह्मास फार वाईट वाटते. अशा स्थितींतही ते आपलें लोक सेवेचें व्रत नेटानें पाळीत आहेत. परवा त्यानीं आपले घरीं व्यापाऱ्यांची एक सभा भरविली होती. यांची सल्ला मसलत स्वार्थ निरपेक्ष, पोक्त आणि समाजहितकारक असते, हिचा लाभ आह्मास जितका निरंतर मिळेल तितका हवाच आहे.

२४ जानेवारीच्या "हितवाद" पत्रामध्यें रावसाहेब केशव गोविंद दामले याचे जागीं मि. एस. सी. होसाळी यासच पब्लिक प्रॉसीक्यूटर नेमावें अशी कोणी फेअर प्ले या नामधारी गृहस्थानीं सूचना केली आहे. अशां प्रकारच्या व्यक्ति विषयक सूचना कितपत विचारणीय आहेत हा प्रश्न निराळा. परंतु जबलपूरास एक पारशी गृहस्थ पब्लिक प्रॉसीक्युटर आहेत ह्मणून येथें पारशी गृहस्थाची नेमणूक करण्याची गरज नाहीं व लिंगायत समाजातील एकास नेमावे ही जातीप्रेम मूलक सूचना आहे किंवा कसें तें कळत नाहीं. रा. रा. होसाळी संभावित गृहस्थ आहेत व या जागेस योग्य आहेत. या बद्दल आमचा आणि फेअर प्लेचा मतभेद नाहीं; परंतु ते लिंगाईत आहेत ह्मणूनच त्यास ही जागा द्यावी हें ह्मणणें निदान सुशिक्षितवर्गास पसंत पडेल असें आह्मास वाटत नाहीं. व हा विषय वर्तमानपत्रात चर्चा करण्याजोगाही नाहीं.

महमद जैनुलाबदीन, ना. तह. इलिचपूर यांस आफि. तह. करून वणी येथें नेमलें.

**तोतयाचें बंड —** आकोला अम्यॅटूर थिएट्रीकल क्लबनें गेल्या सोमवारीं स्त्रियांच्या दवाखान्याप्रित्यर्थ तोतयाच्या बंडाचा प्रयोग दुसऱ्यानें करून दाखविला. खेळास रा. रा. कमिशनर स्टाडन साहेब व बहुतेक सर्व अधिकारी मंडळी मुद्दाम आली होती. मागच्यापेक्षा ह्या वेळचा खेळ उत्तम वठला होता. बकंभट, पार्वतीबाई, नानाफडणवीस या भूमिकांचीं कामें प्रेक्षक मंडळीस फारच आवडलीं. या मंडळीस ललीतकलादर्श संगीत मंडळी व भारत नाटक मंडळी यानीं अतिशय मदत केली व ह्मणून अम्यॅटूर मंडळीनें दोघाही कंपनीस कमिशनर साहेबांच्या हस्तें रौप्यपदकें देवविलीं.

**क्षुल्लक गोष्टीचा भयंकर परिणाम—** ता. १८ जानेवारी रोजीं येथील जेलच्या एका वारडरानें एवढ्याशा क्षुद्र कारणावरून हेडवारडर व एका कैद्याचा खून भरदिवसा रस्त्यावर बंदुकीनें केला. त्याला कारण ह्मणजे इतकेंच कीं ज्या कैद्याला वारडरानें मारलें त्यानीं त्याच दिवशीं सकाळीं हा वारडर कैद्यांना पैसे घेऊन विड्या वगैरे पुरवतो व त्या ठेवण्याचें ठिकाणही मला माहित आहे तें मी हवे असल्यास दाखवितों अशी तक्रार केली. तेव्हां जेलर साहेबांनीं कैद्याचीं सत्यता पाहण्यास हेडवारडरला पाठविलें. हेडवारडर व वारडर याचा मूळचा कांहींच द्वेष नव्हता. कैद्यानें तक्रार केल्या प्रमाणें जिनसा खरोखरच सापडल्या. सापडल्यावर हेडवारडरची व त्याची बरीच बाचाबाची झाली तेव्हा पहून घेईन असें वारडर ह्मणाला व सर्वजण पुढें चालू लागले व वारडर जरा पाठमागें राहिला. जेलजवळ येताच त्यानीं आपल्या बंदुकीनें हेडवारडरला व कैद्याला मारलें. एकदोन वारडर मध्यें येत असता त्यानें त्यासही मारून टाकण्याची धमकी दिली व ते निःशस्त्र असल्यामुळें पुढें जाण्यास धजले नाहींत. बंदुकीचा आवाज अगदीं जेल नवळ आल्यानें जेलरसाहेब हे बाहेर येऊन ज्या अनुरोधानें आवाज आला त्या अनुरोधानें गेले. पुढें जातात तो खुनी वारडर एकटाच बंदुक घेऊन येताना दिसला. त्याचा मुलगा जवळच खेळत होता त्यास मोठ्यानें हाक मारून त्यानें जवळ बोलावलें व ह्मणाला कीं हमनें दो कू मारडाला हमारी तुमारी अखरकी मुलाकत है तुम मेरपास आव. असें जेलर व असि. जेलर साहेबानीं ऐकले तेव्हा कांहीं तरी दगा आहे असें जाणून अलार्म वगैरे दिला पण त्यामध्यें त्याची बहादूरी इतकीच कीं तो खुनी इसम पुढें भरलेली बंदुक घेऊन उभा असता न डगमगता त्यास मोठ्या हुशारीनें त्यानीं शात केले. खरोखरच हें प्रसंगावधान व आपल्या कर्तव्याकरिता जिवाची पर्वा न ठेवतां आपला जीव जोखमींत घालण्या करितां त्यांची प्रसंशा करावी तितकी थोडीच आहे. सर्व गोष्टी ईश्वर इच्छेनेंच होतात पण कित्येक लोक पुढील अनिष्टाची अगोदर जाणीव एखादयाला होते असे ह्मणतात यांत कांहीं सत्यता असावी असें या खूनावरून वाटतें. कारण जो हेडवारडर मारला गेला त्याची बायको जरा वेडसर आहे. व तिला कधीं कधीं फिटसुद्धी येतात पण त्यात विशेष हेंच कीं पाचसहा महिन्यांत ज्या ठिकाणीं हा हेडवारडर मारला गेला त्या ठिकाणींच ती लहरीमध्यें येऊन जमादार काट डाला जमादार मारागया असें ह्मणतांना कित्येकानीं कित्येकदा तिला पाहिले होते.

**पुरवणी —** आजच्या अंका सोबत मुंबईच्या "**ज्ञानांजन** मासिकाची पुरवणी वाटली जात आहे तिकडे वाचकानीं अवश्य लक्ष द्यावें.

---

## नोटीस

केशरबाई उर्फ मानियाबाई जवजे डाबुसिंह रघुवंशी पाथर्डीकर हल्लीं राहणार मौजे खोलापूर तालुका व जिल्हा उमरावती यांस

खालीं सही करणार यांजकडून नोटीसद्वारें कळविलें जाते कीं तूं माझी सावत्र आई "माझे बापानें गंधर्वानें तुला केली होती" सबब सावत्र आई असून तुझे पोटीं संतती नाहीं. काय तो मी एकटा माझे बापाचे पोटीं औरस पुत्र असून शिवाय एक मला सावत्र बहीण नामें कलावती ही दुसरे सावत्र आईपासून आहे. आह्मीं उभयतां बहीणभाऊ सध्या अज्ञान आहोंत. आमचें पालनपोषन चांगलेप्रकारें करून माझे बापाची असलेली वडिलोपार्जित स्थावर जंगम इस्टेट कायम राखण्याचें तुझें मुख्य कर्तव्य असून आमचे वडील वारले नंतर माझी इस्टेट अफरातफर करून तुझे बापाचा व भावाचा त्या इस्टेटीपासून फायदा करण्याचा तुझा हेतू असून तूं आह्मांस घेऊन आमचें वडिलोपार्जितचें घरात पाथर्डी येथें नराहता आपले बापाचें गांवीं वरील मुक्कामीं आहेस. तुझे अंगावर सोन्याचांदीचे डागडागिने स्त्रीधन ह्मणून किंमत ५०० पांचशेचे तुजजवळच आहेत.

तूं आह्मां उभयतांस सांभाळल्यामुळें माझे वडिलांचेच समक्षपासून माझे आतेभाऊ रा० नारायणसिंह भबूतसिंह वगैरे रा० हरताळे यांजपाशीं आह्मीं आहोंत. व ते आमचे उभयतांचें शुभचिंतक असून चांगलेप्रकारें आह्मास वागवीत आहेत.

त्या मला न विचारता व तसेंच आमचे शुभचिंतक रा० नारायणसिंहजी वगैरे रा० हरताळे यांचा सल्ला व विचार न घेतां वडिलोपार्जितचें देणें असलेले कर्जा बद्दल नवीन दस्तऐवज करून दिल्याचें व तसेंच तूं कांहीं नवीन कर्ज काढून दस्तऐवज करून दिल्याचे ऐकितों. नवीन काढलेलें कर्ज आमचे उपयोगाकरितां तूं काढलें नसल्यामुळें मी व माझी इस्टेट त्या कर्जाबद्दल जबाबदार नाहीं. व वडिलोपार्जितचे कर्जाबद्दल सावकारापासून हिशेब समजावून घेण्याचे व सावकारानीं हिशेब समजावून देण्याचें असून तसें तूं माझे पालन करणारास नविचारता आपमुखत्यारीनें करून दिलें असल्यामुळें हिशेब समजून घेतल्याशिवाय "तूं करून दिलेले दस्तऐवजाचे" कर्जाबद्दल मी व माझी स्थावरजंगम इस्टेटही जबाबदार नाहीं. यास्तव वडिलोपार्जितचे कर्जाबद्दल तूं व सावकार या उभयतांनीं मिळून माझें पालन करणारास चार पंचासमक्ष हिशेब समजाऊन देणें. तसें नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आत न केल्यास त्या दस्तऐवजावरून निघत असलेले कर्जाबद्दल मी व माझी स्थावरजंगम इस्टेट मुळींच जबाबदार नाहीं. हिशेब समजाऊन देण्याचे तुमचें व सावकाराचें असें तुह्मां उभयतांचें मुख्य कर्तव्य आहे. तूं आमची सावत्र आई असल्यानें फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस. या शिवाय तुला माझी जंगम व स्थावर इस्टेट अफरातफरा करण्याचा व तसेंच गहाण, खरेदी, बक्षीस वगैरे कोणतेचप्रकारचा करून देण्याचा हक नाहीं व ती माझी इस्टेट तुझ्यापासून कोणीही कसेंही प्रकारे घेऊंनये व तूं देऊ नये यास्तव या नोटिशीनें तुला सुचविलें आहे.

शेताची लागवण मी माझे शुभचिंतक आतेभाऊ रा० नारायणसिंह हरताळेकर यांचेमार्फत केली असून शेत व घर माझेंच कबज्यांत आहे. शेत लागवणीस ज्यांस दिलें आहे त्याजपासून शेताचे स्वामित्वाची रकम तूं आमचे परोक्ष घेऊ नये व शेत वाहणारानीं ही स्वामित्वाची रकम तुला देऊं नये. इतःपर तूं घेतल्यास व त्यांनीं दिल्यास ती कायदेशीर होणार नसून मी ती रकम दावा करून वसूल करीन. यास्तव तुला सूचना केली आहे.

तुझे अंगावरील डागडागिने व घरांतील तांबेपितळेचीं भांडीं व कपडालत्ता मिळून एकंदर एक हजार रुपये किंमतीची जिनगी तुझेजवळ असलेली ती तूं मी सज्ञान होईपावेतों कायम राखून नंतर मला चार पंचासमक्ष सोपावी व माझी पावती घ्यावी.

तूं तुझे अन्नवस्त्राबद्दल दरसाल रुपये ५० मिळण्यास्तव माझे आतेभाऊ रा० कन्हैयासिंह हरताळेकर यांजपासून एक करारनामा लिहून घेतला असून तो तुझेच जवळ आहे व मागील सालचे अन्नवस्त्राबद्दलची रकम तुला माझे शुभचिंतक आतेभाऊ हरताळेकर यांजकडून दिली गेली असून ती पावल्याबद्दल तूं पावती तारीख २६-४ १९१३ इसवीं रोजीं माझे आतेभावांस दिली आहे व यापुढें दरसाल रु. ५० ची रसीद देऊन हरताळेकर माझे आतेभावापासून रकम नेत जावी.

या वरील नोटिसीप्रमाणें तूं आपलें वर्तन ठेवावें ह्मणून तुला सूचना केली आहे. अगर त्याप्रमाणें तूं न वागल्यास व माझी जंगमस्थावर इस्टेट अफरातफरा केल्यास ती अज्ञानाची इस्टेट असल्यानें कायदेशीर होणार नाहीं हें तुझेजवळून इस्टेट घेणारांनीं लक्षात ठेवावें. तुला कांहीं लोक मला बुडविण्याचे हेतूनें माझे विरूद्ध सल्ला देऊन माझे अज्ञानाची इस्टेट लुबाडण्याचे इरादानें तुजपासून कसेंहीप्रकारे घेतील तर ती कायदेशीर समजली जाणार नाहीं. ही गोष्ट खालील गृहस्थांनींही लक्षांत ठेवावी. —

१ कालुराम कुंडलमल
२ दवलत रामजी पाटील
३ लक्ष्मण बाजीराव
४ राजाराम कालु पाटील
५ गोविंद गुणाजी काळे
६ किसन लुडाजी
७ राजाराम दलपतसिंग रजपूत
८ गुलाबसिंग तुलसीराम रजपूत
९ त्रिंबक सखाराम पाटील
१० केदारनाथ बिंदीचंद मारवाडी

सर्व मौजे पाथर्डी तां० आकोट यांनींही लक्षांत ठेवावी. व माझी इस्टेट माझे सावत्र आईकडून कोणींही कसेंहीप्रकारें घेऊं नये. कळावें ता० ९१-१९१३ ई० दस्तुर मोहनसिंह रूपसिंह रघुवंशी मलकापूर

सही

तुळशीराम डाबूसिंह रघुवंशी अ०
पा० आतेभाऊ नारायणसिंह
भबूतसिंह हरताळेकर नि०
खुद्द हातची रेघ असे
दस्तुर मोहनसिंह रूपसिंह मलकापूर.

नो० नं० २७

# NOTICE

Notice is hereby given to the public that the Municipal committee of Ellichpur city propose to make the following rulls under Section 116 (1) (a) (b) and (2) of the Berar Municipal law 1886 on all vehicles and animals plying for line within the limits or the Ellichpur city Municipal Cmmittee.

The rules will be taken into consideration after the expiry of one month from to day, and any objection or suggestions in respect there of must be forwarded to the under signed before the expiry or the said period. After this period no objection will be taken into consideration.

## RULES.

Rules under Section (116) (a) (b) and (2) of the Berar Municipal Law, 1886, for vehicles and animals playing for hire within the limits of the Ellichpur City Municipality.

1. The preprietor of every vehicle or animal plying for hire within the limits of the Ellichpur City Municipality shall provide himself with the necessary license from the Municipal Committee or from such person as the Municipal Committee may authorize in this behalf.

The license shall be obtained on payment in advance of the fees prescribed below:—

| Description. | For a year or a portion of a year exceeding six months. | for six months or less. |
|---|---|---|
| Licensed to carry passengers | | |
| Motor vehicles of any description | 30. 0. 0 | 15. 8. 0 |
| Four wheeled cart | 10. 0. 0 | 5. 4. 0 |
| Two—wheeled cart or Tongawith springs | 8. 0. 0 | 4. 4. 0 |
| —Do— without springs | 6. 0. 0 | 3. 4. 0 |
| per animal | 1. 0. 0 | 0. 10. 0 |
| Licensed to carry goods | | |
| Motor vehicle of any description | 30. 0. 0 | 15. 8. 0 |
| Four wheeled carts | 10. 0. 0 | 5. 4. 0 |
| Two wheeled carts | 6. 0. 0 | 3. 4. 0 |
| Per animal | 1. 0. 0 | 0. 10. 0 |

Note 1. The word " vehicle " wherever it occurs includes Motor vehicles of any description

Note 2. Vehicles and animals thus licensed shall during the period covered by the license be exempt from the tax on vehicles and animals assessed under Section 41 (c) and (d) of the Berar Municipal Law, 1886.

11. The maximum load to be carried by any vehicle licensed to carry passengers shall be as follows:—

An ordinary Khandesh Dhamni exclusive of driver — 4 Passengers
A large —Do— or Khasar exclusive of the Driver — 6 —do—
Two-horse Carriage —do— 4 —do—
One-horse —do —do— 3 —do—
A four-wheeled large sized carriage or onimbas exclusive of the Driver — 8 —do—

III. The proprietor of Motor Vehicle shall declare in his application for a license the number of passengers which his Motor vehicle can conveniently accomodate, and he will be entitled to carry only that number of passengers subject to the conditions that the Municipal Committee may at its descriptioo reduce the number of passengers to be carried on with regerence to the conditions of the engine and the state of the vehicle.

IV. The maximum load of any vehicle licensed to carry goods shall not exceed 16 maunds. one maund is equivalent to 40 seers and one seer being equivalent to 80 tolas.

Provided that any such vehicle which may oceasionally be used to carry more passengers shall not carry more than 6 persons exclusive the driver.

The proprietor of a Motor vehicle shall declare in his application for a license, the horse power of the engine attach to it, and he shall be entitled to carry only such weight as the engine can suitably bear. Such weight shall be determined and mentioned in the license by the Tonga sub Committee.

Every motor vehicle plied at any time between sunset and sunrise shall carry two lighted lamps in front sufficiently powerful to make clearly visible objects at a distance of 100 feet.

No Motor vehicle shall within the city walls be driven at a speed exceeding five miles an hour, and outside the city walls at a speed exceeding twenty miles an hour.

Every licensed Motor shall have painted on it its number and the number of passengers it is licensed to carry.

V. No person shall drive a licensed vehicle unless he is licensed as competent to do so. The fee for a driver's licens shall be one rupee if taken out for a whole year and annas ten if for a half year.

The license to be granted with a badge containing the number of the license of the vehicle and the driver. The badge granted shall be work on the right arm. The badge must be returned, when the license is cancelled. Badge shall be transferable in case of a driver being dismissed or otherwise removed. The number of licensed vehicles.

No person shall drive a Motor vehicle unless he is licensed by the Tonga Sub Committee.

The competency of such drivers shall be determind by the [illegible]veyance supervision Sub Committee.

The fees for a driver's license shall be Rs 5/. for a whole year o[illegible] thereof exceeding 6 months and Rs 2. 12. 0 for a half year or a part thereof.

VI. As regards the forms &c: to be issued and the registers to [illegible]tained the Municipal Committee shall follow the proceure laid down in r[illegible]d 136 of the Municipal Account rules published in Hyderabad Residenc[illegible]otification No 278 dated the 22nd August 1896 and confirmed by t[illegible]nt in Hyderabad Residency Orders Notification No 106 dated the 29 Marc[illegible] Every vehicle licensed must have the number of its license clearly marked on [illegible] sides of the vehicle.

VII. Licenses shall be issued yearly and half yearly the year being reckoned from 1st April to 31st March both days inclusive, and the first half of the year being reckoned from 1st April to 30 th September, both days inclusive; and the second half from 1st October to 31st March, both days inclusive. No license shall be issued for periods other than those specified.

VIII. Licenses may be taken out and renewd at any time on application to the Municipal Committee. The first application under these rules shall be made within one month from the date on which they come into operation.

IX. Every proprietor or person in charge of a vehicle or animal shall produce his license for inspection when called upon to do so by any Magistrate, or Police Officer, or Officer or servant of the Municipality duly authorized in this behalf, or by any person engaging the vehicle.

When a license is defaced, torn or lost, a duplicate copy of it may be obtained on payment of a fee of 8 annas in respect of a license pertaining to a vehicle and annas two in respect of a license pertaining to a driver or animal The original one shall not be in force thereafter. No refund license fee for vehicle, animal or driver shall be granted for any cause whatever.

XI. Every driver shall keep to the left hand side of the road and every vehicle shall be provided with a light between sunset and sunrise.

XII. All vehicles and animals playing for hire shall be presented in the months of march and September of each year at the Municipal office for inspection by a Sub Committee composed of two or three members of the Municipal Committee appointed by the General Committee.

No vehicle or animal shall be licensed or have the license for it renewed unless it is considered fit for playing.

XIII. The license of any licensee, who breaks any of these rules may, for reasons to be recorded in writing, be suspended by the Chairman, Vice-chairman or the Secretary of the Municipality for a period not exceeding six months and may be subsequently cancelled by the Municipal Committee if the cause for its suspention continues to exist at the end of that period. The license of any licensee whose animal becomes unfit for plying may also be similarly suspended by the Chairman, Vice Chairman or the Secretary of the Municipality until the vehicle or animal is replaced or has otherwise become fit for playing.

Any vehicle or animal of which the license is suspended shall during the period of such suspension be considered as without license and the proprietor of such vehicle or animal shall be liable to prosecution and conviction, under rule 13, if he plies for higher during such suspension; and any licensee repeatedly infringing any of these rules shall be liable to a prosecution before a magistrate and on conviction to a fine not exceeding Rs 20/.

XIV. Any person plying a vehicle or animal for hire within the limits of the Ellichpur City Municipality without obtaining a license as provided for in these rules shall be liable to a prosecution before a Magistrate and on conviction to a fine not exceeding Rs 20/.

XV. The Municipal Committee may at its disеretion grant or refuse a license to any licensee, who has been repeatedly convicted under rules 12 and13, or whose license has been repeatedly suspended under rule 12.

XVI. The licenses are no transferable without the previous permission of the Municipal Committee or of such person as the Municipal Committee may authorize in that behalf but when the ownership of a licensed vehicle or animal is transferred during the currency of that license, notice shall be given by the transferee, in writting, within one week of the transfer to the Municipal Secretary, who will then, on payment of a fee of 8 annas in the case of a vehicle and o 2 annas in the case of an animal, make the necessary alteration in the register and the license, If such notice de not given within 7 days, as required above, the new proprietor shall, if the vehicle or animal plies for hire within the Municipal limits, be liable to pay a yearly license fee and shall also be liable to be prosecuted and convicted under rule 13.

XVII. The following shall be the maximum rates of hire within the Municipal limits in the absence of any express contract.

| | From railway station to any place or to: In town or from | To the other side of the river or up to the Circuit house or from |
|---|---|---|
| For passengers per seat in the Motor Vehicle | 0—3—0 | 0—6—0 |
| —Do— horse Tonga | 0—1—6 | 0—3—0 |
| —Do— bullock cart | 0—1—0 | 0—1—6 |
| Rates for vehiclus drawn by bullocks and carrying 4 passengers | 0—4—0 | 0—6—0 |
| Rates for vehicles drawn by bullocks and carrying 6 passengers | 0—6—0 | 0—8—0 |
| Horse Tonga drawn by one horse | 0—4—6 | 0—9—0 |
| Horse Tonga drawn by two horses | 0—6—0 | 0—12—0 |

Rates for hire for a whole cart or Tonga for any time within and not exceeding one hour — 0—8—0
—Do— for any time for every hour

नोटीस beyond one hour——— 0—1—0

The rates for [illegible] goods may be settled between themselves by the owner or the driver of a [illegible] the person hiring it.

XVIII. Noth[illegible] [illegible]ed in these rules shall prevent the proprietor of a licensed cart, from en[illegible] into a private contract for the hire of such cart by the day or a month.

XIX Every [illegible]er or a driver of a licensed vehicle or animal shall be bound at all times to m[illegible]e his licensed vehicle or animal or both available to persons requiring the same provided the requiste hire is paid or agreed to be paid by the hirer.

Municipal Committee in the interest of public safety shall have the power to close any road to motor vehicles plying for hire and to specify the routes which alone shall be oden to such trafic.

*Ellichpur city*
*18th January 1914.*

S/d K. V. Mhaskar
*Secretary M. C.*
*Ellichpur city.*

No. No 24

## नोटीस

नोटीस नेणारी सखाराम रवुजी जात कासार राहणार वोडसगांव ता० दर्यापूर जिल्हा उमरावती यांस—

खाली सही करणार यमुना मर्द सखाराम जात कासार रा० शिरपूर तालुका दर्यापूर जि० उमरावती इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी जी नोटीस पाठविली ती पावली. ती या नोटिशीवरून रद्द असे. तर या नोटिशीवरून कळविण्यांत येत कीं तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून माझें लग्न मित्ती जेष्ट शु॥ ९ संवत १९५८ सालीं झालें. त्या मित्तीपासून आज मित्ती पौष व॥ ३ संवत १९७० पावेतों वर्ष १२ बारा झाले तों मी आपले माहेरींच होते. तुह्मी नेणेंआणणें मुळींच केलें नाहीं. त्यांत तुह्मी पथरोटांत लग्न मुक्कामीं मला नेण्याचें केले असतां मी तुह्मास पंचासमक्ष ह्मटलें कीं तुह्मी मला माझे खावटीचे रुपये द्यावे व तुह्मी मला घेऊन जावे त्यात तुह्मी दरसाल ३५ पसतीस रुपयेप्रमाणें १२ वर्षांचे पंचासमक्ष कबूल केले ती मित्ती जेष्ट शु॥ ९ संवत १९६९ त कबूल करून रुपये देण्याचा करार आश्वीन व॥ ३० अमावास्येस देऊ केले. नंतर मी तुमचे समागमे आले. पंचानीं मला पाठविलें. त्यांत तुह्मी करारशीर रुपये पाठविले नाहींत. ह्मणून मी पुन्हा दिपवाळीस मी आपले माहेरी आलें व तुह्मी मला पाठविलें त्यांत तुमचे घरचा डागडागीना माझे अंगावर नव्हता नंतर तुह्मी दोनदा नेण्याकरितां आलेअसतां तुह्मी रुपये नआणल्या कारणानें मी तुमचेसमागमे आलीं नाहीं ह्मणून तुह्मी पोस्टमार्फत मला नोटीस दिली ती नोटीस या नोटिशीवरून रद्द असे. तर या नोटिशीवरून तुह्मास कळविण्यांत येते कीं जर तुह्माला माझी जरूरी असल्यास माझे खावटीचे रुपये माझे आईबापास पंचानुमते ठरले ते रकम रुपये ४२० चारशे वीस घेऊन घेऊन मजला नेणें. पंधरा दिवसाचे आत जर रुपये न आल्यास मी तुमची स्त्री नाहीं व तुह्मी माझे नवरे नाहीं. व माझेवर तुमचा कोणतेही प्रकारचा हक्क नाहीं व मी पंचानुमतें पुनर्विवाह करीन. यांत अटकाव केल्यास ऐकलें जाणार नाहीं व खावटीच्या रुपयाचा दावा घालून कोर्टमार्फत रुपये घेतले जातील व पुढें तुह्मी कोणतेही प्रकारची तक्रार केल्यास ऐकलें जाणार नाहीं व आपण लिहिलेली नोटीस देऊन खावटीचे रुपये बुडविण्याचें मनात आणून नोटीस दिली ती दिलेली नोटीस खोटी असे. दस्तुर

सही

यमुना मर्द सखाराम कासार मु० शिवर ता. दर्यापूर जि० उमरावती नि० डावा आंगठा

नो० नं० २९

---

## नोटीस

नोटीस कलम ९१ आक्ट ८ सन१८९० प्रमाणें किरकोळ मुकदमा नंबर १०१ सन १९१३इ०

विद्यमान डि. जज्यसाहेब यांचे कोर्ट मुकाम आकोला

नांव दत्तु
बापाचें नाव मारोती
जात कुणबी राहणार निवाणें
तहसील जळगांव जिल्हे बुलडाणें
ज्या अल्पवयी मावजी २ पुंडलीक वल्लद रावजी कुणबी उमर वर्षे ९ व ६ राहणार निवाणें तहसिलचे(२)
जळगांव जिल्हे बुलडाना साठीं पालन कर्ता
(१) विषयींच्या अर्जा संबंधीं
(३)
यांस

सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयींचें (२) अज्ञान व त्याची मालत्ता साठीं पालन कर्ता (४) विषयीं अर्ज केल्या वरून सदर्हू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख १६ माहे फेब्रुवारी सन १९१४ ई० रोजीं नेमिली आहे. त्या वरून अशी नोटीस देण्यात येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जा संबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हाजर झाले पाहिजे; आणि त्यांस असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदरहू लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल.

आज तारीख २० माहे १ सन १९१४ ई० रोजीं आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का. A. L. Dighe.
for District Judge.
Akola.

नो. नं. २६

---

## कापूस—तक्ता—साप्ताहिक— १७ जानेवारी १९१४ पर्यंत

| जिल्हा. | वर्षे | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या — ता. १७।१।१४ पर्यंतचा आठवडा | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या — १।१०।१३ पासून | काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या — ता. १७।१।१४ पर्यंतचा आठवडा | काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या — १।१०।१३ पासून | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठडी — ता१७।१।१४ पर्यंतचा आठवडा | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठडी — १।१०।१३ पासून आज तागाईत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उमरावती | चालूं साल | १९,३४४ | ८८,१३७ | ९९७ | ४,३९३ | ८,२९० | ६७,८०३ |
| | गुदस्त | ७,०२७ | ७८,७१९ | ४७० | ९,१०७½ | ९,९९९ | ९८,९३३ |
| | तिगस्त | १३,९१७ | १९४४९७ | १,३८९ | ७,९११½ | …….. | २७३,६९० |
| यवतमाळ | चालूं साल | ४,२२७ | ३९,९८० | ९९९ | ३,१११ | ४,१९२ | ४८,२१९ |
| | गुदस्त | २,४७१ | २८,९९९ | ७९४ | ३,६८२ | ३,२७७ | ४७,३९१ |
| | तिगस्त | ४,६६८ | ९४,३९१ | ३९१ | २,७३९½ | …….. | ८८,०९१ |
| आकोला | चालूं साल | १४,६८२ | १२३०९३ | २,०६८ | ८,७४७ | ७,६२९ | ९०,६४९ |
| | गुदस्त | ८,१०६ | ८३,१४९ | १,४९४ | ९,१३१ | ४,३४० | ३८,३६० |
| | तिगस्त | ११,९०९ | ११७४०१ | २,३११ | १०९०१ | …….. | २३३,९२३ |
| बुलडाणा | चालूं साल | ८,७४८ | ९४.४३३ | १,६३२ | ७,९६९ | ६,४९९ | ७९,१८० |
| | गुदस्त | ९,४९४ | ९३,८७१ | ९४९ | ३,९८९ | ९,३२९ | ४९,९३८ |
| | तिगस्त | ७,१६१ | ८८,८२१ | ४७१ | ३७००½ | …….. | १९३८६१ |
| एकूण वऱ्हाड | चालूं साल | ४३,००१ | ३४९६४३ | ४,८९२ | २३,८१६ | २६,६१० | २८१,८४७ |
| | गुदस्त | २३,०९८ | २४४३९४ | ३,२२३ | २१,९०९½ | १८,८४१ | १८४,९८२ |
| | तिगस्त | ३७,२७१ | ४१९०३० | ४,९९८ | २४,४४८½ | …. | ७४९,४९९ |

टीप—चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालाचे आठवडे ६ जानवारी १९१२ व ७ जानेवारी १९११ पावेतो होते

पत्रकें धाडणार
मार्केट प्रेस
३७ १०९

आर. सी. एच. मॉस किंग
डायरेक्टर आफ आग्रिकलचर
इंडस्ट्रीन—मध्यप्रांत

## नोटीस

नोटीस बेशमी गयजाबाई जवजे आखेर व भगवान वल्द भावर्शींग साकरकार उभयतां राहणार साकरा तालुके मूर्तिजापूर यास—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मयत रामजी वल्द राघोजी व तुह्मी असे उभयतां मिळून मयत विठु वल्द जयशींग साकरकार राहणार साकरा तालुके मुर्तिजापर येथील शेत

स. नंबर एकर गुंठे आकार रुपये
५१ ९८१ १७८४ सालीम
५४ १७८३८ २९८१८९ एकद्रिती-

यांस रकम रुपये ५७५ चे मोबदल्यात घेऊन खरेदीखत लिहून घेतलें आणि एक करार नामा लिहून दिला कीं, सन १९०४ ते १९१४ पावेतो दहा वर्षांचे आत वर लिहीलेले नंबराचे खरेदीचे रुपये ५७५ पावणे सहाशे नगदी रोख परत दिले तर शेत परत देऊं. न देऊं तर गुन्हेगार होऊ. ऐंपर्यंत रुपये दिले जाणार नाहीं. तो पावेतो शेताची वहीवाट करूं वगैरे मजकुरचा करारनामा तारीख ११।२।१९०४ इसवी रोजीं टिकीट लावून करुन दिला. सदर्हु मयत विठु वल्द जयशींग याचा मुलगा अभीमान वल्द विठु यानें आपला खरेदी परत घेण्याचा हक्क रकम रुपये १००० रास विकत देऊन त्यानें मजला तारीख १९।२।१२ इसवी रोजीं खरेदीखत लिहून देऊन नोंदून दिलें. त्या आधारें तुमचे रुपये ५७५ तुह्मास देण्यासाठीं धनज मुक्कामीं चंदनमल चोथमल मारवाडी याचे दुकानावर माहे मे सन १९१३ चे सुमारास घेण्याकरितां बोलावले असतां तुह्मी रकम घेण्यास नाकारलें. हल्लीं तुह्मास या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी आपली रकम रुपये ५७५ आह्माजवळून नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत डोंगरगांव येथें येऊन घेऊन जावें. व आह्मास रसीद लिहून द्यावी. आणि शेत आमचे ताब्यांत द्यावें. या प्रमाणें सदर्हु मुदतींत आपण वर्तन न केल्यास तुह्मावर योग्य रितीनें सेताचा कबजा व गेलेले पिकाचे नुकसानीबद्दल दावा करण्यांत येईल. कळावें तारीख. १७।१।१४

सही

लेखइमाम वल्द रहमदंपद जात मुसलमान राहणार डोंगरगांव याचे हातची निशाणी मोहोर
ता. १७।१।१४

नो. नं. १५

## जाहिर नोटीस

सर्वत्र शेटसावकार व इतर व्यापारी लोक यास—

खालीं सही करणार याजकडून सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं तुकाराम कृष्णाजी ठाकूर रा. बोरगांवपेठ ता. एलिचपूर यांस भिवराज शिवकरण या ना. दुकान चांदुरबाजार ता. एलिचपूर या दुकानचे कुलमुखत्यारपत्र दिलें होते तें तारीख १०-१०-१३ इ. पासून रद्द केलें आहे. तरी या जाहिर नोटीशीनें कळविलें जात आहे कीं आमच्या दुकानसंबंधानें कोणीही त्याच्याशीं कोणत्याच प्रकारचा देवघेवीचा व्यवहार करूं नये. केल्यास तो आह्मास कबूल नसून त्याची जबाबदारी करणारावर राहील कळावें ता. २०-१-१४ इ.

सही

भिवराज शिवकरण दुकान चांदुर बाजार मालक पुनमचंद शिवकरण द. पा. क. छेहरुलाल लक्ष्मणदास मारवाडी रा. आखतवाडा ता. अकोला द. खु.

नो. नं. १६

## जाहीरात

या जाहिर खबरीनें सर्व लोक आणि शेटसावकार आणि आसामी यांना (रिणकोस) कळविण्यांत येतें कीं मी. रा. गणेशप्रसाद देवीराम कनोजे ब्राह्मण यांस:

मी माझेकडून सर्व सरकारी दरबारी काम करण्यास आसाम्याकडुन पैसा कर्जाऊ वसूल करण्यास वगैरे सर्व कामें करण्यास कुलमुखत्यार पत्र आज दोन वर्षांपुर्वीं दिलें होते परंतु त्या मुखत्यारपत्राप्रमाणें त्यानें आज पावेतों जीं काहीं कामें केलीं त्याचा मजला आज असा सुगावा लागतो कीं ह्या दोन वर्षांचे नोकरीत त्यानें फार गडबड केली आहे ह्मणून मी त्यास दिलेलें कुलमुखत्यारपत्र त्यातील सर्व अधिकार जाहीर नोटिशीनें रद्द केले आहेत यासाठीं सर्वांस कळविण्यांत येते कीं त्याच्याशीं आज तारखेपासून माझे संबंधाचा कोणतेच प्रकारचा व्यवहार करूं नये. केल्यास त्याजबद्दल मी कोणतेच प्रकारचीं जबाबदार नाहीं. ही जाहीर नोटीस दिली. मु० आकोला तारीख २०-१-१९१४

सही

१ फंदाबाई जवजे रामचंद्र मुकुल कनोजी ब्राह्मण निशानी पाटली केली असे

नो० नं० १७

## नोटीस

नोटीस बेशमी व्रियम वा। रहेमान कुणबी राहणार घाडी ता० मलकापूर यास:—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं माझी जमीन तुमच्याजवळ वहितीनें आहे. व ही जमीन माझी सावत्र आई नामें तुळसाबाई हिजजवळून तुह्मी भाडेपट्ट्यानें घेतली. सदरहु इस्टेटीचा मी कायदेशीर वारस ठरलों आहे तरी या सालापासून पुढें होणारें पीकाचें उत्पन्न तुळसाबाईला न देता तुह्मी मला देत जावें. व भाडेपट्टा माझे नावानीं करुन द्यावा. नाहींपेक्षा जमीनीचा ताबा सोडून द्यावा. हल्लीं सालचे पैसे त्या बाईस देऊं नयेत दिलेतर कोर्टमार्फत दावा करुन आह्मी ते तुमचेजवळून मजून घेऊं. व तसें झालें असता कोर्टखर्च नोटीसखर्च वगैरे तुमचे जवळून घेतला जाईल. हल्लीं सालचे पैसे ८ दिवसात आणून द्यावे नाहींपेक्षा दावा केला जाईल. कळावें तारीख १९।१।१९१४ ई०

सही

गोपाळ वा। सिताराम पाटील अ० पालन करणार कुल मुखत्यार विठोबा वा। नथु पाटील रा० घाडी दस्तुर खुद.

नो० नं० १८

## नोटीस

रा० रा० गणेशप्रसाद देवीराम कनोजे ब्राह्मण रा० पिळकवडी तालुका आकोट यांस —

खालीं सही करणार इजकडून या जाहीर नोटीशीनें कळविण्यांत येते कीं — तुह्मास माझे खाजगी आणि सरकारी कामासाठीं कुलमुखत्यारपत्र आज दोन वर्षांपुर्वीं दिलें आहे. तुह्मी विश्वासु लायक समजून मी तुह्मास मुखत्यारीचे कामासाठीं मुकरर केले. परंतु आतां तुमचे सद्वर्तनांत मजला फरक दिसला आणि माझे पैशाअधल्या व दुसरे कामांत गडबड दिसते यासाठीं मी तुह्मास दिलेलें कुलमुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द केलें आहे. तर तुह्मी नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आत तुमचेपाशीं माझे असलेले कागदपत्र व वसूल केलेला पैसा व तुमचेपाशीं असलेली माझी शिल्लक मला द्यावी. हिशेब समजून द्यावा आणि माझी पावती घ्यावी त्याप्रमाणें तुह्मी करण्यास चुकल्यास मजला तुमचेविरुद्ध कायदेशीर व्यवस्था करावी लागेल. आतां यापुढें तुह्मास माझे कोणतेंही सरकारीदरबारीं कामांत व पैशाचे कामांत सर्व करण्यासाठीं अधिकार नाहीं. तुह्मी केल्यास त्याची जबाबदारी आणि कोणतेच प्रकारची जोखमीस मी पात्र नाहीं आणि त्याचा बोजा मजवर नाहीं ही नोटीस दिली मु० आकोला तारीख २०।१।१९१४

सही

१ फुंदाबाई मर्द रामचंद्र कनोजे ब्राह्मण निशानी हातची पाटली असे

नो० न० १९

## नोटीस

मी खालीं सही करणार शिवनारायण राममुख सावकार दुकान आकोट यांचे नो० नं० २६ ता० १०।१०।१३ चे उत्तरादाखल सदरहु नोटिशद्वारें असें कळवितों कीं त्याचे अगर शंकरलाल नरसिंगदास दुकान आकोट यांचे माझे कोणत्याही प्रकारचें देणें घेणें मुळींच नाहीं करितां जाहीर नोटीस देण्यांत आली आहे ता० ७।१।१९१४

सही

उर्दूत अजगरखां वा। मोमिनखां रोहिला आकोट जि० आकोला

नो० न० २०

## नोटी[illegible]

रामकिसन रामप्रसाद [illegible]ठी मारवाडी रा. चांदा[illegible]ण हल्लीं रा० अंजनीखुर्द ता. मेहेकर [illegible]स—

नोटीस देणार मंगणीराम सदाराम मारवाडी रा० अंजनीखुर्द ता० मेहकर याजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं तुह्मी माझे खात्रीचे असल्या कारणानें मी तुह्मास कुलमुखत्यार नेमेले आहे. परंतु तुचे हातून माझे दुकानची कारवाई बरोबर होत नाही व दुकानच्या वह्यांत तुह्मी हिशेब ठेवत नाहीं करितां या नोटिशीनें कळविण्यांत येत आहे कीं तुह्मास ही नोटीस पावल्यापासून ८ आठ दिवसाचे आंत दुकानचे सर्व हिशेब व कागदपत्र त्याचप्रमाणें तु[illegible] त्याजवळ आमचे सहीचे दोन कागद आहेत तेही आणून समजावून देणें कारण आह्मी तुह्मास दिलेलें मुखत्यारपत्र रद्द केले आहे. आतां तुह्मी आमच्या दुकानचे नांवानें कोणतीही देवघेव करूं नये. केल्यास ती आह्मास कबूल नाहीं. ही नोटीस दिली ता० १६।१।१४ ई०

सही

१ मंगनीराम सदाराम दुकान [illegible] अंजनी खुर्द द० [illegible]

नो० नं० २१


अनुभवास योग्य

सुवर्ण पदक मिळालेले

## ओटो मोहिनी.

टिकाऊ, आनंद दायक, सुगंधी पदार्थ जर कोणी ओटो मोहिनीचा सुवास चार दिवसांत उडून जातो असें प्रमाणसिद्ध करुन दाखवील तर त्यास १०० रुपये बक्षीस देऊं, तर एकदां अवश्य १ बाटली खरीदी करुन अनुभव पहावा व बक्षीसास तयार व्हावें. १ औंसाच्या बाटलीची किंमत २ रुपये आणि १ ड्रामाच्या नळीस १२ आणे. ओटो मोहिनीचे सुगंधी कागद १२ आणे डझन.

मिळण्याचा पत्ता—ओरियेंटल ड्रग आणि केमिकल कंपनी गोल देवळासमोर जुमा मसजिद मुंबई

नो. न. २२

कत्थेकी परवा न चुनेसे काम,
हमारे मसालेका सबको सलाम.

**तांबूल नवरत्न** — पानाच्या विड्यांत खाण्याचा उत्तम मसाला. चुना व काथाची जरूर नाहीं. किंमत डबीस सहा आणे.

**नवरत्न टेबलेट** — उत्तम सुवासिक अत्तराच्या वड्या. किंमत डबीस तीन आणे.

**नवरत्न तमाखू** — पानांत खाण्याची केशर, कस्तुरी इत्यादि सुवासिक वस्तु मिश्रित तमाखु. किंमत दर तोळयास दीड आणा.

**मद्रासी रस** — अति उत्तम सुवासिक नेप्र. मेंदूवर खास गुणकारी. बाटलीस चार आणे

**गजकर्णाचें मलम** — गजकर्णावर उत्तम औषध. डबीस चार आणे.

**केश काढण्याचें तेल** — केश काढण्याचा उत्तम इलाज. किंमत सीसीस अडीच आणे.

**चन्द्रकांत बाम** — मेंदूला व डोक्याला अति उपयोगी. सीसीस किंमत आठ आणे.

बनविणार टी. एस. मित्र. नळगांव.

आकोल्याचे सोल एजंट– चमन कंपनी.

ठिकाणा— ताजनापेठ बाजार– आकोला.

नो. नं. १०



# Oriental Government Security Life Assurance Company, Limited,

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

R. PATERSON BROWN, MANAGER.

**FUNDS EXCEED 4½ CRORES.**

Claims paid for over 3½ Crores.

***ALL PERSONS***

WHO ASSURE FOR THE FIRST TIME
OR
WHO INCREASE THEIR PRESENT ASSURANCE
WITH

***THE ORIENTAL***

BY EFFECTING A WITH PROFIT POLICY
ON OR BEFORE 31 ST DECEMBER 1913 WILL BE ENTITLED TO

# THREE YEARS BONUS

PROVIDED
THREE YEARS PREMIUMS HAVE BEEN PAID
AND
THE POLICY IS IN FORCE ON 31 ST DECEMBER 1915.

Prospectus, forms, and further information can be obtained on application to—
CHIEF AGENCY FOR C. P. BERARS AND KHANDESH,—
NAGPUR.

M. DESOUZA
CHIEF AGENT
*Nagpur.*

No N. 11



## त्रिकाल दर्शी आरसा?

तुह्मास भूत, भविष्य वर्तमान जाणण्याचा अभ्यास ही जाहिर खबर वांचून त्वरित ऑर्डर धाडा. ह्या आरशासारखें त्रिकाळ ज्ञान प्राप्त करण्याचें साधन जगांत दुसरें एकही नाहीं. तत्संबंधानें शेकडा सरटीफिकीटें मिळालीं आहेत. श्रद्धाळू मुलें, स्त्रीया आणि पुरुष स्वतःचे विचार आणि त्यांचे परिणाम पाहूं शकतात. गांव परगांव दूर देशांतर आणि दूरच्या मित्र व सोयऱ्यांच्या खबरा तुह्मांस सहज मिळूं शकतील. अमूक काम होईल किंवा कसें? अमूक बाबतींत काय परिणाम होतील, व्यापारांत नफा किंवा तोटा, अमुक पदार्थाच्या किंमतीची कमीजास्ती, परीक्षेचे परिणाम, चाकरी वगैरे कांहीं तुमच्या मनाचा खुलासा करावयाचा असेल तो सर्व होऊं शकेल किंमतः—

| | |
|---|---|
| साध्या कांचेचा रु. २-९ | प्रत्येक पोस्टेज सहित |
| बिल्लोर काचेचा मजबूत रु. ३-९ | |
| मुद्दाम मोठे बिल्लोर कांचेचा मजबूत रु. ६ | |

हिंदुस्थाना बाहेरच्या ग्राहकानें २ रु. जास्त धाडाव.

आशाभाई वाघजीभाई पटेल मु०
करमसद, ता० आनंद जिल्हा खेडा.

नो. नं. १२



## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी सांड्याचें तेल,

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो"

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे अनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट, यांचा दवाखाना.
३८ जांबळी मोहल्ला मुंबई

नो० नं० १३



सर्वोत्तम रक्तशुद्धि करणारा



डॉ० वामन गोपाळ यांचा

## आयोडाईज्ड सार्सापरिला.



हा सार्सापरिला हजारों लोकांनीं पन्नास वर्षें अनुभवून उत्तम रक्तशुद्धि करणारा आहे असें ठरविलें आहे. ह्या औषधानें रक्तशुद्धिवर गुण वाटून इतर रक्तशुद्धि करणाऱ्या औषधांत "सर्वोत्तम" अशी ख्याति मिळविली आहे जुना संधिवात, त्वचे संबंधीं रोग अशक्तता यांवर हें रामबाण औषध असून त्याचा सर्व जगभर फार वाखाणणी होत आहे. गुणकारी शक्ति देणारें औषध आहे याच्या दररोजच्या सेवनानें मन आणि शरीर यांस उल्हास वाटतो. किंमत एका बाटलीस सव्वा रुपया शिवाय टपाल खर्च.

**औषध मिळण्याचें ठिकाण:-- डॉ गौतमराव केशव**

नो० नं० १४ **५६३ ठाकूरद्वार मुंबई.**


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें